
कलाटणी
एक परिवर्तन
- शुभम सुरेश शेकडे


जत्रा
- शुभम


फार्महाउस

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# कलाटणी एक परिवर्तन

(गूढकथा)

लेखक : शुभम सुरेश रोकडे

# कलाटणी

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

### हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

### असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

### दाम नाही मागत. मागत आहे दाद.
### साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# कलाटणी

लेखक शुभम सुरेश रोकडे

मुढवी, तालुका मंगळवेढा

जिल्हा सोलापूर.

दूरध्वनी क्रमांक ८८०५१८४८६९

shubhamrokade482@gmail.com

Blog:. http://manatalepanavar.blogspot.com/

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : ३ मार्च २०१९

©esahity Pratishthan®2019

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.




नारायण धारप यांना ……

ज्यांच्या कथा वाचता वाचता लिहायला शिकलो

शुभम सुरेश रोकडे

धन्यवाद ई-साहित्य प्रतिष्ठान

स्वतःचे पुस्तक प्रकाशित व्हावे असं बऱ्याच जणांचं स्वप्न असतं. हा माझा पहिला प्रयत्न आहे त्यांनी साहित्य प्रकाशन हे पुस्तक प्रकाशित करत आहे. माझे स्वप्न ई-साहित्य प्रकाशन पूर्ण करत आहे त्यामुळे माझ्या आनंदाला आभाळ ठेंगणे पडलं आहे असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही. साहित्य प्रकाशित झाल्यानंतर सगळयात मोठा रोल असतो तो वाचकांचा. वाचकांचा प्रतिसाद लाभत असल्यास लिहिणाऱ्यांना लिहावेसे वाटते व प्रकाशकांना साहित्य प्रकाशित करण्याचे धाडस होते. ई-साहित्य प्रकाशन एक स्तुत्य उपक्रम राबवत आहे. त्यामुळे वाचकांना नम्र विनंती आहे कि पुस्तक वाचल्यानंतर, ते आवडो अथवा न आवडो, तुम्हाला काहीही सांगायचं ते जरूर सांगा, अगदी बिन्धास्त........

शुभम सुरेश रोकडे

मुढवी, तालुका मंगळवेढा

जिल्हा सोलापूर.

दूरध्वनी क्रमांक ८८०५१८४८६९

shubhamrokade482@gmail.com

Blog:. http://manatalepanavar.blogspot.com/

# दोन शब्द....

If you wanna be writer read a lot and write a lot

- Stephn king

जर तुम्हाला लेखक व्हायचे असेल तर खूप वाचा आणि खूप लिहा असं प्रसिद्ध कादंबरीकार स्टीफन किंग म्हणतो. माझ्या बाबतीत उलटं झालं मी कधी लेखक व्हायचं ठरवलं नव्हतं आणि अजूनही नाही. पण वाचनाची खूप आवड होती. वाचलेलं ते साठत गेलं आणि मग मी लिहिता झालो. सुरुवातीला जेव्हा अकरावीला कॉलेजला ॲडमिशन घेतलं तेव्हा मराठीतील पुस्तकांचं विश्व माझ्या साठी खुले झाले. मी आमच्या शहरातील असलेली लायब्ररी जॉईन केली. एकेक करत लेखकाची ओळख होऊ लागली. पहिल्यांदा वि. स खांडेकर, शिवाजी सावंत, विश्वास पाटील. नंतर भालचंद्र नेमाडे, श्री ना पेंडसे, गो नी दांडेकर. नंतर सगळेच. एकदा एक पुस्तक वाचायला मिळाले ते पुस्तक भयकथाकार नारायण धारप यांचे होते. तेव्हापासून मी नारायण धारप यांचा फॅनच झालो. मग नारायण धारप यांची पुस्तके वाचून काढायचा सपाटाच लावला. नंतर विज्ञान कथा कळाल्या. मग मी निरंजन घाटे आणि जयंत नारळीकर यांची पुस्तके वाचायचा सपाटा लावला.

खरंतर मला विज्ञान कथा, भयकथा वाचायला आवडतात त्याबरोबर ऐतिहासिक कादंबऱ्या वाचायला खूप आवडतात. त्याचबरोबर श्री ना पेंडसे, गो नी दांडेकर भालचंद्र नेमाडे हेही माझ्या काळजाच्य जवळचे, आवडते लेखक आहेत. यांचं कुठलेही पुस्तक मला कधीही वाचायला आवडते.

सारांश सांगायचा झाला तर मला नारायण धारप, रत्नकर मतकरी, जयंत नारळीकर, निरंजन घाटे, भालचंद्र नेमाडे, गो नी दांडेकर, श्री ना पेंडसे हे सर्व वाचायला आवडतात......

मराठी साहित्य हे भारतातील कोणत्याही इतर भाषेतील साहित्यपेक्षा विज्ञान कथेच्या बाबतीत पुढारलेले आहे असं म्हणतात. पण आंतरजालावरती म्हणजेच इंटरनेट वरती फ्री मध्ये उपलब्ध आहेत अशा फार विज्ञानकथा नाहीत उलट भयकथा आणि प्रेम कथा भरपूर वाचायला मिळतील. या कथांसाठी वाहिलेले अनेक ग्रुप्स ही तुम्हाला सापडतील पण विज्ञान कथांचा बाबतीत असा एकही ग्रुप नाही ही शोकांतिका आहे.

मला विज्ञान कथा वाचायला भरपूर आवडतात. त्याचबरोबर सायफाय सिनेमे पहायलाही आवडतात. त्यामुळे डोक्यात विज्ञान कथा लिहिण्याचा बऱ्याच संकल्पना आहेत. वाचकांचा प्रतिसाद मिळाला तर त्याही नक्की लिहाव्यात असं मनात आहे.

शुभम सुरेश रोकडे

मुढवी, तालुका मंगळवेढा

जिल्हा सोलापूर.

दूरध्वनी क्रमांक ८८०५१८४८६९

Blog:. http://manatalepanavar.blogspot.com/

# भाग 1



# जत्रा

काटेवाडी गावाला जत्रेची परंपरा जुनीच. फार वर्षापासून ही जत्रा होते. चार दिवस जत्रा चालते गावातील सर्व लोक तेथे जातात. गावातीलच नाही तर आजुबाजुच्या गावाचे, तालुक्याचे सारेच लोक येथे येतात त्यामुळे जत्रा गर्दीत होते. जत्रेत वेगवेगळी दुकाने थाटली जातात उंच उंच पाळणे, छोट्या छोट्या रेल्वे गाड्या, तसेच लहान मुलांना आकर्षित करणारे वेगवेगळे घटक असतात. वेगवेगळया नाश्त्याची, ज्यूसची, प्रसादाची, चिरमूऱ्याची, धार्मिक पुस्तकांची नि कशाकशाची दुकाने जत्रेत लागतात. चार दिवस चालणाऱ्या या जत्रेत विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. सांस्कृतिक कार्यक्रम म्हणजे तमाशा , ऑर्केस्ट्रा, कुस्त्या आणि काय काय ….. । मागच्या पाच सहा वर्षापासून पहिल्या दिवशी कुस्त्यांचे जंगी मैदान होते, दुसऱ्या दिवशी तमाशा होतो, तिसऱ्या दिवशी ऑर्केस्ट्रा होतो, नि शेवटच्या दिवशी गाव-जेवन असते. या जत्रेच्या बहुरंगी कार्यक्रमात लोक आपले सुख दुःख विसरून आनंदाने सामील होतात. जत्रेतील सगळयात सांस्कृतिक कार्यक्रमांना गर्दी असते. मात्र खासकरून तमाशाला नि ऑर्केस्ट्राला जास्तच गर्दी असायची. लोक दोन-दोन तास आधी येऊन बसायचे पुढे बसण्यासाठी लोकांची भांडणे व्हायची.

आज ऑर्केस्ट्राचा दिवस होता. गण्या, मन्या, राम्या, यशा आणि आबा राम्याच्या घरची मका करायला व्यस्त होते. मिशनवाल्याने उशीर केल्याने त्यांना ऑर्केस्ट्राला जायला उशीर होणार होता.

“ आईला राम्या तुला दुसरा दिवस घावला नाही का मका करायला " मन्या वैतागून म्हणाला

" नाहीतर काय आता कुठली मिळते आपल्याला पुढे जागा " आबा मन्याच्या बोलण्याला दुजोरा देत म्हणाला

" असुद्या रे घ्या संभाळून आपलाच मित्र आहे तो त्याला मदत करायची नाही तर कोणाला मदत करायची " गन्या राम्याची बाजू घेत सगळयांना म्हणाला. " झालं आता ही शेवटचं पोतं टाकू या आणि पाच मिनिटात सगळं आवरून पारावर भेटूया "

काटेवाडी गावची दीड-दोन हजार लोकसंख्या असली तरी निम्म्या लोकांहोऊन अधिक लोक वाड्या वस्त्यावरती राहायचे. हे पाच मित्र ही काटे वस्ती वरती रहायचे. गावापासून दूर दीड-दोन किलोमीटर अंतरावर असणारी काटे वस्ती आणि तेथील हे पाच मित्र आज रात्री भलत्याच संकटात अडकणार होते. काटे वस्ती वरून गावात जायला तशी एकच वाट. त्याच वाटेने लोकांची ये-जा चालायची मात्र त्या वाटेने चालत जायला अर्धा ते पाऊण तास लागायचा. या वाटेमुळे दीड-दोन किलोमीटर अंतरावर असणारे गाव तीन ते साडेतीन किमी व्हायचे.

तशी दुसरी एक वाट होती पण ती वाट दिवसा वापरायलाही लोक भ्यायचे. त्या वाटेचे नाव होते पाद्र्याची वाट. पाद्र्याच्या वाटेबद्दल बऱ्याच अख्यायिका प्रसिद्ध होत्या. या आख्यायिका गावात फक्त दिवसाच आवडीने चगळल्या जायच्या. मात्र कोणीही पट्टा त्या वाटेने जायला तयार नसायचा. गावातील प्रत्येकाचे स्पष्ट मत होते की त्या वाटेवर पाद्र्याचे भूत आहे. कोणी कोणी ते भूत पाहिले होते. कोणी कोणी त्या भूताला अमावस्येच्या रात्री कंदील घेऊन फिरताना पाहिले होते. कोणी कोणी तर चक्क भुताचा आवाज हि ऐकला होता. तो पादरी इंग्रजी माणूस असल्याने तो इंग्रजीत बोलत असणार हे साऱ्यांनी गृहीत धरून भूत हे इंग्रजी बोलत होते, इंग्रजी गाणे म्हणत होते असे गावात पसरवले होते.

ठरल्याप्रमाणे पाचच मिनिटात आवरून गण्या पारावर पोहोचला. बघतो तर अजून कोणच आले नव्हते. त्यामुळे तो जाम वैतागला तो मन्याला हाक मारायला जाणार तेवढ्यात त्याला मन्या येताना दिसला.

" आईला मन्या आधीच उशीर झाला आहे आणि हे अजून आले नाहीत आपल्या आपणच जायचं का...? का बोलवायला जाऊया त्यांना..? " गण्या मन्याला म्हणाला. तेवढ्यातच उरलेले तिघे त्याला येताना दिसले. त्यांना दोन-चार शिव्या देऊन वक्तशीरपणाचे लेक्चर गण्याने उरकून टाकले

अगोदरच उशीर झाला असल्यामुळे गण्या म्हणाला की आता आपण पाद्र्याच्या वाटेने गावाकडे जायचे.

राम्या आणि मन्या तयार झाले मात्र यशा आणि आबा घाबरून लांबच्या वाटेने जाऊया असं कळकळीने गन्या, राम्या आणि मन्याला सांगू लागले. गन्याला मागं बसनं अजिबात पसंत नव्हतं म्हणून जवळच्या वाटेने पटकन जाऊया असं त्याचं म्हणणं होतं. त्यावेळी आबाने पाद्र्याच्या भुताची आठवण करून दिली त्याच बरोबर कंदील घेऊन फिरणाऱ्या पांडबाची भीतीसुद्धा आबाने गण्याला दाखवली मात्र गन्या त्यांना घाबरणाऱ्यातला नव्हता. " भागुबायांनो तुम्ही जावा लांबच्या वाटेने पण आम्ही पाद्र्याच्याच वाटंन जाणार " असा टोला मारून गन्या, राम्या आणि मन्या पाद्र्याच्या वाटेने निघाले.

या पाद्र्याची नि पाटलाच्या पोरी ची चमत्कारिक प्रेम कथा ही गावात फारच प्रसिद्ध होती. साधारणपणे सांगितलं जायची की ६० - ७० वर्षापूर्वीच्या काळात हे लफडं (गाववाल्यांच्या भाषेत) झालं.

पूर्वीच्या काळी ख्रिश्चन लोक धर्मप्रसारासाठी गावोगावी जात असत त्यासाठीच पाद्री गावात आला होता आणि त्याने ख्रिश्चन धर्म प्रसार सुरू केला होता. गावाच्या पाटलाची पोरगी की मुंबईला शिकून आलेली त्यामुळे बऱ्याच पुढारलेल्या विचारांची होती. तिचं नाव शेवंता होतं. शेवंता दर रविवारी चर्चमध्ये प्रार्थनेला जायची. चर्च म्हणजे काही फार प्रशस्त व मोठा नव्हता. तिथल्या तिथे प्रार्थनेसाठी म्हणून छोटासा चर्च पाद्रीने बांधून घेतला होता. एरवीही वेळ मिळेल तेव्हा ती त्याला भेटायला जायची. चर्चमध्ये प्रार्थनेसाठी फार थोडे लोक जमायचे, मात्र काही गोष्टी गावभर पसरावयच्या असल्या तरी जास्त लोकांची गरज लागत नाही. जंगलात वनवा जसा पसरत असतो तशा या गोष्टी आगीसारख्या भरभर पसरत जातात. शेवंताच्या आणि पाद्रीच्या बाबतीत असेच झाले. लोक शेवंता च्या बाबतीत नाही नाही त्या गोष्टी बोलू लागले.

" सर्वांदेखत पाद्री शेवंताच्या हाताचे मुके घेतोय असे मग सगळयांच्या डोळयामागं काय काय होत असेल देव जाणे " लोक म्हणायचे.

गावाला चगळायला एक चवदार विषय मिळाला होता. काही झालं तरी शेवंता पाटलाची पोरगी होती, मागं कोणीही कितीही वाईट वंगाळ बोललं तरी पाटलांसमोर बोलायची हिम्मत कुणाची नव्हती. मात्र अशा गोष्टी फार काळ लपून राहत नाही एक दिवस ही गोष्ट पाटलाला कळालीच. तेव्हापासून म्हणे पाटलाने शेवंताला नि पाद्रीला भेटायची मनाई केली. पाद्रीलाही चांगलाच चोप दिला. मात्र शेवंताला हे सारं सहन न झाल्यामुळे तिनं चर्चपुढे जाऊन फास घेतला.

पोरीनं फास घेतल्यामुळे पाटील चांगलाच पिसाळला. त्याने पाद्रीचा चर्चमध्येच खून घडवून आणला. सारा गाव जो या लफड्याला नावं ठेवत होता तोच या दोघांसाठी हळहळून रडू लागला. पाटलाच्या नावानं खडे फोडू लागला. त्याला शिव्या घालू लागला. शेवंता आणि पाद्रीच्या प्रेमाला लैला-मजनू, हीर-रांझा, बाजीराव-मस्तानी यांच्या प्रेमाच्या उपमा देऊ लागला पाटील यांच्या दृष्टीने खलनायक झाला. पाटील खलनायक झाला खरा मात्र याच खलनायकाचा पाद्र्याच्या भुताने भयानक अंत केला. लोक म्हणू लागले पाटलाला चांगला धडा मिळाला... मात्र त्याच बरोबर त्या वाटेवर जायलाही भिऊ लागले

या साऱ्या गोष्टींमुळे ज्या बाजूला छोटखाना चर्च होता त्या बाजूच्या या वाटेला पाद्र्याची वाट असे नाव पडले. आणि त्याच वाटेवरून गन्या, मन्या आणि राम्या जायला निघाले होते.

दिवसाउजेडी माणसाने कितीही फुशारकी मारली की आपण कशाला भीत नाही. भूत असो नाहीतर काहीही असो... मात्र रात्री अंधार पडल्यावर साऱ्यांचीच बोलती बंद होते. गण्याने कितीही मोठ्या बाता मारल्या असल्या तरी त्याच्या अंतर्मनात कुठेतरी भीती आपले पाय पसरवत होती.

पाद्याची वाट ही काही वर्दळीची वाट नव्हत गाडीवाट असली तरी चाकाच्या दोन चाकोरीपुरतीच वाट राहिली होती. बाकी सगळीकडे रानटी झाडे झुडपे माजली होती त्यामुळे जंगलात आल्यासारखं वाटत होतं. पायाखालचं वाळून गेलेलं गवत पाय पडल्यावर चुरचुर करत होतं. सुरुवातीला या जंगलात फिरताना राजेशाही असणारी त्यांची चाल थोड्याच वेळात दीनदुबळ्या माणसासारखी झाली. काही वेळाने शिकार शिकारीपासून जीव वाचवून पळण्यासाठी जशी धडपड करते त्याहून अधिक धडपड हे तिघे त्या जंगलातुन बाहेर पडण्यासाठी करू लागले. कुठेतरी कोल्हेकुई व्हायची आणि त्यांची काळीजं झटकन उडायची. मग काही काळ शांत जायचा पायाखाली असणाऱ्या गवताच्या चुरचुरीचा आवाज इतका भयानक वाटायचा की कानाचे पडदे फाटायचे. तरीही धीर करून ते चालले होते त्यांच्या मनात कुठेतरी लपून बसलेला विचार म्हणत होता की भुते वगैरे काही नसतात सारे भास असतात पण.......... ।

तो विचार किती खरा आणि किती खोटा या साऱ्यांपेक्षा सहीसलामत बाहेर जाणे अधिक महत्त्वाचे होते. इतकावेळ विचारांच्या तंद्रीत चालणाऱ्या गण्याने भानावर येत मन्या व राम्याला हाका मारल्या. त्याचा आवाज त्या निस्तब्ध जंगलात कुठच्या कुठे हरवून गेला. त्याच्या हाकेला उत्तर न आल्याने त्याने मागे वळुन बघीतले तर............

तिथे कोणीच नव्हतं. तो एकटाच चालत होता .... कधीपासून ...?केव्हापासून ...? त्याला काहीच माहित नव्हत. त्याला काहीच कळत नव्हत. तो घाबरला. गुरासारखा ओरडत, मान्या राम्या त्यांच्या नावाने हाका मारत सुटला. थोडाच वेळ पण थोड्या वेळानंतर तो ओरडला, खूप ओरडला पण त्यालाही स्वतःचा आवाज ऐकू येईनासा झाला. त्या अघोरी जंगलाने त्याच्यावर ती कोणती करणी केली होती कोणास ठाऊक ....?

तो वेड्यासारखा धावत सुटला इकडून तिकडे तिकडून इकडे. धाप लागेपर्यंत तोंडाला फेस येईपर्यंत तो धावतच होता. पण तो कुठेच पोहोचत नव्हता फिरून फिरून एकाच जागी येत होता.

तो घाबरला खूप घाबरला मृत्यू दारावरती दिसल्यावर, मृत्यूचा पाश जीवनवृक्षाचा रस संपूवू लागल्यावर, सगळेच घाबरतात. हाच घाबरटपणा हीच हीच मृत्यूची भीती सामान्य माणसाकडून अचाट कामे करून घेते. मृत्यूपूर्वीच असच बळ त्याच्या अंगी संचारलं. त्याला राग आला त्या जंगलाचा, त्या पाद्रीचा, त्याच्या प्रेमात पडणाऱ्या शेवंताचा, दोघांच्या मिलनाचा अडथळा बनणाऱ्या पाटलाचा ही.

त्याच रागाच्या भरात त्यानं एक अचाट धाडस केलं. जंगलातील वाळलेली लाकडं गोळा केली, पालापाचोळा गोळा केला, त्यांचा ढीग लावला आणि खिशात हात घातला पण आगपेटी नव्हतीच. तिथेच पडलेले दोन गारगोटीचे दगड घेतले आणि एकमेकांवर आपटणे सुरू केले. त्याला कशाचेच भान नव्हत एकाच गोष्टीवर त्याचं लक्ष होतं ती म्हणजे जंगल जाळायचं......। गारगोटीवर गारगोटी आपटता आपटता त्याच्या डाव्या हाताचा अंगठा ठेचून निघाला त्याच्यातून रक्त वाहू लागलं पण त्याला कशाची जाणीव नव्हती गारगोट्या घर्षण वाढत होतं नि शेवटी त्यातून ठिणगी उडाली ती पाल्यावरती पडली आणि एकच भडका उडाला .....।

जाळ लागल्याबरोबर ओली वाळली सगळी लाकडे आगीच्या कचाट्यात येऊ लागली. त्याचबरोबर आजूबाजूचे वृक्ष-वेली सगळेच आगीने आपल्या बाहुपाशात आजूबाजूला घेतले. सगळीकडे नुसती आग झाली. आगीच्या ज्वाला त्याच्या शरीराला स्पर्श करू लागल्या आगीचा दाह आता प्रकर्षाने जाणवू लागला ....। हळूहळू तोही यज्ञामध्ये पडलेल्या आहुतीप्रमाणे अग्नी मध्ये जळू लागला. मृत्युलाही भीती वाटावी इतकी भयानक वेदना त्याला होऊ लागली पण वेळानंतर सारे काही शांत झाले.

त्याला काहीच कळेना तो कोठे होता तिथे काहीच नव्हते त्याला काहीच दिसत नव्हते त्याला काहीच जाणवत नव्हते फक्त मोकळं आणि हलकं जाणवत होतं हाच असतो का तो मृत्यू ज्याला आपण भित असतो पण यात भिण्यासारखं काहीच नाही...।

हळू हळू त्याला शीतल पाण्याच्या तुषारांचा गारवा जाणवू लागला आणि गारव्याबरोबरच अनेक आवाज त्याच्या कानात गर्दी करू लागले..... ।

मन्या आणि राम्या त्याला उठवत होते. तो बेशुद्ध झाला होता हळूहळू त्याने डोळे उघडले त्याला जाणवले आपण जिवंत आहोत.

मग ते जंगल ती आग हे सगळं खोटं होतं का? तेव्हाच त्याच्या हाताच्या अंगठ्याला असह्य वेदना झाल्या, हे सारं खरं होतं तर ...? मग तो वाचला कसा? कुणी वाचवलं? पाद्र्याच्या भुतानं यांना काहीच केलं नाही का ....?

तो एका झोपडीत होता. झोपडी यासाठीच म्हणायचं कारण ती लाकडाची होती पण एकदम आलिशान होती. तो एका लाकडी पलंगावर खोलीच्या एका बाजूला होता. त्याला लागूनच एक लाकडी कपाट होतं, त्याच्यावर अतिसुंदर वर्तुळाकार आरसा होता. त्यावरून खोलीतील दिव्याचा प्रकाश परावर्तित होऊन खोलीभर पसरला होता. खोली सुंदर सजवली होती.

“ आयला रम्या आपल्या काटेवाडीच्या जंगलात असला बंगला हाय ते आपल्याला कसे माहीत नव्हते रे " गण्या शुद्धीवर येत म्हणाला.

" आम्हाला तर कुठे माहीत होतं "

तेवढ्यात समोरचं दार कुरकुरीत उघडू लागलं. तिघेही प्रतिक्षिप्त क्रियेमुळे भलतेच जास्त सावध होत आक्रमक पवित्र्यात आले.

“ अरे घाबरू नका मीच आहे " एक इसम आत येत बोलला. राम्या व मान्या त्याच्याकडे बघत परिचयाचे हसले.

“ तुम्ही आहात होय आम्हाला वाटलं ते पाद्र्याचं भूत आहे ” गणाच्या तोंडावर प्रश्नचिन्ह बघून राम्या म्हणाला " त्यांनीच आपल्या सर्वांना वाचवलं आहे नाही तर आपलं राम नाम सत्य झालं असतं.."

गण्या उठून बसत म्हणाला “ कोण आपण?

क्षणभर विचार करून शांतपणे तो इसम म्हणाला

" मीच तो पाद्री "

तेव्हा तिघांचीही भीतीने गाळण उडाली. तिघेही भेदरलेल्या नजरेने त्याच्याकडे पाहू लागले. इतकावेळ मराठमोळा वाटणारा त्याचा वेश हळूहळू पालटू, लागला त्याच्याभोवती त्याला झाकून टाकणारे छोटे-छोटे काळसर ढग जमू लागले. मग दोन-तीन सेकंद तो पूर्ण अंधारात गडप झाला.

त्याच्यांपुढील खुर्चीत बसत तो म्हणाला “ I am the Priest of this Church “ त्याचा पोषाख पुर्ण बदलला होता. पाद्री लोकं घालतात तसा पायघोळ झगा घातला होता. गळयात क्रूस होता आता तो एक इंग्रजी पादरी वाटत होता. त्याचं इंग्रजी ऐकून तर यांची खात्रीच झाली की हेच त्याचं भूत. पुन्हा एकदा ते मृत्युच्या दाढेत अडकले होते. अशा गंभीर परिस्थितीतही राम्या त्याला म्हणाला की

“ मग तुम्ही एवढं चांगलं मराठी कसं काय बोलू शकता?

हा प्रश्न ऐकून पादरी जो हसत सुटला तो थांबेचना.

“अरे मी भुत आहे आणि तसंही मला मरण्या अगोदरच मराठी येत होतं “

मग गण्या म्हणाला

“ आम्हाला मारलं कसं नाही "

“अरे काय रे भुतांना माणसाला त्रास देण्याशिवाय दुसरी कामे नसतात असं तुम्हाला वाटतं काय ”

“ नाही तसं नाही तुम्ही लई जणांना मारलं म्हणून म्हटलं "

“ मी फक्त पाटलाला मारलं कारण त्यान मला शेवंताशी लग्न करून दिले नाही म्हणून"

“ मग तिथंन पुढं. माणसं मरायला चालू झाली त्यांना कोणी मारले "

“ जंगलात चालते ती सारी पाटलाच्या भुताटकीची करामत आहे "

“ काय "

ते तिघेही चाटच पडले.

“ आतातर तुम्ही एक नमुना बघितला राम्याला झाडांनी व वेलींनी धरून स्वतःमध्ये सामावून घेण्याचा प्रयत्न केला. तरं मन्याला जमीनीने गिळण्याचा प्रयत्न केला. आणि गण्याला आगीने आपले भक्ष्य बनवण्याचा प्रयत्न केला

“ मग तुम्ही आम्हाला का वाचवलं? “

“ मग काय मरू द्यायचं होतं की काय?

“ पण पाटील तर मेला आहे ना आणि त्याच भूत कुणी बघितलंय "

मी सगळं सुरुवातीपासून सांगतो काय झालं ते त्या पाद्रीने सांगायला सुरुवात केली ……

प्रेम ही अशी गोष्ट आहे जी भल्याभल्यांना वेड करते. प्रेमासाठी माणूस काहीही करायला तयार होतो. माझेही शेवंता वरती प्रेम होतं. तिच्यासाठी मी काहीही करायला तयार होतो. अगदी काहीही म्हणून तर मुंबईमधील चांगली प्रोफेसरची नोकरी सोडून मी इथे आलो असतो. हो मी मूळचा पाद्री नाही आणि मी शेवंताच्या प्रेमात गावात आल्यावरती पडलेलो नाही.

मी मुंबईत त्याच कॉलेजमध्ये शिकवायला होतो जिथे शेवंता शिकायला होती. तिथेच आमची ओळख झाली, ओळख मैत्रीत, आणि मैत्री प्रेमात बदलली. आम्ही दोघे एकमेकांवर खुप प्रेम करायचो.

एक दिवस मी तिला लग्नाची मागणी घातली. तिला अनपेक्षित नव्हते,

ती म्हणाली " मी तर केव्हाच तुझी झाली आहे पण..."

" पण काय...? " मी म्हणालो

" बाबा परवानगी देणार नाहीत... "

" मी येईन त्यांची समजूत काढून....

" अरे जरी माझ्या प्रेमापोटी माझ्या बाबांनी परवानगी दिली तरी समाज हे स्वीकृत करणार नाही बाबा एकटे पडतील.....

पाद्री सांगत होता

मधेच राम्या म्हणाला

मूर्ख मुलगी..

या मुली अशाच असतात

त्यांना सांगायला पाहिजे

हमको मिटा सके ये जमाने में दम नही हमसे जमाना खुद हे

जमाने से हम नही

तुमचं चालू द्या पुढे त्याच ब्रेकअप झाल्यापासून तो जरा पिसाळल्यासारखे करतोय. मन्या आवेशाने उठलेल्या राम्याला बसवत म्हणाला.

म्हणून मग मी ठरवलं तिच्याबरोबर गावात यायचं. पण प्रोफेसर म्हणून आलो असतो तर कुणी ढुंकूनही पाहिलं नसतं . त्यातून मला गाववाल्यांची ही सहानुभूती पाहिजे होती. पाद्री झालं की machinery तर्फे खर्चही झाला असता, धर्म प्रसारही झाला असता, गाववाल्यांची सहानुभूतीही मिळाली असती आणि माझं लग्नही झालं असतं

" अरे वा एका दगडात चार पक्षी मारले की हो तुम्ही " मन्या म्हणाला

" बाकी काही होऊद्या अथवा न होऊ द्या पण लोकांची सहानुभूती तुमच्याकडेच आहे बरं का …" मन्या म्हनाला

" पाद्री होऊन यायच्या ऐवजी लाल कपडे काळी टोपी वाले साहेब होऊन आला असता तर सगळं काम सोपं झालं असतं की …" गण्या म्हणाला

" अरे एवढा मोठा नव्हतो रे मी " पाद्री म्हणाला

तो पुढं सांगू लागला

असो गावात आलो नि तिचं आणि माझं भेटणं वाढलं. गावभर चर्चा चालू झाली. म्हणलं ही योग्य वेळ आहे आत्ताच पाटलाला शेवंताची मागणी घालू पण झालं उलटंच.

मी मागणी घातल्यावर त्याने शेवंताचा बाहेर पडणं बंद केलं. माझ्या वरही दोन-तीन वेळा हल्ले केले. म्हणून मी दोन चार दिवस लपून बसलो. एक दिवस माझ्या कानावर आलं की शेवंताने चर्च पुढं फास घेतला म्हणून मी आलो. तर शेवंता गेलीच नव्हती. ती जिवंत होती तिला चर्चमध्ये डांबून ठेवलं होतं दुसऱ्या कुठल्यातरी पोरीचा पाटलाने अंतिम संस्कार केला होता आणि गावभर बातमी पसरवली की शेवंतान फास घेतला.

“ पण तसं का केलं त्यानं " आम्ही विचारलं

" अरे शेवंताने त्याचं नाक कापलं होतं ना..

मग मी आल्यावर तिच्या देखत माझा खून केला

अन तिचं काय झालं

त्यांनी तळघरात डांबून ठेवलं रे माझी शेवंता मी गेल्यावर सुद्धा यातना भोगत होती. आयुष्याचं वाटोळं झालं रे तिच्या. कुणीतरी उमललेलं एखादं फूल गाडून टाकावे तसं तिच्या आयुष्याचं झालं. ती रडत होती माझ्या आठवणीत आणि मी काहीच करू शकत नव्हतो. कारण मी जिवंत नव्हतोच भूत होतो. तिला त्या अंधाऱ्या खोलीत त्रास भोगावा लागतोय पण मी काहीच करू शकत नव्हतो. मी हतबल होतो फक्त भटकत होतो तिच्या वेदना पाहत होतो, तिचे दुःख अनुभवत होतो, मला तिचं कौतुक वाटायचं की हा सारा की कसा सहन करू शकते पण ती.... तिने स्वतःला अजून त्रास करून घ्यायला चालू केलं.. तिने अन्न त्याग केला. तिचं शरीर हळूहळू क्षीण होऊ लागलं. मला तिचा मृत्यू दिसू लागला पण तरीही मी काहीच करू शकत नव्हतो. एक दिवस आला ती सदा सर्वदा साठी मुक्त झाली. आणि माझ्यातील क्रोधाने पाटलाचा अंत केला. शेवंता बिचारी स्वच्छ मनाची मृत्यू पावताच मुक्त झाली पण मी..

मी अजूनही हा त्रास का बघतोय का? का? आणि कशासाठी? त्या परमेश्वराला माझी दया का येत नाही? का तो मला या बंधनातून मुक्त करत नाही?

पादरी भावूक झाला होता त्याच्या डोळयातून आसवे वाहात होती कोणालाच कळेना की काय करायचं?

पाद्रीला अश्रू अनावर झाले तो मुसमुसत रडू लागला.. त्याचं दुःख खरंच मोठं होतं. तो किती वर्षे असा भटकत होता काय माहित? एवढ्या वर्षाचा एकांत? कितीही मोठा गुन्हा असला तरी ही शिक्षा फारच मोठी होती. देव त्याला ही शिक्षा कोणत्या गुन्ह्यासाठी देत होता काय माहित ?

“ तुम्ही स्वतःला आवरा, याच्यावर ती काही ना काही उपाय असेलच " गण्या म्हणाला

“ नाही मला शतकानुशतके असंच राहावं लागेल, नरक यातना म्हणतात त्या याच असाव्यात " पादरी भावूक होऊन म्हणाला

"प्रत्येक गोष्टीचं उत्तर असतं, या अडचणीतून ही काही ना काही मार्ग सापडेलच " गण्या म्हणाला

" आहे एकच उपाय आहे " पादरी म्हणाला

" कोणता? " तिघेही एकदमच ओरडले.

" मी हे कसं सांगू शकतो? मी एवढा स्वार्थी कसा होऊ शकतो? " पादरी मधूनच वेड्यासारखं बडबडू लागला

" सांगा ना कोणता उपाय " राम्या म्हणाला

" अरे मी तुम्हाला कसा त्रास देऊ शकतो "

"आम्हाला सांगा, नक्की काय म्हणताय तुम्ही ? "

" मी किती आंधळा झालो स्वहितासाठी दुसऱ्याच्या अन्हीत करायला निघालो!!'

" अहो सांगा तरी एकदा कोणता उपाय आहे?"

" सांगतो माझ्यासाठी कोणत्याही जिवंत तीन व्यक्तींनी स्व इच्छेने दोन थेंब रक्त सांडलं तरच माझी मुक्तता होऊ शकते "

" फक्त दोन-तीन थेंब रक्त आम्ही बाटली बाटली रक्त दान करतो "

" तसं नाही पण माझ्यासाठी तुम्हाला उगाच त्रास कशाला "

" आहो दोन-तीन थेंब रक्ताने तुमची मुक्तता होणार असेल तर ते काहीच नाही "

" पण तुम्हाला एक मंत्र म्हणावा लागेल"

" म्हणजे ओम फट स्वाहा यासारखा "

" नाही नाही तसं नाही अगदी अंतर्मनातून म्हणा की हे मी माझ्या स्वतःच्या इच्छेने देत आहे "

" इतकच अण्णा तो चाकू इकडं " गण्याने चाकू घेत हाताला एक रेष मारली व त्यातून रक्त प्रवाह होऊ लागला

गण्या म्हणाला “ हे रक्त मी स्व इच्छेने देत आहे ”

मन्या आणि राम्याने ही तसेच केले दोन-तीन थेंब पडले तसे आसपासचं जग पाण्यात रंग विरघळावे तसे विरघळु लागलय. तो पादरी, तो चर्च किंवा बंगला त्यांचे मित्र आणि बाकी सारं विरघळून गेलंय. उरला फक्त अंधार, घनदाट अंधार, काळा अंधार. काळोखात दूर कूठेतरी प्रकाशाची शलाका चमकली अंधकारात सर्वत्र पांढराशुभ्र प्रकाश पसरू लागला. बरोबरच एक मंद सुगंध आसमंतात भरून राहिला. त्या सुगंधा बरोबर एक सुकोमल मधुर आवाज, किती सुंदर ऐकवत राहवा असा आवाज. काही कळत नव्हतं तो आवाज काय पुकारतोय पण किती छान वाटत होतं ऐकायला. हळूहळू कळू लागलं

“ गणेश गणेश उठ नारे!

“ गणेश अरे गणेश....

गण्याचं नाव एवढ्या चांगल्या प्रकारे पुकारलं जाऊ शकतं याचं गण्याला अप्रुप वाटू लागलं. आणि भानावर येत डोळे उघडले. त्याच्या डोळयासमोर एक अत्यंत सुंदर स्त्रीचा चेहरा होता कशासारखा चेहरा चेहरा दिसतोय याचा विचार न करता, त्या चेहऱ्याची सुंदरता पाहण्यात त्यानं मन गुंतवलं. त्या मुखड्याचे सौंदर्य त्यांनं काळजात साठवून घेतलं. ती त्याला काहीतरी सांगत होती, ते त्याला काहीच कळत नसलं तरी तिच्या ओठांची होणारी हालचाल त्याला मोहक वाटत होती. बोलताना चेहऱ्यावर येणारे केसाची बट हळुवार पणे मागे सारणारी तिचे कोमल हात सारे काही सुंदर होते. तो सुंदरतेचा आस्वाद घेत होता

गण्याला आजूबाजूच्या परिसराची जाणीव झाली. त्याच्या आजूबाजूला कोणीच नव्हते. तो एकटाच होता. तो त्या घरातही नव्हता. तो बाहेर होता. जंगलात आणि एकटाच.

पण तरीही त्याला भीती वाटत नव्हती एक वेगळीच सुरक्षिततेची भावना मनात होती. ती सुंदर मुलगी तिथे दिसत नव्हती. त्याने इकडे तिकडे पाहीले, पण ती कुठेच नव्हती. तेव्हाच आवाज आला....

" गणेश लक्ष देऊन ऐक तुझं नि तुझ्या मित्रांचं आयुष्य तुझ्या वरती अवलंबून आहे. तुला जर जगायचं असेल तर मी सांगते तसं कर....

" कोण, कोण? आहात तुम्ही आणि कुठे आहात...?

" ते सांगायला माझ्याकडे वेळ नाही. मी सांगत आहे तेवढं एक, नाही ऐकलं तर तुझा मृत्यू निश्चित आहे.

" हे जे तू पाहत आहे ते स्वप्न आहे. ;जेव्हा तू जागा होशील तेव्हा त्याच घरात असशील. तुझ्या मित्रांना तुला शुद्धीवर आणावं लागेल. आणि जेवढं लवकर शक्य होईल त्या घरातून बाहेर पडावं लागेल. घरातून बाहेर पडताना तेथील भांड्यावर झाकण ठेवायला विसरू नको. आणि बाहेर पडल्या नंतर पिवळया कंदिलाच्या मागे जा. तो कंदील तुला जंगला बाहेर जाण्याची वाट दाखवील. जर तु घाइ केली नाहिस तर तुझा मृत्यू निश्चित आहे "

मृत्यू निश्चित आहे.... हेच वाक्य त्याच्या कानात मध्ये घुमत राहिले नि तो शुद्धीवर आला. एक भयानक दुर्गंधी त्याच्या सभोवताली भरून राहिली होती. कुजलेल्या मासाची. त्याला ठसका लागला. तो उठू लागला तसं त्याला चक्कर आल्यासारखं जाणवलं. त्याच्या हातातून संततधार लहानसा रक्तप्रवाह सुरूच होता. तो प्रवाह विचित्रपणे वाहत होता. हातातून ठिबकणारा रक्ताचा थेंब जमिनीवरती पडतच नव्हता. तो थेंब हवेतूनच वाहत जात, तिथेच ठेवलेल्या एका भांड्यामध्ये जमा होत होता, त्याने खिशातून रुमाल काढून हाता भोवती बांधला. मन्या व राम्या बेशुद्ध होते. त्यांच्या हातातून तो रक्तप्रवाह तसाच वाहत होता.

त्याने मन्याला व राम्याला उठवायचा प्रयत्न केला पण दोघेही शुद्धीवर येत नव्हते. त्याने पाण्यासाठी शोधाशोध सुरु केली तिथे कुठेच पाणी नव्हते. मग तो बाहेर गेला आणि त्याला

पाण्याचे डबके सापडले. त्याने तेथील पाणी आणून त्याच्या तोंडावर शिंपडले आणि मन्या शुद्धीवर येत हलचाल करू. पण राम्या अजूनही बेशुद्ध होता.

" काय झालं गण्या एवढा कसं काय भेलेला आहे? " शुद्धीवर येत मन्या म्हणाला

गण्याने घडलेला सर्व वृत्तांत मन्याला सांगितला.

" म्हणजे पाद्री आपल्याशी खोटं बोलला की काय ..?

पण खोटं बोलून त्याला काय मिळणार आहे. मारायचं असतं तर त्याने आपल्याला तेव्हाच मारलं नसतं का.? " मन्या गण्याला म्हणाला.

" जरा तुझ्या हातात कडे बघ रक्त कसं उडत आहे. ही काही तरी बेकारच भुताटकी दिसत आहे. पटकन काहीतरी बांध हाताला. " गण्या म्हणाला

"हाताला बांधून काही उपयोग नाही गण्या. बघ जरा तुझ्या हातात कडे बांधलेल्या रुमालामधून सुद्धा रक्ताचे थेंब त्या भांड्याकडे जात आहेत..... "

गण्याने हाताला रुमाल बांधून देखील त्या रूमलातुन रक्त ठिपकत होते व त्या भांड्याकडे जातच होते. जरी रूमलातुन रक्त ठिपकत होते तरीही त्या रुमालाला एक थेंबही रक्त लागलेले नव्हते. तो पांढरा शुभ्र होता.

आठव तिने अजून काहीतरी सांगितलं असेल. गण्याने आठवून पाहिलं तरीही त्याला काहीच आठवेना.

" काय सुद्धा आठवत नाही लगा... "

तेव्हाच एक विचित्र आवाज तिथे घुमू लागला.

घुं ss घुंss..... दोघांच्याही पोटात भीतीने गोळा आला. राम्या अजून बेशुद्धच होता. काहीतरी करायलाच पाहिजे होतं. मन्या तावातावाने त्या भांड्याकडे गेला. ते भांड त्याने आदळून आपटलं. ते काचेचं असल्याने तुकडे झाले आणि रक्ताचे शिंतोडे सर्वत्र उडाले. एका भयानक दुर्गंधीबरोबर एकाच वेळी कितीतरी जणांची रडल्याचे, ओरडण्याचे, प्राणांतिक किंकाळयांचे आवाज येऊ लागले, आणि या साऱ्यांच्या पार्श्वभूमीला मघाशीचा घुं घुं घुत्कार होताच.

2 सेकंदात असं काहीतरी घडून गेलं की ते दोघालाही कळालं नाही. ते भांडं होतं तिथेच होतं. तुकडे झालेलं भांडण पुन्हा जुळालं कसं? सर्वत्र उडालेले रक्ताचे शिंतोडे गायब झाले होते. ते रक्त आहे तसं भांड्यात जमा झालो होतं. घुं ss घुंss चा घुत्कार सोडला तर बाकी सारे आवाज बंद झाले होते. गण्याला व मण्याला अजून बऱ्याच ठिकाणी अजून जखमा झाल्या होत्या.

गण्या मधूनच ओरडला " आठवलं "

व त्याने तिथेच ठेवलेल्या झाकण भांड्यावर ती झाकून टाकले. तेव्हा त्यांच्या हातातून ठिबकणारे रक्त बंद झाले. कोणीतरी त्यांच्या शिकारीला आलं होतं घुंss घुंss चा आवाज कानाचे पडदे फाडत होता. त्यांनी दोघांनी राम्याला उचललं. ते पटकन घराबाहेर पडले. पण घरातून येताना राम्याच्या हाताचा धक्का लागून ते झाकण खाली पडले. मात्र त्या दोघांनाही ते कळालं नाही.

घरा बाहेर पडल्यानंतर त्यांना समोरच पिवळी मशाल दिसली त्या मशालीच्या मागे ते दोघेही निघाले. पण गन्या विसरला की त्याला कंदिलाच्या मागे जायचे होते जो उजव्या बाजूला थोड्या लांब अंतरावर होता.

मन्या व गण्या राम्याला घेऊन जात होते. त्या मशालीच्या पाठोपाठ. राम्या अजूनही बेशुद्ध होता. त्यामुळे दोघांनी मिळून राम्याला उचललं होतं. राम्याच्या ओझ्यामुळे त्यांची चाल मंदावली होती. मशाल असली तरी तिचा थोडा थोडका प्रकाश काळोखात हरवून जात होता. त्यातच वाटही व्यवस्थित नसल्याने सारखे धड-पडत होते दोघेही. ठेच लागून त्यांच्या पायाला जखमा झाल्या होत्या. खोलीतून येताना भांड्याचं झाकण खाली पडलं होतं. त्यामुळे अजूनही थोडं थोडं रक्त उडत-उडत जाऊन तिथे पडत होतं. मात्र याची जाणीव त्यांना अजिबात नव्हती. त्यांना फक्त एवढंच वाटत होतं की आपण येथून बाहेर पडणार..... ।

" गन्या लगा तुझ्यामुळे आपण इथं फसलो, नाही तर लागा आतापतुर आपण ऑर्केस्ट्रात धमाल मस्ती करून घरी झोपलो असतो.....

" मन्या लगा मला तर काय माहित असं काय असेल म्हणून..

मात्र अचानक पुढे असलेली मशाल गायब झाली. दोघांच्याही काळजाचा ठोका चुकला. इतका वेळ उजेडाला सरावलेले डोळे अचानक आलेल्या अंधारामुळे काही सेकंदासाठी आंधळेच झाले. मग हळूहळू थोड्या अंतरावर जत्रेसाठी लावलेले दिवे, गावातील घरातील प्रकाशाचा झगमगाट दिसू लागला आणि त्यांना हायसे वाटले. त्यांनी आपला वेग वाढवला व पटापट गावाकडे सरकू लागले. त्यांच्या जीवात जीव आला. त्यांनी देवाचे व त्या मुलीचे जिने स्वप्नात येऊन मार्ग दाखवला, दोघांचेही मनापासून आभार मानले.

आता त्यांची खात्री पटली होती की भूत नावाची गोष्ट असते व त्याची भीती कितीही नाही म्हटलं तरी आपोआपच वाटते. पण आता ते सुरक्षित होते . जंगलातून बाहेर आल्यावर समोरच थोड्या अंतरावरती देऊळ होते. तिथेच बाजूला बसायला एक कट्टाही होता. त्याच कट्ट्यावर त्यांनी राम्याला झोपवले व दोघेही बसले.

" मन्या जा रं चांगलं बादली भरून पाणी आण, कसलं बेशुद्ध झालयं राम्या, त्याला शुद्धीवर आणायला पाहिजे.

" थांब गण्या. दोन मिनिटात आणतो.

मन्याने पाणी आणल्यावर त्याचा सपकाऱ्याने राम्याच्या तोंडावर मारले. तेव्हा राम्या शुद्धीवर आला.

गण्या म्हणाला "लेका राम्या तुला माहित हाय का आपण कसलं बेकार भुताच्या तावडीत सापडलो होतो.. "

राम्या " पण पाद्री तर चांगलं भुत होत होतं ना मुक्त झाला का ती पाद्री.... "

मण्या " अरे कसला मुक्त होतोय तो. त्याचाच डाव होता सारा. दोन थेंब म्हणून किती रक्त काढलं बेशुद्ध करून कुणास ठाऊक ? "

राम्या " पण त्याला मारायचं तर त्यांना तेव्हाच आपल्याला मारलं नसतं का? बेशुद्ध करून रक्त काढायचा काय उपयोग?? "

गण्या " काय माहित काहीतरी प्रथा असेल बळी द्यायची वगैरे "

राम्या " अरे पण मग आपण वाचलो कसे? "

मण्या " अरे गण्याच्या स्वप्नात एक पोरगी आली बेशुद्ध असताना तिने सांगितलं काय करायचं ते. "

राम्या " कुठली पोरगी?

गण्या "ते मला पण माहित नाही पण तिनं सांगितलं तसं केलं म्हणूनच आपण वाचलो."

राम्या " गण्या रुमाल कशाला बांधलाय हाताला काय लागलं का काय? "

गण्या " अरे बाबा काय सांगायचं तुला रक्ता वरती सुद्धा भुताटकी चालत होती रक्त हवेत उडत होतं.. "

मण्या " गण्या जरा नीट बघ अजून पण रक्त पडतेच आहे..

अजुनही रक्त वाहत होतं जंगलाच्या दिशेने.

मन्या म्हणाला " पण ते कसं काय शक्य आहे? आपण तर गावात आलो ना? जंगलाच्या बाहेर "

राम्या म्हणाला " आपण कोणीतरी जाणकार माणूस गाठायला पाहिजे "

गण्या म्हणाला " आपण गावात आलोच नाही. गावात देऊळ कधी रिकाम नसतं. दोन-चार म्हातारी बारा महिने पडीक असतात देवळात. पण आता कोणीच नाही. "

" होय लगा आज ऑर्केस्ट्रा आहे पण कुठल्याच गाण्याचा आवाज येत नाही " मन्या म्हणाला

" अरे ती गोष्ट सोड कुत्रा, मांजर, किडा-मुंगी काय तरी दिसतय का तुला..? " राम्या

" अरे तुम्ही सगळं सोडा रातकिड्यांची किरकिर सुद्धा ऐकू येत नाही. किती विचित्र आहे...? " गण्या म्हणाला

" गण्या, मन्या दोस्तांनो ही चकवा तर नसेल ना चकव्यातून बाहेर कधीच जाऊ शकत नाही माणूस " राम्या

" चला आपण देवळात जाऊन मग कुठलं भुत देवळात येतंय? " मन्या

" अरे येडाय काय तू? ही देवळपण भुतानंच बनवलेलं असणार...? " गण्या

राम्या म्हणाला " मग आपण करायचं तरी काय? आपण वाचणार तरी कसं? "

पण अचानक कोलाहाल वाढला. चित्र-विचित्र आवाजा बरोबर अनेक मितीमध्ये अनेक घडामोडी सुरू झाल्या. पण त्यांच्या मानवी डोळयांना एवढंच दिसत होतं की सारे काही नष्ट होत होतं. व त्यांच्याकडे गोलाकार आकारात मध्ये येत होता तो काळोख, मिट्ट काळोख. तो काळोख त्यांच्याभोवती गोलाकार पसरत गेला होता. तो काळोख, त्यात काय होतं काय माहित? पण जे काही होतं ते अमानवी, पाशवी आणि क्रूर होतं. जी काही शक्ती होती ती मानवी डोळयांना, मनाला, बुद्धीला न समजणारी होती. जे काही त्यांच्या मानवी ज्ञानेंद्रियांना जाणवत होतं ते त्या शक्तीचा थोडासा भाग होता. ज्याच्या पुढे मानव हतबल होता. इतका वेळ पुढे सरकणारा तो गोलाकार काळोख थांबला. कोलाहलाचा स्वर उच्च कोटीला पोहोचला. कोणतही हिंस्र श्वापद शिकारीला खाण्यापूर्वी मौज म्हणून तिच्याशी खेळ करते तोच खेळ आता त्या तिघांबरोबर होणार होता.

काळोखातून चित्र-विचित्र गलिच्छ स्वर उमटत होते. जे तिघांच्याही कानाला कर्णकर्कश्य वाटत होते. जो प्रसंग तिघांवर ओढवला होता तो अकल्पनीय होता. अचानक काळोखातील आवाज थांबला व त्याच बरोबर त्यांच्या आजूबाजूला एक भयानक दुर्गंधी पसरली.

थंडी हळूहळू वाढू लागली व त्यांचे दात कडकडू लागली. नक्कीच काळोखातून कुणीतरी पुढे आलं होतं. त्यांच्यासोबत खेळ करण्यासाठी. आता हे शिकार करणार होतं. शिकारी ची मजा घेणार होतं. तिघांनीही एकमेकांचे हात घट्ट पकडले. त्यांना समोर एक भयानक, क्रूर, निर्घुन, बिभत्स मृत्यू दिसत होता. एक वेळ मृत्यू बरा पण हा अघोरी नरक होता. मृत्यू नंतरही अमर्याद काळासाठी दास्यत्व व भयानक वेदना.

भयानक शांतता जीवघेणी होत होती. त्यांच्या काळजाच्या ठोक्याच्या आवाजाने सुद्धा ते घाबरत होते. अचानक गण्याच्या हाताला हिसका बसला. त्याने पाहिलं राम्या काळोखाकडे खेचला जात होता.

" मन्या राम्याला ओढ "

मन्या जागचा हलला नाही. त्याच्यापर्यंत आवाज पोहोचला नाही. तो स्तब्ध होता. एकाच अवस्थेत, पुतळ्यासारखा, आणि राम्या हवेत खेचला जात होता त्या काळोखाकडे. राम्याला मृत्यू समोर दिसत होता तो जिवाच्या आकांताने किंचाळत होता, ओरडत होता, वाचवा म्हणत होता पण एकटा गण्या काय करू शकत होता?

अशाच वेळी मानवी भावनांचे रूपांतर होतं शक्ती मध्ये शस्त्रा मध्ये. तीच शक्ती, तीच शस्त्रे मानवाला बळ देतात कशाशीही युद्ध करण्याचे, कशाशीही लढा देण्याचे, तेच बळ गण्याच्या अंगी साकारले. त्याने एक जोरात हिसका देऊन राम्याला खाली ओढून घेतले. तेव्हा काळोखात एकच कल्लोळ माजला. नेहमी जिंकणाऱ्या खेळाडूला हरवल्यानंतर निघतो तसा आवाज असावा.

पुन्हा एकदा एक मोठी किंकाळी ऐकु आली आणि पुन्हा निरव शांतता . या वेळी पुन्हा राम्या हवेत उडाला. ज्याप्रमाणे लोखंड चुंबकाकडे धाव घेते तसा राम्या काळोखाकडे ओढला जाऊ लागला. मात्र यावेळी गण्याची ताकद कमी पडली. राम्या काळोखात विलीन झाला आणि गणाच्या हातात राहिला त्याचा मनगटापासून तुटलेला हात. जो राम्याने गच्च आवळला होता गण्याच्या हाताभोवती. त्याच्यातून रक्त ठिपकत होतं.

पुन्हा एकदा काळोखात गलका झाला आता पुढची शिकार होणार होती गण्याची किंवा मन्याची....

मन्या अजून पुतळ्यासारखा स्थिरच होता. गण्या त्याला ओरडत होता पण काही उपयोग नव्हता. पण तरीही गण्याने त्याचा हात सोडला नाही घट्ट दाबुन धरला. पण यावेळी गण्या काळोखाकडे खेचला जाऊ लागला.

आणि अचानक सर्वत्र प्रकाश चमकू लागला. नष्ट झाला काळोख आणि सर्वत्र प्रकाशाचे साम्राज्य पसरले. सामान्य माणसाला एवढचं दिसत होतं की जी काही दुष्ट शक्ती होती, ती नष्ट झाली होती. तिला नष्ट केलं होतं कुणी तरी चांगल्या शक्तीने. पण एका घटनेमागे हजारो वर्षापासून चालत आलेला चांगल्या-वाईटाचा संघर्ष पुन्हा एकदा समोर आला होता. त्या संघर्षात समावेश होता मानवाला न समजणाऱ्या गोष्टीचा. फक्त त्याला दिसत होता जय आणि विजय. पडद्यामागच्या घडामोडी त्याला न कळणाऱ्या होत्या.

आणि हवेत उडालेला गण्या धपकन खाली आपटला तो काळोख गेला होता. ते भुताटकी गाव गेलं होतं. ते पुन्हा जंगलात आले होते. मन्याही हालचाल करू लागला. पण हे सारं झालं कसं ? कुणी केलं?

तेव्हाच त्यांच्या समोर राम्या उभा राहिला. त्याच्या सर्वांगाभोवती पांढऱ्या प्रकाशाचं वलय होतं. चेहऱ्यावरती समाधान होतं. तो राम्याचा आत्मा होता. राम्याचा मृत्यू झाला. पण त्याने दोघांचाही जीव वाचवला. दोघालाही अश्रू अनावर झाले. दोघेही मिठी मारायला पुढे सरले. पण शेवटी तो आत्मा होता .

" व्हायचं ते होऊन गेलं आता रडू नका " राम्या म्हणाला

" राम्या लगा माझ्यामुळे तू मेला, खरं म्हणजे मीच मरायला पाहिजे होतं " गण्या

" अरे गण्या घडायच्या असतात त्या गोष्टी घडून जातात स्वतःला दोष देऊ नको " राम्या

" लगा मला तर काहीच आठवत नाही "

मन्या रडत बोलला " गण्याने तुला वाचवायचा तरी प्रयत्न केला पण मी काहीच केलं नाही "

" असुदे हेच होतं माझ्या नशिबात तुम्ही स्वतःला दोष देऊ नका " राम्या

" अरे पण आपण जिवंतपणी त्याच्याशी सामना करू शकलो नाही, मृत्यूनंतर अशी कोणती गोष्ट घडली की ज्यामुळे त्यांना हरवलं. " गण्या

" अरे मी काहीच केलं नाही ही सगळी शेवंता ची जादू आहे " राम्या

" काय " दोघेही एकदम ओरडले " म्हणजेच शेवताचं भूत आहे "

" अरे तुझ्या स्वप्नात आलेली दुसरी तिसरी कोणी नव्हती ती शेवंताच होती " राम्या

" होय गणेश मीच होते शेवंता "

गण्याने आवाजाच्या दिशेने पाहिले आणि पाहतच राहिला

" मला काहीच शक्य नव्हतं अरे शेवंता होती म्हणून हे शक्य झालं " राम्या

" मी फक्त तुला मदत केली तीही अगदी थोडीशी. तुझ्या मनात इच्छा होती तुझ्या मित्रांना वाचवायचे. म्हणूनच मी छोटीशी मदत करू शकले. आणखी एक गोष्ट आपण त्यांना नष्ट केलेलं नाही " शेवंता

" म्हणजे पाद्रीचं भूत अजूनही आहे " तीघेही एकदमच म्हणाले

" हो अजून सारं काही जिथल्या तिथे आहे. तुम्हाला फक्त काही वेळ मिळालाय येथून जाण्यासाठी. आणि हे सारं काम जॉनचं नाही. " शेवंता

"जॉन म्हणजे? "

" पाद्री तुमचा. त्याचं नाव जॉन. तो फक्त बाहुलं आहे त्या विशाल शक्ती च्या हातातलं. जिचा काहीतरी उद्देश आहे. ज्या उद्देशासाठी मागच्या दीडशे वर्षांपासून मी या जंगलात भूत बनून फिरत आहे. माझी मुक्ती झाली नाही " शेवंता

" पण पादरी तर म्हणत होता की तुमच्या वडिलांनी डांबून ठेवलं होतं तुम्हाला. तुम्ही नंतर अन्नत्याग केला. त्यामुळे तुमचा मृत्यू झाला व तुम्ही मुक्त झाला. त्यानंतर पाद्रीच्या भुताने तुमच्या वडिलांना मारले. " गण्या

" बरोबर आहे तुमच्या वडिलांनी पाद्रीला मारलं नसतं तर हे सगळं झालं नसतं " मन्या

" कोण म्हणालं तुम्हाला बाबांनी जॉनला मारलं आणि मी आत्महत्या केली. हे सारं खोटं आहे " शेवंता

" पण मग झालं तरी काय होतं? कोणी मारलं तुम्हाला नि तुमच्या बाबांना आणि पाद्रीलाही " गण्या

" मला एवढंच माहिती आहे की मला जॉनने मारलं. पण बाबांना व जॉनला कोणी मारलं हे माहीत नाही " शेवंता

" काय पाद्रीने मारलं तुम्हाला " मन्या

" हो "

" पण तुमचं प्रेम होतं ना त्याने तुम्हाला का मारलं? " गण्या

"जॉननेच मारले मला. आपल्याकडे जास्त वेळ नाही, तुम्ही पटकन निघा अन्यथा तुमचा ही जीव जाईल. " शेवंता

" नाही त्याने आमच्या राम्याला मारले. त्याला आणि असं सोडणार नाही " मन्या

" होय ज्याने आमच्या राम्याचा अंत केला, त्याचा अंत केल्याशिवाय आम्ही जाणार नाही " गण्या

" गण्या मन्या असं करू नका लगा हो. जोपर्यंत तुम्ही जंगलातून सहीसलामत बाहेर जाणार नाही तोपर्यंत मला मुक्ती मिळणार नाही. तुम्ही शेवंताचं ऐका पटकन बाहेर पडा " राम्या

" इतकी वर्ष आपण एकत्र राहिलो आता मरण आले तरी येऊ दे, एकत्रच मरू " गण्या

" तुम्ही सांगा काय झालं ते " मन्या

" तुम्हाला काय माहित आहे आणि काय माहित नाही हे मला माहित नाही. तुम्हाला किती खरं किती खोटं माहित आहे हे ही मला माहित नाही. आता मी सांगणार आहे याची सुरुवात कुठे झाली? यासाऱ्या घटनांचा इतिहास काय आहे? "

" मी पाटलाची मुलगी . आमच्या घरात परंपरागत पाटिलकी चालत आली होती. आमचं घर बऱ्यापैकी सधन. बाबांचही बऱ्यापैकी शिक्षण झालं होतं. त्यावेळी गावात शाळा नव्हती म्हणून लहानपणापासूनच त्यांनी मला त्यांच्या मित्रांच्या म्हणजेच सदू काकाच्या घरी मुंबईला शिकायला ठेवलं होतं. मी तिथेच लहानाची मोठी झाले. फक्त सुट्टी पुरतं गावात यायची. माझ्या शालेय शिक्षण पूर्ण झालं. बाबांच मत होतं की आता बास करावं शिक्षण. पण काकांनी बाबांना समजावलं की कॉलेज पूर्ण करू दे. इतक्या वर्ष शिकवलं, थोड्यासाठी माघार नको.

"मी कॉलेजला जाऊ लागले. हेच माझ्या आयुष्यातील सोनेरी क्षण होते. हातातील वाळू कशी निघून जावी तसे हे क्षण झटपट निघून गेले. पहिल्याच वर्षी माझ्या आयुष्यात जॉन आला. तो प्रोफेसर होता. तरुण होता, सुंदर होता, छान दिसायचा, छान राहायचा. काळी पॅंट, पांढरा शर्ट त्याच्यावरती काळा कोट, पायात शूज, एका हातात पुस्तक नि दुसऱ्या हातात पाईप. सारं कसं छान वाटायचं. असं वाटायचं की जॉनने शिकवत राहावं आणि मी असंच शिकत राहावे. त्याच्या पहिल्या लेक्चर पासून मी त्याची दिवानी झाले होते. म्हणून मी नंतर काही ना काही कारण काढून त्याच्या बरोबर जास्त वेळ घालवू लागले . सुरुवातीला मला वाटायचं की तो मला टाळायचा प्रयत्न करतो पण नंतर तो ही माझ्यात मिसळू लागला. आमचा एकमेकांबरोबरचा वेळ वाढत होता. आम्हाला माहीत होतं आम्ही दोघंही एकमेकांच्या प्रेमात पडलो.

पण प्रश्न होता प्रपोज करण्याचा. मग एक दिवस त्यानेच मला प्रपोज केला. मी नाही म्हणायचा प्रश्नच नव्हता. मी हो म्हणाले पण त्याला भलतीच गडबड होती. तो सरळ सदु काकाच्या घरी आला आणि लग्नाची मागणी घातली. मला माहित नव्हतं सदूकाका काय म्हणतील? पण काय आश्चर्य ते हो म्हणाले. त्यांचा काही आक्षेप नव्हता. पण त्यांच्या मते बाबा तयार झाले नसते.

मग सदू काकांनीच जॉनला पाद्री बनवून गावात जाण्याची कल्पना सांगितली. कारण जेव्हा सदूकाका नि बाबा एकत्र शिकायला होते तेव्हा ते दोघेही चर्चमध्ये प्रार्थनेला जात असत. तिथला पाद्री जो काही सांगेल ते बाबा लक्ष देऊन ऐकायचे. काही अडचण आली तर तो सांगेल तसे उपाय करायचे. पाद्री लोकांविषयी बाबांच्या मनात अपरंपार आदर होता. म्हणूनच पाद्री बनून जर मला मागणं घातलं तर ते नाही म्हणणार नाहीत अशी अटकळ आम्ही बांधली . खरंतर

ही कल्पना इतकी चांगली नव्हती पण जॉन पाद्री म्हणून गावात यायला तयार झाला. त्यामुळे आम्ही बाकीचा जास्त विचार न करता याच योजनेवर अंमलबजावणी करण्याचे ठरवले.

"मी पुढे आले नंतर महिन्याभराने जॉन आला. आल्या आल्या सरळ आमच्या घरी आला. कारण गावात काय करायचं झालं तर बाबांची परवानगी घेणं आवश्यकच होतं. त्या दिवशी आमच्या घरीच राहिला त्याने बाबांना काय काय सांगितलं काय माहित? पण बाबा अगदी खुश झाले. त्यांनी चर्च बांधायला सुरुवात केली त्याचबरोबर जॉनसाठी दोन खोल्या बांधायला चालू केल्या. जॉन मराठी चांगल्या प्रकारे बोलायचा. लोकांमध्ये फिरायचा, त्यांना चार गोष्टी सांगायचा, रविवारी चर्चमध्ये प्रार्थनेला बोलवायचा. प्रार्थना झाल्यानंतर कधी कपडे, कधी मिठाई काही ना काही वाटायचं. तो गावाचा चर्चेचा विषय झाला होता. बाबांचं त्याच्याविषयीचं मत चागलं झालं होतं. सदू काकांना जाऊन ज्याने माझी मागणी घातली होती तो जॉन बाबांना माझी मागणी घालायला घाबरत होता. तो दिवस पुढे ढकलत होता. मग एक दिवस सदूकाकाचं पत्र आलं. बाबांना त्यांनी आमच्या विषयी सर्व सांगितलं होतं. त्यांचा आणि बाबांचा पत्रव्यवहार चालू होता तेव्हा त्यांनी याबाबत सर्व काही बाबांना कळवलं होत. त्यांनी आम्हाला फक्त त्यांच्या समोर जाऊन उभा राहायला सांगितलं होतं.

" अरे जॉन एवढं सारं करायची काही गरज नव्हती. तू जरी सरळ मागणी घातली असती तरी मी नाही म्हणालो नसतो. "

त्यांच्या दोघात बरीच चर्चा झाली बाबा शेवटी म्हणाले

" पण लग्न लग्न मात्र आमच्या पद्धतीने होणार बर का? अगदी पद्धतशीर.....! "

" मग आमचा साखरपुडा झाला. जॉन अनाथ होता म्हणून त्याच्या बाजूने सदू काका व काकू होत्या . साखरपुड्यानंतर जत्रा आली म्हणून हळदी व लग्न पुढे ढकललं. त्याकाळीही जत्रा

खूप मोठी व्हायची. भरपूर दुकानं लागायची. अगोदरच मी पाटलाची मुलगी आणि बरोबर गोरा साहेब त्यामुळे सारेजण आमची बडदास्त ठेवत होते. आमचं सारे काही राजेशाही थाटात चालू होतं. खरंच तो जत्रेतील दिवस माझ्या आयुष्यातला अत्यंत सुखाचा व आनंदी दिवस होता. पण तो आनंद पुढे येणाऱ्या दुःखाची नांदी सांगत होता हे मला माहीत नव्हतं. कारण पुढे जे काही झालं ते खूपच दुःखदायक होतं .

" त्या रात्री कुणातरी क्रांतिकारकांचा गट जॉनला उचलून घेऊन गेला. मी फार घाबरले मला वाटत होतं आता जॉनचा जीव वाचणार नाही. मी तेव्हा ग्लानी येऊन बेशुद्ध पडले. शुद्धीवर आले तेव्हा कळालं जॉन जिवंत होता आणि ज्यांनी जॉनला नेलं होतं ते क्रांतिकारी नव्हते दरोडेखोर होते. त्यांनी जॉनकडे जे काही सोनं होतं ते लुटून त्याला बेशुद्ध करून गावाबाहेर टाकून दिलं होतं.

पण त्या दिवसानंतर जॉन पूर्ण बदलला. इतक्या दिवस मी ज्या व्यक्तीला ओळखत होते ती व्यक्तीच मला दिसली नाही. मला वाटायचं हे शरीर फक्त जॉनचं आहे पण त्याच्या वरती नियंत्रण दुसऱ्या कोणाचं तरी आहे. मी कोणाला बोलले नाही. मला वाटलं तो घाबरला असेल होईल हळूहळू सारं काही व्यवस्थित. पण बाकी कोणालाच काहीही फरक जाणवत नव्हता.

अशातच आमची हळदी झाली. अगोदरच गोरा-गोमटा असलेल्या जॉनला जेव्हा हळद लागली तेव्हा ते ध्यान पाहण्यासारखं होतं. मी तर नुसती हसत सुटले. एरवी चेष्टा मस्करीला खळखळून हसून दाद देणारा जॉन मख्खासारखा गप्प बसून होता. त्याचं वागणं दिवसेंदिवस फारच विचित्र होत चाललं होतं .

हळदीचा कार्यक्रम उरकल्यानंतर तो मला म्हणाला

"सगळे झोपल्यावर मळ्यात ये, माझ्या खोलीवर, मला काहीतरी सांगायचं आहे, please come "

मला माहित होतं तो बोलावून त्याला कशाचा त्रास होत आहे हे सांगेल. म्हणून मी सगळे झोपल्यानंतर घराबाहेर पडले आणि मळ्यात जाऊन पोहोचले. मी मळ्यात पोहोचले तेव्हा

रात्रीच्या अडीच किंवा तीन वाजले असतील. मी दार ठोठावलं. पण त्याने उघडलं नाही मी ढकलून पाहिला तर उघडंच होतं.

मी आत गेले. सर्व घरात फुलांचा सुगंध दरवळत होता जॉनने चक्क घर सजवलं होतं.

" जॉन sss जॉन sss काय हा वेडेपणा.. घर का सजवले? "

अचानक मला कोणाची तरी मिठी पडली. मी घाबरत होते पण तो जॉन होता

" We are going to marry dear

उद्या आपले लग्न होणार आहे "

" उद्या होणार आहे ना. आज का सजवले? "

" कारण उद्या तू नसशील ..... "

तो इतक्या थंड पाणी हे वाक्य बोलला की माझ्या जिवाचा थरकाप उडाला.

" काय काहीही काय बोलतोय? "

त्याचे उष्ण श्वास मला माझ्या मानेला जाणवत होते

" म्हणजे उद्या तू माझी प्रेयसी नसशील बायको असशील "

त्याने त्याचं बोलणं सावरून घेतलं पण तो थंडपणा मला घाबरूवून गेला होता. मी स्वतःला त्याच्या मिठीतून सोडवून घेतलं

" हे सांगायला बोलवले का तू मला..

" नाही"

असं म्हणत त्याने मला ओढून घेतले व माझ्या ओठावर ओठ टेकवले. त्यापुढे जे काही झालं त्यावरून मला इतकं कळालं की तो जॉन नव्हता. त्याचं फक्त शरीर होतं.

त्याचे वासनेने बरबटलेली डोळे नंतर काळेकुट्ट झाले. हळूहळू खोलीतल्या संगंधाची जागा दुर्गंधीने घेतली. कसली घाणेरडी दुर्गंधी होती. नंतर नंतर त्याच शरीर पण सडत गेलं. त्याच्या सर्वांगावर काळेकुट्ट डाग पडले. नंतर-नंतर ते मानवी शरीर नष्ट होत गेलं व त्याठिकाणी अमानवी अतिंद्रिय शक्ती अवतरली. ती नक्कीच क्रूर होती. भयंकर होती. भीतीदायक होती. तिच्या बाहुपाशात माझं शरीर आवळलं गेलं होतं. कसलातरी तरी केसाळ, लबलबित, घाणेरडा, दुर्गंधीनें भरलेला असा तो आकार माझ्या शरीराचा यथेच्छ उपभोग घेत होता. मी काहीच करू शकत नव्हते. त्या दुष्ट शक्तीपुढे मी काहीच नव्हते. अगदी कागदी कस्पटाप्रमाणे होते.

फक्त मला एवढच कळत होतं तो जॉन नव्हता ते शरीरही जॉनचं नव्हतं . त्या रात्री मी नेहमीसाठी निद्रिस्त झाले.

" पण ज्यांच्या शरीरात जे कोणी होतं त्याने तुम्हाला का मारलं? " गण्या म्हणाला

" ते मलाही माहीत नाही. ते जे काही आहे त्याच्यामुळेच मी अजूनही मुक्त झालेली नाही. त्यांनेच मला बंदिस्त केलेले आहे.

" पण तो आहे तरी कोण?

" मीच तो " एक खर्जातला खरखरीत आवाज. कोणीतरी आपल्या लांब नखाने लोखंडावर घासल्यावर येईल तसा, कानाला कर्णकर्कश्य व कटू वाटणारा असा आवाज आला

" मीच तो " एक खर्जातला खरखरीत आवाज, कोणीतरी नख्यांनी लोखंडावर घासल्यावर येईल तसा आवाज आला.

" मीच तो ज्याने गण्याला जंगल जाळण्यापासून रोखले.

" मीच तो ज्याने तुम्हाला तिघांनाही त्या बनावट चर्चमध्ये नेलं

" मीच तो ज्याने शेवंताच्या मृत्यूची खोटी गोष्ट सांगून तुम्हाला फसवून तुमचं रक्त घेतलं

" मीच तो ज्याने शेवंताला गण्याच्या स्वप्नात प्रवेश करू दिला

" मीच तो, जो मशाल दाखवून तुम्हाला इथं घेऊन आला

" मीच तो काळोख ज्याने राम्याचा अंत केला

आणि

" मीच तो ज्याने जॉनच्या शरीरात प्रवेश करून.........

किती विचित्र आवाज होता. त्या आवाजाने गण्या व मन्या दोघांच्याही अंगावर काटे आले. इतका वेळ ज्या गोष्टीपासून दूर पळत होतो, ज्या गोष्टीपासून वाचायचा प्रयत्न करत होतो तीच गोष्ट आता समोर उभा राहिली होती. त्यामुळे त्यांच्या काळजाचा थरकाप उडत होता.

" आमचा बळीच द्यायचा होता तर अगोदरच द्यायचा नव्हता का? एका फटक्यात गोष्ट संपवून टाकायची होती. आमचा इतका छळ करायची काय गरज होती? " गण्या तावातावात बोलून गेला

" शेवंताssss ये ना ग्.. माझी लाडकी शेवंता "

तोच तो घाणेरडा आवाज शेवंताला हाक मारत होता

गण्या, मन्या त्याच्यापुढे एक शुल्लक निरुपद्रवी प्यादे होते. त्याचे दोघांकडेही लक्ष नह्वते.

" सांगा तुम्ही आम्हाला का मारून नाही टाकत, असा छळ का लावलाय आमचा? " मन्या

" मारेन, मारेन, वेळ आली की लगेच मारेन. सध्या मी माझ्या लाडक्या शेवंताला शोधतोय. इथेच तर होती. "

मन्याची शीर सनकली. तो वेड्यासारखं करायला लागला. कोणी दिसत नव्हतं. आवाज चहूकडून येत होता. आतापर्यंत झालेल्या घटना काय कमी होत्या त्यात भर म्हणून हे सगळं. आणि जीवही जात नव्हता, मोकळा व्हायला. मन्याच्या मनावर प्रचंड ताण आला.

" आयला असं तीळ-तीळ तुटुण मरण्यापेक्षा एकदाच मेलेलं बरं "

आणि तिथल्याच दगडावर जोरजोरात डोक आपटू लागला.

" आरं मन्या, काय करतोय लगा "

गण्या त्यांना अडवायला गेला पण त्यांना गणालाही ढकलून दिलं.

पुन्हा तोच खर्जातला कर्णकर्कश आवाज आला

" मारायचा आहे तुला, गडबड आहे, मर मग. "

तेव्हाच मन्या हवेत उडाला. एखाद कलिंगड हत्तीच्या पायाखाली यावे तसे त्याच्या मस्तकाच्या चिथड्या उडाल्या.

अपरिमित रक्त सांडू लागलं. पण ते सार हवेतच राहिलं. कसलंतरी गोलाकार परदर्षक भांड असल्याप्रमाणे. मन्याचं धडा विना व रक्तात बुडालेलं शरीर हवेत अधांतरी तरंगत होतं.

पुन्हा एकदा आवाज आला

" तुला पण मरायचं का? आत्ताच सांग. मला वाटलं होतं तू थोडा फार हुशार असशील, पण तू तर महामूर्ख निघाला. अरे तुम्ही तिघही माझ्या लाडक्या शेवंती नावाच्या मासोळी साठी जाळं होता रे.. जाळं..... "

"माझी शेवंता, तिला दुसऱ्याला झालेला त्रास सहन होत नाही, आता सापडली जाळ्यात, माझ्यापासून इतकी वर्षे लपत होती आता सापडली ना जाळ्यात. "

"आता तुझं नी माझं मिलन होणार, किती तरी युग आता आपण एकत्र घालवणार, अगं माझी शेवंता, बोल ना तू, बोलत का नाही ? "

तेव्हाच शेवंता च्या आवाजात गण्या बोलला

" कोण आहेस तू? का मला त्रास देतोय ₹ जॉन आणि मी सुखाने जगलो असतो तु कोण आला आमच्या आयुष्यात "

शेवंताला गणाच्या शरीरात प्रवेश करायला भाग पाडले तेव्हाच त्या अघोरी शक्तीने शेवंताला गण्याच्या शरीरात कैद करून टाकले.

" शेवंता हे तू बोलतेस! किती वर्षातून ऐकला हा तुझा मधुर आवाज...! हीच ती वेळ आहे आपण दोघे एकत्र येऊ. मग तू चांगलेच ओळखशील मला.... "

आणि क्षणात आजूबाजूचा पूर्ण परिसर बदलला. ते एका उंचच्या उंच कड्यावर होते. आजूबाजूला जिथवर नजर जाईल तिथपर्यंत मिट्ट काळया पाण्याचा समुद्र पसरला होता. कसलाही आवाज नव्हता. भयान शांतता. तो समुद्र ही विचित्र होता. त्याच्यावर ती एकही लाट नव्हती. ना कसली हालचाल होती. ना हवेची झुळूक होती. ना वाऱ्याचा आवाज होता. त्या ठिकाणी सजीवाचे कोणतेच लक्षण नव्हते. मनावर एक दडपण होते. तो अघोराचा समुद्र होता.

धप्पकन आवाज झाला मन्याचे छिन्न झालेले शरीर त्या समुद्रात कोसळले. इतक्या वेळ शांत असलेल्या त्या समुद्राने रौद्र रूप धारण करून, उंच उंच काळयापाण्याच्या लाटा उसळवून त्या पडलेल्या धडाचा स्वीकार केला .

त्यावेळी फक्त गणा जिवंत होता. मन्या, राम्या, शेवंता जॉन सारी भूतेच होती . शेवंता गण्याच्या शरीरातून बाहेर निघाली. गण्या च्या एका बाजूला राम्याचे आणि मन्याचे व दुसऱ्या बाजूला जॉन व शेवंताचे आत्मे होते. त्यांच्या समोर एक गोलसर काळपट आकार होता त्यातून आवाज येत होता

" बघ हा आत्मशक्तीसाठी व रक्ताच्यासाठी भुकेलेला समुद्र. शेवंता हा समुद्र म्हणजे मार्ग आहे आपल्या मिलनाचा, युगानुयुगे एकत्र राहण्याचा, त्यासाठी फक्त या साऱ्यांची आहुती द्यायची आहे. "

आणि त्या गोलसर काळपट आकारातून दोर बाहेर यावा तसे काहीतरी बाहेर येऊ लागले..... व ते राम्या व मन्या यांच्या आत्म्याभोवती आवळले जाऊ लागले.

" या दोघांची पहिली आहूती.....

इतका वर्ष जॉन त्याच्या गुलामीत होता. त्याला त्या

' कुणाच्यातरी ' शक्तीची कमजोर नस कळलीच असणार...

त्याच वेळी जॉनने त्या गोलसर काळपट आकारावरती जलद चाल केली. त्या काळया, गोलाकार ढगातून चित्रविचित्र आवाज आले . शेवटी तो गोलसर काळपट आकार नष्ट झाला व खाली पडला एक हाडांचा सापळा. ज्याला कुठे कुठे मांस राहिले होते . एक भयानक दुर्गंधी पसरली.

" आपल्याला ह्याला नष्ट करायला पाहिजे "जॉन म्हणाला

" पण कसे " शेवंता

" कोणत्याही नाण्याला दोन बाजू असतात. तसेच शक्ती ही दोन प्रकारची असते, विचारही दोन प्रकारचे असतात. त्या दोन बाजू म्हणजे चांगले व वाईट, सुष्ट व दुष्ट, सकारात्मक

व नकारात्मक, पवित्र व अपवित्र आणि मंगलमय व अमंगल. दोन्ही बाजूंना एकमेकांपासून धोका असतो. कारण ज्या ठिकाणी एक प्रबळ असते तिथे दुसरीला जागा नसते. किंबहुना जी बाजू प्रबळ असते ती दुसरीला संपवायचा किंवा आपल्या हद्दीतून घालावायचा प्रयत्न करत असते. आपल्या या सृष्टीमध्ये अनंत काळापासून मंगलमय, पवित्र शक्तीचा वास आहे व अपवित्र दुष्ट शक्ती त्या शक्तीच्या विरोधात कटकारस्थाने करून आपले स्थान प्रबळ व आपले वर्चस्व निर्माण करायचा प्रयत्न करत आहे. मात्र नेहमी सत्याचा विजय होत आलेला आहे . यावेळी आपल्याला तेच करायचा आहे. ती मंगलमय, पवित्र शक्ती नक्कीच आपल्या मदतीला धावून येईल.

" पण नक्की करायचं काय? "

" आपल्या पवित्र जे काही आहे ते याच्या वरती झोकून द्यायचं. म्हणजे तुम्हाला काही चांगल्या आठवणी असतील,

पवित्र आठवणी असतील, पवित्र गोष्टी असतील, पवित्र विचार असतील, देवाचं नाव असेल . जे काही तुमच्यामध्ये चांगलं असेल, ज्या काही चांगल्या गोष्टी तुम्ही केल्या असतील त्या साऱ्या काही आठवा. ते सारं काही मनात आणा, आणि ते सारं नष्ट कोणामुळे होणार आहे हेही मनात आणा. आपल्या सात्विक संतापाच्या विचार, सात्विक संतापाची अस्त्रं त्याच्यावरती झोकून द्या. "

जॉनला शेवंताचा प्रेम आठवलं. शेवंताला जॉन आठवला, तिच्या बाबांची तिच्यासाठी जी तळमळ आठवली, सदूकाकां व काकूंचे जीव्हाळा आठवला. अजुनही बऱ्याच गोष्टी आठवल्या. गण्याला त्याच्या मित्रांसोबतची दोस्ती आठवली. आई नव्हती पण आईची माया जाणवली. वडिलांनी त्याला आईची कमतरता कधीच भासू दिली नाही, त्यांनी त्याला मोठा केला. मित्रांनी प्रेम दिलं. सारं काही आठवलं. सगळ्यांनी चांगल्या गोष्टी आठवल्या. त्या गोष्टींचे, त्या विचारांचे अस्त्र बनवले नि फेकून दिले त्या पवित्र व मंगलमय दुष्ट शक्ती वरती आणि तेव्हाच नाश झाला त्या दुष्ट अमंगलमय अपवित्र शक्तीचा. तो हाडाचा सापळा हवेत विरून जाऊ लागला.

त्यांचा विजय झाला होता. विजय झाला होता पावित्र्याचा, मांगल्याचा, सकारात्मकतेचा. विजय झाला होता मानवी मनाचा, मानवी नात्यांचा, मानवी भावनांचा नि साऱ्या वरती विजय झाला होता मानवाचा.

तो हाडाचा सापळा नष्ट झाला. तिथेच एक आकृती अवतरली. बहुदा तोच आत्मा होता ज्याने हे सगळे कारस्थान केले होते.

" प्रताप तू " शेवंता म्हणाली

जॉन म्हणाला " तू याला ओळखतेस?"

" हो, हा माझा बालमित्र आहे. "

" प्रताप तू केलंस हे सगळ पण का...?"

त्या विशाल काळा समुद्राचा साऱ्यांना विसर पडला होता . इतका वेळ खवळलेला समुद्र पुढचा बळी न मिळाल्याने शांत झाला होता. पण तो अघोर समुद्र होता. त्याला जाणीव झाली होती घडणाऱ्या घटनांची. कुठेतरी नोंद घेतली जात होती या साऱ्यांची. आदेश दिले जात होते पुढच्या गोष्टीसाठी. पण या साऱ्यांची जाणीव कोणालाच नव्हती..

" सांगतो सोने, सांगतो, माझं ऐकून तरी घे "

" शेवंताला लहानपणी सारे सोनीच म्हणायचे. ती होतीच सोन्यासारखी. आम्ही सारे मिळून राजा राणीचा भातुकलीचा खेळ खेळायचो. त्यात सोनी राणी आणि मी राजा. पण ते फक्त खेळात होतो हे अजून मनाला पटत नाही. पुढे सोनी मुंबईला शिकायला गेली आणि सुट्टीपुरतच गावाला येऊ लागली. तरीही सुट्टीला आली की आम्ही खेळायचो. वय वाढले तसे खेळ बदलत गेले. हळूहळू खेळ बंद झाले. फक्त बोलनं वाढत गेलं. सोनी मला सारं काही सांगायची. मला वाटायचं मी तिचा खास मित्र आहे. त्या तारुण्यसुलभ वयात मी माझ्या मनाचा भलताच समज करून घेतला होता. आणि तिथेच मी चुकलो. सोनी सुट्टी पुरती यायची आणि परत जायची. पण मी मात्र पुढच्या सुट्टीची अधाशासारखी वाट पाहायचो.

शेवटी तिची शाळा संपली. सुट्टीला घरी आली होती. तेव्हा मी माझ्या मनाचा हिय्या करून, मनातली गोष्ट तिला सांगितली. तिचे बाबा केव्हाही तयार झाले असते कारण गावात तेवढा मान-मतराब होताच आमचा. पण ती मला नाही म्हणाली. तिने मला झिडकारलं आणि तिने कारण सांगितले की

" मला अजून शिकायचे आहे. कॉलेज करायचं आहे आहे. आत्ताच लग्न करायचं नाही आणि तसंही लग्न करून गावात राहायचं नाही "

माझ्या तळपायाची आग मस्तकाला गेली मी माझ्या बाकडे गेलो व बाला झालेली सारी हकीकत सांगितली. माझा बा लगेच पाटलाकडे माझ्यासाठी मागणी घालायला गेला. पाटील नाही म्हणणार नव्हता कारण प्रसंगी माझ्या बापानेच पाटलाला कर्जाच्या ओझ्यातून बाहेर काढला होता. पाटलाला पोरीचे पुढे साऱ्याचा विसर पडला.

म्हणाला

"पोरीला पुढे शिकवायचा आहे, थोडासाठी माघार नको. "

माझा बा म्हणला " शिकवू द्या, शिकल्यावर लगीन लावलं तरी चालल की. "

तरीपण नाहीच म्हणाला

" पोरीला तर पसंत पाहिजे "

माझ्या बानं लय समजावलं

" कोण विचारतो पोरींची पसंत वगैरे वगैरे... "

पण पाटील पुरता इंग्रजाळलेला होता. कसले आधुनिक का फिधुनिक विचार होते त्याचे. शेवटी माझा बा तरी किती समजावणार. तो पण माघारी आला.

कुणीतरी खरच म्हणले राग हा माणसाचा सगळ्यात मोठा शत्रू असतो. मी रागाच्या भरात माझ्या बापाचा खून केला. त्यामुळे मला परागंदा व्हायला लागलं. तरीपण शेवंताला प्राप्त करण्याची इच्छा सोडली नव्हती. मला गावागावात फिरता येत नव्हतं म्हणून नुसती जंगलात फिरत होतो. शिकारी येत होती म्हणून बरं झालं. किती दिवस फिरत होतो काय माहित?

एक दिवस जंगलात एक विचित्र प्रकार दिसला. दोन-चार सुंदर ललना एका वडाच्या झाडाखाली भर दिवसा नृत्याविष्कार करत होत्या. मला फार विचित्र वाटलं. इतक्या जंगलात हे शक्यच नव्हतं. मी पुढे गेलो पण त्यांचं माझ्याकडे लक्षच नव्हते. त्या फक्त नाचत होत्या. तिथे एक सडपतळ इसम पडला होता. दाढी हातभर वाढली होती. अंगावर मांसांचा एकही तुकडा नव्हता. नुसता हाडांचा सापळा व त्यावर कातडी असल्यासारखे ते शरीर होतं. संपूर्ण शरीराला कसलं तरी पांढरे भस्म का काही लावलेलं होतं आणि फक्त लंगोटी घातलेली होती. तो नशा करून

पडलेला असावा मी त्याला उठवलं, शुद्धीवर आणलं तेव्हा मला कळालं की हे त्यांनं स्वतःच्या मनोरंजनासाठी केलेले चेटूक होतं.

मी त्याला माझी कहाणी सांगितली. मला काय पाहिजे ते सांगितलं. तेव्हा त्याच्या डोळयात एक असूरी आनंद दिसला. पण त्यावेळी मला तो जाणवला नाही. तेव्हाच माझी शाळा सुरू झाली. तो सांगेल तसे करत करत गेलो. नंतर माझं काहीच चालेना, त्याचा गुलाम झालो, त्याच्या हातातलं बाहुलं झालो. जेव्हा त्याने जॉनला उचलायला सांगितलं. तेव्हा मला खूप आनंद झाला पण त्यालाही त्यांनं गुलाम बनवलं. त्याला वेठीस धरून शेवंता बरोबर जे काही केलं त्यावेळी मी त्याचा शेवटचा विरोध केला आणि त्या वेळीच त्यांनं माझं अस्तित्वच संपवलं व मी नेहमीसाठी त्याच्यामध्ये विलीन झालो.

तो वाढत गेला. बळी घेत गेला. बळी देत गेला. शक्ती वाढवत गेला. आताही तो आहे. तो गेलेला नाही. हे त्याचंच ठिकाण आहे बळी देण्याचे, त्याचंच ठिकाण आहे आपल्या साऱ्या शक्ति वाढवण्याचे, याच ठिकाणी आतापर्यंत कित्येक बळी देऊन त्याने आपली शक्ती वाढवली आहे, याच ठिकाणी त्याचा अघोर समुद्राला बळी देऊन तो अघोराकडून शक्ती प्रदान करून घेतो, आता आपल्या साऱ्यांचा बळी देऊन तो या अघोर समुद्राचा स्वामी बनेल.

कारण अघोर स्वामी बनण्यासाठी त्याने केलेल्या खेळातील हा शेवटचा डाव होता.

आता मला कळतंय, की तो क्षणिक राग जर मी केला नसता तर तुम्हा साऱ्यांचं आयुष्य वाचलं असतं । पण माझ्या मनात त्या वेळी प्रबळ झाली होती ती काळी, दुष्ट, नकारात्मक अपवित्र, अमंगलमय बाजू.

मला माफ कर अशी म्हणायची सुद्धा माझी लायकी नाही पण मी तुम्हा सर्वांची माफी मागतो

" हा ss हा sss "

एक क्रूर हास्याचा आवाज सर्वत्र घुमला.

त्या कातळ काळोखाच्या अघोर समुद्रामध्ये लाटा उसळल्या. कर्णकर्कश्य ध्वनी आसमंतात घुमू लागला.

" माग, माफी माग. कारण थोड्याच वेळात माफी मागायला तुही नसशील आणि ज्यांना माफी मागायची आहे तेही नसतील. "

आणि लाटा अधिकच जोमाने उसळू लागल्या. लाटा उसळत होत्या. उंच उसळून कड्यावरती आपटत होत्या. त्या कड्यावरचा, त्या बेटावरचा एक एक आत्मा गायब होत होता. त्या अघोरी समुद्रामध्ये त्यांचा बळी दिला जात होता.

त्या अघोराने त्यांना वेळच दिला नाही. सारे आत्मे त्या अघोरामध्ये विलीन झाले. त्यांना आता कोणी वेगळं करू शकत नव्हतं. पाण्यात विरघळलेल्या साखरेप्रमाणे त्यांचं अस्तित्व संपलं होतं. आता फक्त गण्या राहिला होता. आणि समुद्र शांत झाला. गण्याच्या मनावर मोहिनी पडली. तो चालत जाऊ लागला कड्याच्या टोकाकडे उडी घेण्यासाठी...

पण त्याच्या मनाच्या एकदम आतल्या पातळीवर संघर्ष अजूनही चालू होता. तो विरोध करत होता. पण तो विरोध तोकडा होता. शेवटी त्याने पराभव स्वीकार केला व मृत्यूच्या झोक्यावर बसून तो आठवणींच्या गावी गेला. आयुष्य त्याच्या नजरेसमोरून सरकून गेलं. मात्र एक दृश्य त्याच्या नजरेसमोर पुन्हा पुन्हा तरळत राहिलं

त्याचं लहानपण. त्याची अंजली. दोघेही वेगळे नव्हतेच. एकच होते दोघे. झाडावरती चढले होते कशासाठीतरी?

पण कधी नव्हे ते गण्याचा पाय घसरला तेव्हा अंजलीनेच त्याला हात दिला व वर खेचले....

त्याच्या मनावरची मोहनी विरघळून गेली. ते दृश्य विरघळून गेलं. तो कड्यावरून खाली कोसळत होता आणि अंजलीने त्याचा हात पकडला होता. त्याला पुन्हा एकदा वर खेचला होता. आणि त्याचवेळी दिव्य तेजस्वी पांढरा प्रकाश सर्वत्र भरून उरला. त्याला काहीच दिसेना हळूहळू दिसू लागलं. तेव्हा त्याला जाणवलं. तो तिच्या मांडीवर डोके ठेवून पहुडला होता. ती त्याच्या डोक्यावरुन हात फिरवत होती.

" कोण तू...?

" इतक्यात विसरला...

" अंजली तू मला वाचवलं....?

" नाही तू स्वतः स्वतःला वाचवलं....?

" आणि बाकीचे

" ते अघोरात विलीन झाले.

" अघोराचा नाश झाला का..?

" ते आपल्यासारख्या सामान्याला शक्य नाही. आपण फक्त त्याला चुकवून येथे आहोत....

" आता मी कुठे आहे?

" स्वप्नात .

" तू कुठे आहे...?

तिने काहीच उत्तर दिले नाही. ती शांत राहिली. तोसुद्धा शांतपणे तिच्या मांडीवर पडून राहिला. तिचे हात त्याच्या डोक्यावरती फिरत राहिले.

अचानक त्याला पाण्यात बुडाल्यासारखा झालं. त्याने डोळे उघडले.

" साहेब तो शुद्धीवर आला.. "

" हवालदार त्याला इकडे आणा.

" बोल रे इथे काय करत होता?

" काल रात्री इथे कोण कोण होतं?

" काल रात्री इथे काय काय झालं?

" सांग पटकन...

तो समुद्रात एका बेटावर होता. काल रात्री बेटावर स्फोट झाला होता. संपूर्ण बेट जळालं होतं. नंतर अचानकच आग विझली. ज्यांनी किनाऱ्यावरून सारं पाहिलं त्यांनी पोलिसांना कळवलं होतं...

भाग-2



# फार्म हाऊस

" तू इथे काय करत होता?

" कशाला आला होता?

" तुझ्याबरोबर अजून कोण कोण होते?

" स्फोट कसा काय झाला?

आणि काय काय प्रश्न तो विचारत होता.

गण्या त्याला काय सांगणार होता की तो त्याच्या मित्रांसोबत गावाच्या जत्रेला निघाला होता. काटेवाडीच्या जंगलातल्या वाटेने जाताना ते भुताच्या तावडीत सापडले. त्यात त्याचे दोन मित्र त्याने गमावले आणि त्याला त्याच्या लहानपणीच्या मैत्रिणीच्या भुताने वाचवलं. ज्या मैत्रिणीला त्याने लहान पणा नंतर कधी पाहिलंच नव्हतं. त्यालाच माहित नव्हतं की तो इथे कसा आला. तो पोलिसांना काय सांगणार होता ?

तो फक्त म्हणाला

" मला माहित नाही....

" माहित नाही काय.....? चल पोलीस स्टेशनला, दोन काठ्या पडल्या की सारं माहीत होईल....

" मला खरच माहित नाही. मी खोटे का बोलेन...

आणि ते खरंच होतं. पण तो काहीच करू शकत नव्हता गपचूप पोलिसांबरोबर जाण्याशिवाय त्याच्याकडे पर्यायच नव्हता.

माणसाच्या आयुष्यात काय होईल सांगता येत नाही. काल रात्री गण्या जत्रेतला ऑर्केस्ट्रा पाहायला निघाला होता आणि आज तो तुरुंगात होता. तरुंगात बसून त्यानं खूप डोकं चालवलं. त्याने खूप विचार केला की नक्की काय झालं असेल. तो इथे कसा पोहोचला असेल. पण सारी खटपट व्यर्थ होती. शेवटी वैतागून तो वेड्यासारखा इकडे तिकडे पाहत बसला. त्याला बसल्या जागीहून पोलिसाचा टेबल दिसत होता. तेथे गाऱ्हाणं घेऊन येणारी माणसं दिसत होती. त्यांच्या चेहऱ्यावरचे दुःख, उदासीनता, क्वचित कधी राग आणि संताप सुद्धा दिसत होतं. पण आत्ता आलेला इसम या साऱ्यांच्या विरुद्ध होता. त्याचा चेहरा हसरा होता. तो होताच थोडा विचित्र.

काळयाभोर झुपकेदार मिशा, पांढरे शुभ्र धोतर, त्यावर पांढरा सदरा आणि काळा कोट. डोक्यावर जुने लोक घालतात तसे फेटा कम पगडी. तोंडात पानाचा तोबरा असल्यामुळे ओठ लाल झालेले. तो अर्धाभर तास त्या पोलिस अधिकाऱ्याबरोबर बोलत होता. मधून मधून गण्याकडे बोटही करत होता. तो पोलिस अधिकारीही खुलून बोलत होता. मध्येच त्याने खिशातून पानाची चंची काढली पान तयार करून त्याने पोलिसालाही दिले आणि स्वतः खाल्ले. शेवटी पोलिसांने गण्या कडे बोट करत काहीतरी सांगितले. हवलदार चावी घेऊन त्याच्याकडे आला. त्याने गण्याला सोडवून बाहेर आणले.

तो पोलीस म्हणाला

" बप्पा तुला सोडवायला आले म्हणजे काहीतरी खास असशील तू...."

" अजून काही मदत लागली तर सांगा बप्पा"

" व्हय साहेब सांगतु की... निघू का आता.."

"चला गणपतराव चला."

गण्याला काहीच कळेना हा बप्पा कोण होता? त्याने गण्याला का सोडवले? आणि त्याला गण्याचे नावही माहीत होते. गण्या पुरता चक्रावला. जेव्हा पासून तो जंगलात घुसला होता, त्याचं आयुष्य म्हणजे धक्क्यांची मालिका झालं होतं. धक्क्या मागून धक्के येत होते, त्याला सावरायलाही वेळ मिळत नव्हता.

" कुठं हरवला गणपतराव येताय नव्हं......"

" पण मी ओळखलं नाही तुम्हाला...?"

" हुईल वळख हळूहळू आता चला माझ्यासंग"

एरवीअनोळखी माणसाबरोबर तो गेलाच नसता पण ती वेळच अशी होती की तो गुपचूप त्याच्या बरोबर गेला..

सहा खोल्यांचा मठ होता तो. बप्पा म्हणाले होते हा आपल्या मठ. 2 बेडरूम, 1 किचन, एक हॉल व किचनला लागूनच जेवायची खोली होती. बेडरूमही मोठ्या होत्या. एका एका बेडरुममध्ये चार-चार बेड होते. म्हणजे खरच ही धर्मशाळा किंवा मठ असावा. त्याला टॉयलेट-बाथरूम दाखवून बप्पा जेवण आणायला बाहेर गेले

गण्याने अंघोळ करून घेतली तेव्हा त्याला ताजतवानं वाटायला लागलं. बेडरूम मध्ये त्याच्या मापाचे कपडे ठेवलेच होते. त्याने ते बदलून घेतले व हॉल मध्ये येउन बसला. इतका वेळ त्याला विचार करायला वेळच मिळाला नव्हता. घटना इतक्या पटापट घडत गेल्या की त्याला प्रतिक्रिया द्यायला देखील वेळ मिळाला नाही. आता तो नव्या दमाने विचार करू लागला. त्याला अंजलीने वाचवलं नंतर तो बेटावर होता. तिथून पोलिसांनी त्याला तुरुंगात टाकलं. तिथून बप्पाने त्याला सोडवून आणलं.

' हा बप्पा नक्की आहे तरी कोण? आणि त्याला माझं नाव कसं माहित? महत्त्वाचं म्हणजे त्याला कळालं कसं की मी तुरुंगात आहे? हा कसला मठ आहे नक्की? एक माणूस दिसत नाही. आपल्याला शोध घ्यायला पाहिजे. त्याने हॉलमधील टेबलाचा ड्रॉवर शोधायला सुरुवात केली. त्याला पाहिजे ते काहीच सापडत नव्हते. ना कोणतं माहिती पत्र होतं ना कोणतं रजिस्टर. एकदम खालच्या कप्प्यात त्याला एक वही दिसली. त्या वही वरती एक कागद लावला होता. त्याच्या वरती नाव होतं

## ^ गणपतराव ^

त्यांना पहिलं पान उघडून पाहिलं.

## ' तिसरा शिलेदार '

व्हय तिसराच. आतापतुर दोन शिलेदार आलं . गणपतराव तिसरा शिलेदार हाय. मागच्याबारीला पण अशीच सपनं पडली हुती. ह्याबारीला जरा जास्तीच सपान पडाया लागल्याती.

पहिल्या पानावरचा मजकूर येथेच संपला होता. दुसऱ्या पानावर मोठ्या अक्षरात एक आकडा टाकला होता.

' १ '

किर्र जंगलात तीन पोर जिवाच्या धास्तीने पळायल्यात आगीचा इस्फोट आणि दोघांचे मराण. एक जण वाचला त्यो पळतूय. पळता पळता एका समुद्राच्या बेटावर गेला. परत स्फोट झाला. पुन्हा एकदा तो वाचला. आता तरूंगात बसलाय . पोलीस स्टेशन वाटतय.

दुसऱ्या पानावरचा मजकूर इथेच संपला होता.

" तुला काय इचारायचं असेल तर मला इचार की इकडं-तिकडं काय हुडकतुय " बाप्पा म्हणाले

सकाळी धोतर आणि कोटात बघितलेले बप्पा आता विजार आणि सुती बंडित ओळखू येत नव्हते.

" या वहीत काय आहे हे " गण्या म्हणाला

" तू वाचलीय ना. तुला कळालं न्हाय का?

" माझ्याबरोबर जे घडलं ते तुम्हाला कसं माहीत?

" सांगतु आधी जेवण करू, मग सगळं सविस्तर सांगतु

जेवण झाल्यावर ते दोघे हॉलमध्ये बसले बप्पांनी आपली पानाची चंची काढली पानाचा विढा तोंडात टाकून त्यांनी गण्याला सारं सांगायला सुरुवात केली

संघर्ष, लढाई सगळीकडे तेच चालू आहे. माणूस, प्राणी निसर्गातील सारे काही संघर्षच करत आहेत. अगदी किडा-मुंगी, छोट्यातला छोटा जीव मग तो एकपेशीय का असेना, तो संघर्ष करतो. हा सारा संघर्ष चालला आहे तो स्वतःचं अस्तित्व टिकवण्यासाठी. एकदा जीविताची हमी आणि पोटापाण्याचा प्रश्न मिटला की सुरू होते वर्चस्वाची लढाई. बऱ्याचदा वर्चस्वाची किंवा सत्तेची लढाई ही सामूहिकरीत्या लढली जाते. त्यात एक गट दुसऱ्या गटावर मात करण्याचा प्रयत्न करतो. हा संघर्ष मानवाला नवा नाही. तो त्याच्या मनात पूर्वापार चालत आले आहे. त्याला या साऱ्यांची जाणीव आहे.

हाच संघर्ष चालत आला आहे त्याच्या मनावर ती सत्ता मिळवण्यासाठी. हा संघर्ष चालत आला आहे त्या दोन शक्ती मध्ये ज्याला आपण सुर-असुर, दैवी-राक्षसी, मानवी-अमानवी, चांगली-वाईट, मंगलमय-अमंगलमय, पवित्र-अपवित्र म्हणतो. आपण हेही जाणतो त्यापैकी दैवी, मानवी चांगल्या आणि मंगलमय गोष्टीने तो संघर्ष जिंकून मानवी मनावर वर्चस्व स्थापन केले आहे. पण अजूनही अमानवी, अघोरी शक्ती मानवी मनाच्या तळाशी दडून बसली आहे. पावित्र्याची पकड ढिली झाली की ती अघोरी शक्ती आपलं अस्तित्व दाखवून देते. आपले शिलेदार बनवते व लढाई उभारते प्रस्थापितांविरोधात. मग त्यांच्या बरोबर दोन हात करण्यासाठी ती मंगलमय, पवित्र शक्ती मानवाला शिलेदार बनवून पुढे करते. मानवाला सामर्थ्य पुरवते. पण शेवटी लढाई मानवालाच लढायची असते. बरेच जण ती जिंकतात, काही हरतात, काही धारातीर्थी पडतात तर काही शत्रूचे मांडलीकत्व स्वीकारतात.

असा शिलेदार म्हणून गण्याची निवड झाली होती.

बप्पाने असं काही सांगितलं की गण्याची बोबडीच वळली. तो अन मांगल्याचा, पावित्र्याचा म्हणजेच साक्षात देवाचा शिलेदार. हे शक्यच नव्हतं. हे खरं नाही. हे सारे घडत नाही. नक्कीच काहीतरी घोटाळा आहे.

" कसं काय तुम्ही असं म्हणताय. मला काय येतंय. मला निवडलं असतं तर मला कळालं असतं. माझ्यात कोणतीच शक्ती नाही. ना मला उडता येते, ना मारामारी, ना माझं कशाचं प्रशिक्षण झालं.

" अरं येड्या तू स्वतःला सुपरहिरो समजायला का काय? तुला निवडलं हे नक्की. उद्यापस्न तू कामाला लागशील. ते पण स्वतःहून. तुला कुणी सांगायला लागणार नाही..

आणि बाप्पा निघून गेले. गण्या मात्र वादळाने उन्मळून पडलेल्या वृक्षाप्रमाणे सुन्न पडला. आपली मुळं वर आली आहेत आणि पुन्हा ती रुजवायचे असतील तरी लवकर गाव गाठायला पाहिजे. असं वाटून तडक तेथून बाहेर पडला व गावाकडे निघाला. बप्पाने गण्याला पाहिलं पण त्याने गण्याला हटकलं नाही कारण त्याला माहित होतं तो उद्या याच ठिकाणी माघारी आलेला असेल.

तो सकाळी सकाळी आला. आल्या आल्या बाप्पांची गचांडी धरून त्यांना मागे ढकलत चढ्या आवाजात बोलू लागला

" ए थेरड्या सांग काय केलं तू. मला गावात कोणचं ओळखत नाही. अरे माझा बाप सुद्धा मला ओळखत नाही. सांग काय केलं? सांग नाहीतर....

असे म्हणत त्याने हाताची बुक्की उचलून बप्पांना मारणार तेवढ्यात बप्पाने त्याचा मानेला धरलेला हात उडवून लावला आणि दोन्ही हाताच्या मुठी ने त्याच्यावर प्रहार केला आणि गण्या कळवळत खाली कोसळला.

बाप्पाने इतकी जलद व चपळपणे हालचाल केली कि त्याच्या वयाच्यामानाने ती सर्वथैव अशक्य होती.

" गणपतराव इथं मी काहीच करू शकत न्हाय. सारं काही त्या शक्तीच्या मर्जीने हुतं. तिने तुमाला निवडलं. तवा तुमाला हे करावंच लागणार दुसरा उपायच नाही तुमच्याकडं.....

निळयाशार आकाशाखाली एका झाडाच्या सावलीत ते दोघे बसले होते. गण्या आणि अंजली.

" तू माझ्या स्वप्नात का येते.....

" हे स्वप्न नाही

" तुला काही सांगायचं असेल तर सांगून टाक उगाच सारखं सारखं स्वप्नात येऊन मला छळु नकोस

कधी नव्हे ते निर्विकार राहणाऱ्या अंजलीच्या चेहऱ्यावर काहीतरी भाव उमटले. पण ते भितीचे भाव होते. आणि तेही क्षणभरासाठीच.

" माझ्यासोबत चल तुला काही तरी दाखवायचं आहे..

दोघेही चालू लागले. ते एका बंगल्याच्या गेट समोर येऊन पोहोचले. बंगल्यावरती लिहिलं होतं

` _ _ व फार्महाउस `

काहीतरी तीन अक्षरी नाव होतं पण दोन अक्षरे जागेला नव्हती. गण्या गेट कडे जाऊ लागला

" जाऊ नकोस..

" का...?

" नको...

असं म्हणून ती अंतर्धान पावली. तिथून नाहीशी झाली. तेव्हाच जोराचा पाऊस सुरू झाला. ढगांचा गडगडाटी आवाज येऊ लागला. त्याला असं वाटत होतं की ते ढग गणपतराव-गणपतराव म्हणत होते. हळू हळू आवाज वाढत गेले व स्पष्ट होत गेले

" गणपतराव, ओ गणपतराव डोळे उघडा. बरं झालं तुम्ही डोळे उघडलं. मला वाटलं लईच मार पडला तुम्हाला त्याच्यामुळच बेशुद्ध झाला का काय तुम्ही....?

" कशाला उठवलं बप्पा. अंजली मला एक घर दाखवत होती आत चाललो होतो. पण तुम्ही उठवलं राव.....

" घोटाळा झाला की मग गणपतराव. असू द्या आता. हातात काय हाय?

त्यानं हात उघडला तसं सडलेल्या माणसाची दुर्गंधी नाकात शिरली. त्याच्या हातात एक शिंपला होता. जसा गोगलगायीला असतो तसा.

त्या शिंपल्याचा लिबलिबीत स्पर्श त्याला तेव्हाच जाणवला. प्रतिक्षिप्त क्रिये मुळे त्याने तो शिंपला जोरात खाली आपटला त्यामुळे फुटलेल्या शिंपल्यातून सडलेल्या मासांचे शिंतोडे फरशीवरती उडाले व एक गोगलगाय सरपटू लागली.

साधारणपणे सरपटत असताना चिकट पांढरा द्रव गोगलगाय मागे सोडते. मात्र ही गोगलगाय रक्त सोडत होती ते रक्त क्षणात वाळत होते व त्याची दुर्गंधी सर्वत्र पसरत होती. बाप्पांनी आपल्या पायाखाली तिला चिरडून टाकले तसा तिथे रक्तस्राव झाला. ते रक्तही क्षणात वाळून गेले पुन्हा एकदा घरात भयंकर दुर्गंधी पसरली. बाप्पा पळत जाऊन फिनाईल व कापड घेऊन आले. ते सडलेले मांस बाप्पांनी कागदावरती भरून बाहेर फेकून दिले. फरशी पुसून घेतली. तेव्हा कुठे दुर्गंधी कमी झाली.

त्या क्षणभरात जो काही प्रकार घडला होता तो नक्कीच अमानवीय होता पण गण्याच्या हातात तो शिंपला आलाच कसा? कारण तो स्वप्न बघत होता, त्यामुळे स्वप्नातील सत्यात येणं शक्यच नव्हतं. मुळात स्वप्नातही कुणी शिंपला दिल्याचे त्यांना आठवत नव्हते. मग नक्की शिंपला त्याच्या हातात आला तरी कसा.. ?

" गणपतराव तुमच्या अंजलीने भारीच मजा केली म्हणायची.

" अहो हा शिंपला अंजलीने नाही दिला...

आणि दिला असता तरी स्वप्नातला शिंपला

सत्यात कसा येईल......?

" गणपतराव ते स्वप्न नव्हतं... "

तेव्हाच गण्याला अंजलीचे बोल आठवले

" हे स्वप्न नाही......

म्हणजे तो खरंच घरासमोर गेला होता की काय....? त्याने आपल्या पायाचे तळवे बघितले त्याला ओली माती चिटकली होती.....

" पण मी तिथे जाईलच कसा......? मी तर इथेच होतो ना तुमच्यासमोर बेशुद्ध पडलेला.... "

" बरोबर आहे तू बेशुद्ध होता पण तू इथे नव्हता...

" मला काहीच कळेना तुम्ही काय म्हणताय ते...

" म्हणजे फकस्त तुझं शरीर इथं होतं, तू मनाने आत्म्याने तिथेच होता.....

" पण हे कसं शक्य होतं...... "

" कळल, हळू-हळू सगळ्या प्रश्नाची उत्तर एकदम मिळत नसतात..... मला एक सांगा गणपतराव तो शिंपला तुमच्याकडे कोणी दिला?

" बप्पा मला काहीच आठवत नाही की कोणी दिला.... नि माझ्याकडे कसा आला....?

तेव्हाच किचनमधून भांडी पडल्याचा आवाज झाला...

बाप्पा पळतच किचनमधे गेले.

" काय झालं बप्पा...?

" काय नाय गणपतराव मांजर आहेत..

थोडावेळ भांड्यांचा आवाज येत राहिला. नंतर सर्वत्र शांतता पसरली. त्या शांत वातावरणात गण्या विचारांच्या गर्तेत हरवून गेला.

' बरोबर आहे ते स्वप्न नव्हतं. म्हणजे खरंच होतं ते सारं... अंजली म्हणाली होती ते स्वप्न नाही. ' तरी त्याच्याकडे शिंपला कसा आला...? त्याला काहीच आठवत नव्हतं. त्याने डोक्याला खूप ताण दिला तरीही त्याला काही सुगावा लागेना. जसं काही कुणीतरी त्याच्या जुन्या आठवणी पुसून टाकल्या होत्या.

थोड्यावेळाने बप्पा दोन दुधाचे ग्लास घेऊन आले. त्यांनी स्वतः एक घेतला व गण्याला दुसरा दिला. ते गोड गरम दूध पोटात जाताच त्याच्या डोळयावर झोपेचा पडदा येऊ लागला. अगोदर झालेली थकावट व मनावरच्या ताणामुळे तो लगेच झोपी गेला.

' टक-टक ' कुणीतरी दगडावर हातोड्याने घाव घालावेत असा आवाज येत होता. तो आवाज हळूहळू वाढतच गेला. कानाचे पडदे फाडून मेंदूच्या सर्व संवेदना बधीर करत होता. तो आवाज कुठून येतोय बघायला गण्याने डोळे उघडले. कुणीतरी दारावरती टक टक करीत होते. खोलीत अंधार होता. खिडकीतून पडलेल्या चंद्राच्या मंद प्रकाशात समोरच्या घड्याळाचा काटा 12 वाजल्याचे दाखवत होता. म्हणजेच तो 12 तासांपेक्षा जास्त झोपला होता. तो बेडवरून उठून दार उघडायला गेला. दार उघडलं तर समोर अंजली

" तू"

" चल माझ्याबरोबर"

" कुठे, आता.....? "

" चल गुपचूप महत्त्वाचं आहे"

" थांब मी बप्पाला उठवतो"

" नको तू एकटाच चल, चल लवकर नाहीतर उशीर होईल... "

अंजली पुढे जात होती . गण्या मागे. आता एक कॉलनी नजरेत पडत होती. कॉलनीत सारी घरे एक सारखीच दिसत होती. रात्रीच्या बारा वाजून गेल्याने साऱ्या घरातल्या लाईट बंद होत्या. फक्त एकच घराच्या दुसऱ्या मजल्यावर ती पिवळसर उजेड तेवत होता.

त्या उजेडाकडे बोट करत अंजली म्हणाली

"त्याच घरात जिथे उजेड दिसतोय ना तिथल्या एका माणसाला वाचवून बाहेर आणायचं आहे

" पण मीच का...? आणि कोण आहे तिथे....

" कारण तुझीच निवड झाली आहे आणि तिथल्या माणसावरतीच माझं भवितव्य अवलंबून आहे.....

हे ऐकून गण्या त्या घराकडे पळतच निघाला.....

घराचं दार उघडंच होतं. त्याने ते सताड उघडलं आणि आत शिरला. दाराच्या झरोक्यातून येणाऱ्या उजेडात त्याची उंचच्या उंच काळी सावली अभद्र दिसत होती. त्याने उजव्या बाजूच्या भिंतीवरील बोर्डाची सारी बटणे दाबली पण कुठेच उजेड पडला नाही. बाहेरून पडणाऱ्या अर्धवट उजेडात त्याला डावीकडे वर जाणारा जिना दिसला. तो जिन्यावरून चढून वर पोहोचला. एकाला एक लागून तीन खोल्या होत्या.

तीनही दार लावली होती. मधल्या दाराच्या फटीतून उजेडाची लकीर समोर पसरली होती. तो सरळ गेला आणि दार उघडलं. इतका वेळ निर्भय व निडरपणे वावरणारा गण्या भीतीने म्लान झाला. समोरचं अमानवी, अघोरी किळसवाणे दृश्य पाहून त्याचं काळीज पिळवटून निघालं....

ती संपूर्ण खोली गोगलगायांनी गच्च भरली होती. टेबलावरच्या दिव्याच्या प्रकाशात सरपटणाऱ्या गोगलगायींचा रक्ताचा स्राव किळसवाणा दिसत होता. खोलीत जमीन किंवा कुठलीच वस्तू दिसत नव्हती फक्त त्यांचा आकार जाणवत होता...

" पण या इथे आल्याच कशा....?

या प्रश्नाला काहीच अर्थ नव्हता. तो अशा शक्तींच्या विरोधात लढत होता. जिला काहीही शक्य होतं. गण्याला सर्वत्र गोगलगाय दिसत होत्या. कुठे माणूस दिसतच नव्हता, ज्याला वाचवायचा होतं तोच दिसत नव्हता. त्याला कळेना कि अंजलीने त्याला कोणाला वाचवायला सांगितलं होतं.

सरपटणाऱ्या गोगलगायींची लयबद्ध हालचाली पेक्षा वेगळ्या हालचाली त्याला जाणवल्या. समोर खुर्चीवरती कोणीतरी होतं. त्याचं शरीर दिसत नव्हतं. गोगलगायींच्या खाली अच्छादला होता. तो आत जाऊ शकत नव्हता कारण त्यालाही मृत्यूचं भय होतं. पण तो थांबूही शकत नव्हता. त्याला त्या खुर्चीवरचा माणसाला वाचवायला हवं होतं. पण त्याचा पाय पुढे पडायला तयार नव्हता.

पण माणसाच्या मनाचा थांगपत्ता कुणालाच लागला नाही. इतका वेळ घाबरून आत जायला नको म्हणणार त्याचं मन क्षणार्धात तयार झाले आणि त्याने खोलीत पाय टाकला. त्याने पाय टाकायला आणि गोगलगाय आणि बाजूला सरकून जागा व्हायला एकच गाठ पडली. त्याचा पाय गोगलगायावरती न पडता जमिनीवर पडला....

आणि काय आश्चर्य पुढची सारी पाउले जमिनीवरच पडत गेली. गोगलगाय बाजूला सरकत त्याच्या पाऊलाला जागा करून देत होत्या.

' पण का....?

ज्या गोगलगायींनी त्या खुर्चीवरचा इसमाला जेरबंद करून त्याचा जीव घ्यायचा घाट घातला होता त्याच गणाच्या बाबतीत इतक्या सौम्या का होत्या? त्या गोगलगायींचे आणि गण्याचे जूनं काही नातं होतं का.....?

तो खुर्चीजवळ पोहोचला तेव्हा जेरबंद असलेला इसम, गोगलगायींनी ज्याला यमसदनी काढायचं ठरवलं होतं, तो मोकळा झाला. तो चांगलाच धष्टपुष्ट व हट्टाकट्टा होता. दोन गड्यांना जागेला भुईसपाट करू शकेल इतका पैलवान गडी होता. त्यावरून कळत होतं की त्या गोगलगायी मध्ये किती ताकत होती.

तो खुर्चीवर बेशुद्ध पडला होता गण्याकडे फार वेळ नव्हता. सध्या तरी गोगलगाई त्याला जागा करुन देत होत्या. पण पुढचा अंदाज तो बांधू शकत नव्हता. त्याने त्या इसमाचा एक हात आपल्या खांद्यावर घेत त्याला आधार देऊन चालवायचा प्रयत्न केला. पण तो खूप जड होता त्याला शुद्धीवर आणि गरजेचं होतं. त्याने त्याला खुर्चीवर बसवलं. एवढ्यानेच गण्याची दमछाक झाली. त्यामुळे त्यांनी आधारासाठी टेबलावर हात ठेवला. टेबलावरच्या गोगलगाय बाजूला झाल्या. तिथेच त्याला पाण्याची बाटली दिसली. गण्याने त्याच्या चेहऱ्यावर पाणी शिंपडले.

तो शुद्धीवर आला.

" ती डायरी, ती डायरी ...

गण्याने त्याला आधार देत उठवलं. दोघही दरवाजाकडे जाऊ लागले. आताही गोगलगाय रस्ता करून देत होत्या. तो इसम बाहेर पोहोचला.

" ती डायरी, टेबलावरची... लवकर आण....

गण्या पुन्हा आत वळला. पण या वेळेला गोगलगायींनी जागा दिली नाही. त्याने गोगलगाय वरती पाय दिला. गोगलगाय मधून रक्तस्राव झाला. आणि तेव्हाच त्याच्या सर्वांगावर गोगलगायींचा वेढा पडला. तो गोगलगायींनी असून अच्छादुन जाऊ लागला. तो खाली कोसळला गोगलगाई त्याला पायापासून डोक्यापर्यंत आच्छादून टाकत होत्या. त्याला दरारून घाम फुटला. मृत्यू त्याच्या पुढे दिसत होता. हळूहळू त्याचं सर्वांग गोगलगायींनी आच्छादून टाकलं. त्याला श्वास घ्यायला अडचण होऊ लागली. त्याच्या नाकातोंडात सर्वत्र गोगलगाई भरून उरल्या.

मृत्यु फार दूर नव्हता....

तो दचकून जागा झाला. तो बेडवरतीच होता. तो घामाने निथळून निघाला होता. तो त्याच खोलीत होता, जिथे तो झोपला होता. शेजारीच बाप्पा बसले होते. त्याला चेहऱ्यावरचा घर्मबिंदू टिपताना पायाला भयंकर वेदना जाणवल्या. त्याच्या पायावरती कोणीतरी धारदार वस्तू ने ओरखडे ओढले होते. त्यामुळे रक्तस्त्राव होत होता. बप्पांनी पटकन ते रक्त पुसून घेऊन त्याला अँटीसेप्टिक लावले.

" कुठे गेलता.....

" मला माहिती आहे तो बंगला, ती वाट...

" मग चल लवकर, नाहीतर उशीर होईल....

" पण मग मी इथे आलोच कसा....?

" म्हणूनच म्हणलं तू शिपाई हाइस, साध्या माणसाला हे शक्य नाही....

" पण ते स्वप्न होतं की वास्तव....?

" ते स्वप्न नव्हतं....!

बप्पा आणि गण्या तिथे पोहोचले. ते वर गेले. त्याच खोलीत गेले. दार सताड उघडं होतं. सर्वत्र दिव्याचा प्रकाश पडला होता. पिवळसर उजेडात फरशीवरती रक्ताचे शिंतोडे व काहीतरी रक्ताने माखलेलं सरपटत गेल्यासारखं वाटत होतं. जसं एखादं मढं. खोलीत सर्वत्र रक्ताचे शिंतोडे उडाले होते. रक्ताचे फटकारे मारल्यासारखी ती खोली गोगलगायींच्या सरपटण्याने झाली होती. मात्र आता तिथे एकही गोगलगाई नव्हती. ना तिथे तो मनुष्य होता ज्याला गण्याने वाचवलं होतं. मग झालं तरी काय....? त्या मनुष्याच्या मृत्यू झाला का.....? त्याला काहीच कळू शकत नव्हतं. रक्ताने माखलेली ती खोली फक्त घडलेल्या घटनांची साक्षी होती ती.....

" ती डायरी... ती डायरी कुठे आहे ते शोधायला पाहिजे..... " गण्या

" कुठली डायरी........ " बप्पा

" तो माणूस म्हणाला होता..... टेबलावर आहे वाटतं....

त्याने डायरी उचलली. ती पूर्ण कोरी होती. बाजूलाच काही पाने पडली होती. ती पाने डायरीचीच होती पण फाडून वेगळी केली होती. त्या पानावरती काहीतरी लिहिलं होतं. गण्या त्या पानावरचा वाचनात गुंग झाला. त्याला भानच राहिले नाही की तो कुठे होता...

पहिला दिवस

' आज भल्या पहाटे झोप मोड झाली. आज तिसरा खून झाला होता. पंधरा दिवसात तिसरा खून झाला होता, तो सुद्धा एकाच पद्धतीने. पहाटेच डिपार्टमेंट मधून फोन आला " सर खून झाला आहे " आता मी विशेष तपासासाठी नेमलेल्या पथकात असल्याने मला जाणे भागच होते.

आता दिवसाची सुरुवातच खराब झाली म्हटल्यावर दिवस कसा चांगला जाणार. दिवसभर कोणाची ना कोणाची किर-किर माझ्या मागे होतीच. सकाळची बातमी दुपारपर्यंत सगळयाच्या कर्णोपकर्णी झाली त्यामुळे मंत्री साहेबांनी फोनवरून झापले. डिपार्टमेंटमधे समोर उभा करून हजेरी घेतली ती वेगळीच. एवढ्या सगळ्या गोष्टी घडल्या तरी एक गोष्ट मात्र चांगली घडली होती. खूप दिवसानंतर आम्ही रात्री हॉटेलवर candle light dinner साठी जाणार होतो , म्हणून मी आनंदात घरी आलो. घरी आलो खरा पण घराला कुलूप होते . माझ्याकडे शिल्लक असलेली चावी होती. मी कुलुप उघडून आत गेलो. सोफ्याजवळच्या टीपॉय वरती एक चिठ्ठी होती.

" किती फोन करायचे माणसानं....

ड्युटीवर असलं म्हणून आम्हाला विसरायचं का.... ।?

मामाची तब्येत बिघडली आहे जरा जाऊन येते....

हॉटेलवरून जेवण मागून ठेवलं आहे, जेवून घ्या

मी फोन काढून बघितला तर 27 मिस कॉल होते. मी माघारी फोन लावला तर नॉटरिचेबल.

दुसरा दिवस

काही मानसे खरंच विचित्र असतात......

तुरुंगात एक कैदी आहे. त्याचा या केसमध्ये काही संबंध असावा म्हणून त्याला विचारायला गेलो तर त्या विक्षिप्त माणसाने मुर्खासारखी उत्तरे दिली.

सरळ सांगेना म्हटल्यावर नेहमीची पद्धत वापरली तरीही सांगेना .....

झालं. त्या चार पानावर एवढाच मजकूर होता .

त्याला पोलिसांच्या सायरनचा आवाज आला.

" काय करायचं बप्पा...?

बप्पांनी उत्तर दिलं नाही. ते उत्तर द्यायला तिथे नव्हतेच ते केव्हाच ती डायरी घेऊन पसार झाले होते. तो पुन्हा एकदा पोलिसांच्या तावडीत सापडला. त्यांने पळायचा वायफळ प्रयत्न केला, पण तो निष्फळ ठरला. तो पुन्हा एकदा तुरुंगात पोहोचला.

एखादा कागदाचा तुकडा असेल आणि जर तो पाण्यात टाकला तर तो झिजून झिजून नष्ट होतो. पण उलट त्याच कागदाच्या तुकड्याच्या काही घड्या घातल्या आणि होडी बनवली

तर ती होडी पाण्यात तरंगते. त्याच कागदाच्या तुकड्याच्या घड्या वेगळया पद्धतीने घातल्या तर तोच कागदाचा तुकडा हवेतही उडू शकतो. त्याचप्रमाणे परिस्थिती व अनुभव मनुष्याच्या व्यक्तिमत्त्वाच्या व स्वभावाच्या अशा प्रकारे घडी घालतात की कितीही प्रतिकूल परिस्थिती आली तरी तो त्याविरुद्ध लढतो. अनुभव मनुष्याला बनवतात , उभा करतात आणि जगवतात.

आतापर्यंत गण्याने ही बऱ्याच चांगल्या-वाईट गोष्टी अनुभवल्या होत्या. त्या अनुभवावरून तो बरेच काही शिकलाही होता. त्यामुळे यावेळी तुरुंगात गेल्यावर त्याने स्वतःची स्थिती ढासळू दिली नाही. तरीही राहून राहून त्याच्या मनात बप्पाचे विचार येत होते.

'बप्पा कुठे गेले असतील....?

गपचुप का गेले असतील...?

मला मुद्दाम पोलिसांच्या तावडीत सोडलं असेल का.....?

त्यांनी ती डायरी का पळवली असेल....?

त्या डायरीत काय होतं....?

बप्पा खरंच माझी मदत करत होते का....?

त्यांचा दुसरा काही हेतू असेल का....?

असे अनेक प्रश्न त्याच्या मनात आवासून उभारले होते. त्याची द्विधा अवस्था झाली होती बप्पांनी त्याला जाळयात ढकलून स्वतः मोकळे झाले असे एक मन म्हणत होतं. तर दुसरे मन त्या कृतीमागचा चांगल्या कारणाचा शोध घेत होतं आणि बप्पा कसे त्याचा हितासाठीच त्याला सोडून गेले हे सांगत होतं.....

हे विचाराचं द्वंद्व असाच चालू राहिलं असतं पण शेवटी त्याने या विचारांना मनाच्या तळाला दाबून टाकले.

पृथ्वीवर ती माणसं मरत असली, तरीही लोकसंख्या कमी होत नाही. उलट दिवसेंदिवस ती वाढतच जाते. माणसांच्या मनात सुद्धा कितीही वेळा विचार मनातून काढून टाकले तरी प्रत्येक वेळी नवीन विचार उगम पावतातच. त्यामुळे बप्पाबद्दल येणारे विचार

मनाच्या गाभाऱ्यातून हाकलून दिले पण मनाचा गाभारा रिकामा कधीच राहत नाही. त्याला आता त्या डायरीचे विचार अस्वस्थ करीत होते.

एकूणात आतापर्यंत त्याच्याबरोबर घडलेल्या साऱ्या घटनाच विचित्र व अतर्क्य होत्या. एकामागून एक अशा विचित्र घटनांच्या शृंखलेत तो सापडला होता. ती शृंखला तुटायचे नावच घेत नव्हती. वरचेवर वरचेवर जास्तच अशक्य कोटीतील, भयंकर नि अमानवी अशा घटनांना तो सामोरे जात होता.

पहिल्यांदा जेव्हा तो मृत्यूच्या दाढेत अडकला होता त्यावेळी अंजलीने त्याला वाचवलं. दुसऱ्यांदा अंजलीने त्याला स्वप्नात एका बंगल्याच्या आवारात नेले. त्या वेळी हातात आलेली गोगलगाय व घरात घडलेला प्रकार अमानवी होता. तिथून सुरू झालेली ही शृंखला पुढे चालत राहिली. आज रात्री पुन्हा एकदा अंजली त्याला त्या पोलिसाच्या घरापाशी घेऊन आली होती जिथे पोलीस मरणाच्या वाटेवर निघाला होता. अंजलीने त्या पोलिसाला वाचवायला सांगितले पण त्या पोलिसाला वाचवताना तो स्वतः धारातीर्थी पडणार होता. पण न जाणो कशामुळे तो जागा झाला व त्याचा मृत्यू चुकला.

त्याला अजूनही कोडं सुटलं नव्हतं. ते म्हणजे तो स्वप्नात असायचा पण घडणाऱ्या साऱ्या घटना खरोखरच घडायच्या. मग तो खरेच स्वप्नात असायचा कि वास्तवात...? का तो एकाच वेळी दोन ठिकाणी असायचा....? पण हे कसं शक्य होतं...? विचार करून करून त्याचा मेंदू थकून गेला पण त्याला उत्तर सापडलं नाही.

एकापाठोपाठ एक विचित्र घटना त्याच्या आयुष्यात घडत चालल्या होत्या. त्याला कोणतीच स्पष्टीकरणं नव्हती स्पष्टीकरणं असली तरी, त्याला ती स्पष्टीकरण माहित नव्हती. जेव्हा तो त्या खोलीपाशी पोहोचला तेव्हा सर्वत्र गोगलगाय होत्या, पण जेव्हा त्याने आत पाय टाकला तेव्हा त्यांनी वाट करून दिली. त्या माणसाला बाहेर सोडेपर्यंत वाट करून देणाऱ्या गोगलगाय नंतर आक्रमक का झाल्या...?

या सगळया घटनांना वरचष्मा म्हणून त्या डायरीतली विचार त्याच्या डोक्यात पिंगा घालू लागले..... जे खून त्याने केलेच नव्हते त्या खुनाचा आरोपी म्हणून त्याला पकडण्यात आलं होतं. डायरीमध्ये ज्या खुनांचा उल्लेख होता त्या खुनाच्या आरोपासाठी त्याला पकडलं होतं, पण त्याने ते खून केलेच नव्हते. मग त्याला का पकडलं.....? उलट तो त्या पोलिस अधिकाऱ्याला वाचवायला गेला होता पण तोच अडचणीत सापडला.

त्याच्या मेंदूचा विचाराच्या ओझ्याने भुगा झाला. सर्व गोष्टीवरती प्रश्नचिन्ह दिसत होती. त्या प्रश्नांच्या गर्दीत त्याचं मन गुदमरून जात होतं.

" माने, संभाळून राहा बरं.... झोपशील नाहीतर

"पाच- पाच खून केलेत त्यानं तुझा पण कार्यक्रम होईल म्हणून सांगतो....."

ड्युटी वरती बदलून आलेल्या हवालदाराला, घरी जाणारा हवलदार सावधानतेचा इशारा म्हणून हे सांगत होता.....

पण त्याला हेच कळालं नाही की डायरी मध्ये फक्त तीन खूनांचा उल्लेख होता. मग पाच खून कुठून काढले.

' मी कधी केले ५-५ खून ' तो जाम वैतागला

इथे काहीतरी भलताच घोटाळा होता. त्याच्या विचारांची चक्रे उलटी सुलटी धावत सुटली. त्याच्या मनात विचारांचा गोंधळ उडाला. तेव्हाच त्याला तो बदलून आलेला हवलदार म्हणाला....

" का ओ भाऊ, जगावर एवढा कसला राग तुमचा....?

पाच पाच खून केले ते पण एवढ्या बेकार पद्धतीने...

तुम्हाला खून तर कसं करू वाटले एवढ्या क्रूरतेने...? "

गोल चेहरा, सावळा रंग, पान खाऊन लाल झालेल्या ओठावरती काळी मिशी , सुटलेलं पोट आणि समाधानी चेहरा . तो माने हवालदार होता.

" मी नाही केले......

" मग डिपारमेंट काय वेडं आहे का तुम्हाला पकडायला.....? आणि आज तर स्पेशल इन्वेस्टीगेशन टीमच्या हेडलाच मारायला निघालात तुम्ही.....?

" अहो मी त्यांना वाचवायला गेलो होतो आणि मीच वाचवलं त्यांना. नाही तर त्यांचा मृत्यू निश्चित होता.

" रंगेहात पकडलंय तुम्हाला आज आणि म्हणताय मी वाचवायला गेलो होतो...!

पण मला एक कळत नाही एवढं 5 खून केल्यावर एकही पुरावा सोडला नाही तुम्ही पण आजच कसे सापडला......?

गन्या काही बोलणार तोवर आवाज आला...

" माने सोडा त्याला. काय करताय तिथे...?

" साहेब तुम्ही...? तब्येत ठीक आहे ना..?

" एकदम मस्त आहे, त्याला बाहेर काढा. चुकीच्या माणसाला पकडलंय .

" हो साहेब सोडतो, लगेच बाहेर काढतो.

मानेनं पळत जाऊन चावी आणली आणि लगबगीने गण्याला सोडवून बाहेर काढलं.

" गणेश, गणेशच ना.... चल माझ्याबरोबर.....

हा तोच माणूस होता ज्याला गण्याने खोलीतून गोगलगाईच्या तावडीतून सोडवूलं होतं. आता त्याच माणसांना त्याची तुरुंगातून सुटका केली.

गण्याला कळेना काय चाललं होतं ते. त्या माणसाला तरी विचारावं म्हणून तो म्हणाला

" पण तुम्ही....

त्याला मध्येच तोडून तो म्हणाला

" चल गपचूप माझ्या बरोबर, शांत रहा, आणि तुला भूक वगैरे लागली असलच, घरी गेल्यावरती जेवण कर. मग निवांत बसून बोलू.....

त्याला इतक्या वेळ काहीच जाणवलं नव्हतं. पण जेव्हा जेवणाचं ऐकलं तेव्हा त्याला कडकडून लागलेली भूक जाणवली. दोघे घरी पोहचले. तेच घर होतं ज्या ठिकाणी तो काही तासापूर्वी आला होता. एक भयंकर अमानवी प्रकाराला ती वस्तू सामोरी गेली होती. पण त्याची खूण ती वरची खोली सोडली, तर कुठेच नव्हती. कारण जसजसा काळ पुढे जातो तसतसे स्थळ-काळात बदल होतच असतात. दार उघडंच होतं. ते दोघेही आत गेले....

" हाच ना गणेश......

तो पोलिस कोणालातरी म्हणाला

" हो, हो हाच....

एक मधुर आवाज त्याच्या कानावर पडला. आपसूकच त्याने आवाजाच्या दिशेने पाहिले, आणि तो पाहतच राहिला. मूर्तिमंत सौंदर्य त्याच्यापुढे अवतरले होते. ते काळेभोर केस, गोल डोळे, ज्याकडे पाहिल्यावर कोणताही नशा फिका वाटेल, ते गुलाबी ओठ, ज्यात गुलाबाच्या पाकळयाहून जास्त मार्दाव होते, ते लांब काळे केस, तो अटकर बांधा, ती नाजूक कटी, सारे काही सुंदर होते........

त्याने पाहिले, तो पाहत होता, आणि तो पाहतच राहिला. त्याने अंजलीला पाहिलेच होते. तेव्हाही तो चाट पडला होता. पण या सौंदर्यावर तो मनातून मोहित झाला होता. त्यात वासना नव्हती, ना प्रेम होतं. त्याच आकर्षण होतं. एक वेगळं समाधान होतं.

" गणेश...... "

तिचे ओठ विलग झाले . थोडी हालचाल झाली, पण गण्याच्या कानापर्यंत कोणताच आवाज पोहोचला नाही.

तो एका वेगळ्याच विश्वात, एका वेगळ्या मितीत पोहोचला होता. त्याने पूर्वी दोन वेळा अशा सुंदर रूपवतींना पाहिले होते. पहिली म्हणजे शेवंता व दुसरी अंजली. पण या रुपाचे सौंदर्य काही औरच होते. गण्यासाठी जणू आजूबाजूचा स्थल-काल अनंत काळासाठी त्याच क्षणावर थांबला होता. किती वेळ झाला होता काय माहित? तिचे सौंदर्य, ते रूप कितीही पाहिले तरी जूनं होतच नव्हतं.

इतका वेळ स्तब्ध असणाऱ्या त्या वातावरणात अचानक हालचालींचा वेग वाढला. त्याच्या सर्वांगावर शिरशीरी येऊन गेली. नि इतका वेळ फक्त डोळयांच्या संवेदना वाचण्यात गुंग असलेल्या मेंदूला इतर ज्ञानेंद्रियांची संवेदना वाचायला वेळ मिळाला. मग अचानक कानामध्ये आवाज वाढले. त्वचेला वेदना झाल्या. डोळयांनाही त्या रूपाला सोडून इतर परिसराची जाणीव झाली.

" तू तर फारच बिघडलेला निघाला की रे...!

तो पोलीस अधिकारी म्हणाला ज्याने त्याला सोडवून आणलं होतं त्यानेच त्याच्या पाठीत धपाटा घालत गन्याला ताळयावर आणले.

" अरे ऐक तर ती काय म्हणते " तोच म्हणाला..

गन्याने तिच्याकडे पाहिले...

"आता काही नाही म्हणणार ती , आता मीच सांगतो टेबलावरती गरम-गरम जेवण वाढले आहे, जेवून घे, मग बोलू....

जेवण म्हटल्यानंतर त्याच्या पोटात आगीचा डोंब उसळला. भूक इतकी लागली होती की त्याला काही सुचलं नाही, तो सरळ टेबलाकडे निघाला.

" अरे आंघोळ वगैरे तर कर...

" करतो, करतो विसरलोच....

सगळा कार्यभाग आटपून तो जेवायला बसला. त्याच्या आयुष्यात त्याने प्रथमच इतके स्वादिष्ट जेवण चाखले असावे. त्याला तिच्या हाताची चव फार आवडली.

" जेवण फार चविष्ट झालेय अं....

आणि त्याने तिच्याकडे कटाक्ष टाकला.

" तिच्याकडे बघुन नको, तिनं नाही बनवलं. हॉटेलमधून मागून ठेवलं होतं काल, तिने फक्त गरम केलंय....

या प्रात्यक्षिक विनोदावर तिने हळूच हसून आपला प्रतिसाद दिला. हा विनोद जरी गण्या वरती झाला असला, तरी त्याला वाईट वाटलं नाही. उलट तिला हसताना पाहून पुन्हा एकदा त्याच स्थल-काल स्तब्ध होणार होतं, पण यावेळी त्या पोलिस अधिकाऱ्याने अगोदरच सपाटा लावला. त्यामुळे त्याला ठसकाही लागला...

" असू दे, असू दे नाहीतर पुन्हा एकदा स्तब्ध झाला असता.... "

जेवण आटोपल्यावर ते तिघेही सोप्या वरती बसले. त्या पोलिस अधिकाऱ्याने बोलायला सुरुवात केली .

' मी रामचंद्र इंगळे शहरात सध्या जी सिरीयल किलींग चालू आहे, त्यासाठी नेमलेल्या विशेष तपासणी पथकाचा प्रमुख आणि ती मुलगी शैला. मलाही तिच्याबद्दल एवढंच माहित आहे. तुझ्या मनात बरेच प्रश्न पडले असतील मी माझ्या परीने त्या प्रश्नांची उत्तरे द्यायचा प्रयत्न करतो. आणि काही गोष्टी शैला तुला सांगणार आहे पण आधी मी सांगतो...

हे सिरीयल किलिंगचा प्रकरण ऐकून माझ्या कानावर आलं होतं. पण त्याच्या तपासणी पथकात माझी प्रमुख म्हणून निवड होईल असं वाटलं नव्हतं. कारण निवृत्त होऊन मला दोन वर्षे उलटली होती. माझ्या तब्येतीकडे बघून वाटत नसेल तुम्हाला माझं वय इतकं असेल पण वय जरी थांबवता येत नसलं तरी तब्येत सांभाळता येते. त्या दिवशी मंत्री साहेबांचा फोन आला त्यांनी प्रकरण सांगितलं. नाही म्हणायचा विषय नव्हता, कारण मी बऱ्याच अशा केस सोडवल्या आहेत ज्या सर्वांनी अशक्य म्हणून बंद करून टाकल्या होत्या. मग ही तर किरकोळ केस होती.

मी तपासावर रुजू झालो तेव्हा दोन खून झालेच होते. तेही एकाच पद्धतीने. मी ज्या दिवशी रुजू झालो त्याच्या दुसऱ्या दिवशी सकाळी सकाळी एक खून झाला. मी त्या ठिकाणी पोहोचलो सर्व खोली रक्ताने माखली होती. एक भयानक दुर्गंधी संपूर्ण खोली मध्ये पसरली होती. ज्याचा खून झाला होता त्याच्या शरीरावर मांस शिल्लकच नव्हते. मागच्या दोन्ही वेळेस असे झाले होते. फॉरेन्सिकचा म्हणण्यानुसार खून करण्यासाठी कोणत्या तरी सरपटणाऱ्या प्राण्यांचा

वापर केला जात होता. जसं एखाद्या जळवाचा. पण आतापर्यंत दोन्ही ठिकाणी एकही सरपटणारा प्राणी सापडला नव्हता. मात्र यावेळी त्या माणसाच्या हातात काहीतरी होतं. आम्ही उघडून पाहिलं तर त्याच्या हातात एक गोगलगाय होती.

त्या गोगलगाई ची ही आम्ही तपासणी केली. ती काही वेगळी नव्हती. नेहमी असते तशीच होती. मला कळेच ना की गोगलगायीचा वापर एखादा खून करण्यासाठी कसा केला जाऊ शकतो.....? आणि इतक्या मोठ्या प्रमाणावर गोगलगाय आणणार कशा......?

सगळा तपास चालू असताना मला त्याच्या (म्हणजे ज्याचा खून झाला होता तो ) टेबलाच्या ड्रॉवरमध्ये एक डायरी सापडली. ती उघडून बघितली की डायरी पूर्ण कोरी होती. मला कधीच काही लिहायचा शौक नाही पण त्यादिवशी मला इतकी तीव्र इच्छा झाली की आपण की डायरी लिहायला हवी. मग मी तिथून चक्क चोरून घरी आली व लिहायला चालू केली

मी पहिल्या दिवशी जरा सविस्तर लिहिले. दुसऱ्या दिवशी फारच तोकडी लिहिली, आणि यावरून मला एक धक्कादायक गोष्ट समजली.

मी पहिल्या दिवशी मंत्री साहेबाबद्दल लिहिलं होतं. दुसऱ्या दिवशी कळालं की हार्ट अटॅकमुळे त्यांचा मृत्यू झाला. पण ते साफ खोटं होतं. मला थोडा तपास करता समजले की त्यांचाही मृत्यू त्याच पद्धतीने झाला होता, आणि ते मुद्दाम लपवलं होतं. ते बरोबरही होतं. जिथला मंत्री सुरक्षित नाही तिथले लोक कसे सुरक्षित राहतील..?

मला मनात एक गोष्ट जाणवली की मुळात आपल्याला लिहायची सवय नाही ती डायरी आल्यापासून आपण लिहायला लागलो. पहिल्याच दिवशी मी डायरीमध्ये मंत्री साहेबांबरोबर दोघांचा उल्लेख केला होता आणि ज्यांचा उल्लेख केला होता त्याचापैकी एकाचा मृत्यू झाला. पण मला हा योगायोग वाटला म्हणून मी दुसऱ्या दिवशी त्याची चाचपणी करायची ठरवली. दुसऱ्या दिवशी मी मुद्दामूनच त्रोटक आणि कृत्रिम माहिती लिहिली. त्या माहितीमध्ये मी एका तुरुंगातल्या कैद्याबद्दल लिहिलं होतं जी संपूर्णपणे बनावट होती. पण दुसऱ्या दिवशी बरोबर तुरुंगातील एका कैद्याचा मृत्यू झाला.

मला कळालं नाही कि मी तुरुंगातल्या कैद्याला भेटलोच नव्हतो. ही हकिकत बनावट व कृत्रिम होती, तरीही तुरुंगातल्या कैद्याचा मृत्यू का झाला....? नंतर मी जेव्हा विचार केला तेव्हा मला कळलं की मी डायरीत ती कृत्रिम हकीकत लिहीत असताना त्याच कैद्याचा विचार करत होतो ज्याचा दुसऱ्या दिवशी खून झाला होता....!

काल रात्री जेव्हा मला या साऱ्यांचा उलगडा झाला तेव्हा मी लिहिलेली पाने काढून बाजूला ठेवली. नंतर मला वाटलं की ती डायरीच जाळून टाकावी, पण जेव्हा मी हा सर्व विचार करत होतो माझ्या पुढे ती डायरी मी उघडून ठेवली होती. मी उठलो ती डायरी डस्टबिन मधे टाकली. मी लाईटर शोधू लागलो, तेव्हाच तिथे सर्वत्र गोगलगायींचा गराडा पडू लागला. मला वाटतं मी डायरी उघडून तिच्यापुढे बसून सारे विचार केल्यामुळे त्यांना माझे विचार कळाले असावेत त्यामुळे त्यांनी माझा नाश करण्यासाठी गोगलगाईंना पाठवलं असावं असं मला वाटतं.

मला माहित नाही मी त्या ठिकाणी किती वेळ बेशुद्ध होतो. नंतर तू मला सोडवलं. मग मी कसेतरी ॲम्ब्युलन्सला फोन केला आणि बेशुद्ध झालो. मला नंतर कळालं की दवाखान्यातील लोकांनी पोलीस स्टेशनला फोन केला होता.. शैला मला म्हणाली की तुला पोलिसांनी पकडलं आहे आणि हे सगळं निस्तारण्यासाठी तुझी गरज आहे. आणि तू निर्दोषही होता म्हणून मी तुला सोडून बाहेर आणलं...

रामचंद्र इंगळे साहेबांचा बोलून झालं होतं त्यांनी प्रश्नाची उत्तरे दिली पण गण्या मात्र अजूनच बुचकळयात पडला.....

तिच्या मधुर आवाजात ऐकत असताना त्याच्या समोर सारे शब्द दृश्यात रूपांतरित होत होते. शैला बोलत होती -

"आता तू म्हणशील कि मला हे सारं कसं कळलं वगैरे....? तर ऐक, मीही एक प्रतिनिधीच आहे. तुझ्या सारखी. आपलं एकच काम आहे ते म्हणजे त्यांचा विनाश. ज्या दृष्ट आणि पाशवी शक्तींबरोबर आपला संघर्ष चालू आहे त्यांच्यासोबत एकटा-दुकटा लढू शकत नाही. आपल्यासारखे अजूनही असतील त्यांचा ही त्या शक्तींविरुद्ध लढा चालू असेल. ज्याला-त्याला, ज्याच्या-त्याच्या कामगिरी वाटून दिल्या आहेत. आतापर्यंत तु तुझी कामगिरी करत होता ; मी माझी कामगिरी करत होते. आता आपल्याला मिळून एक कार्य पूर्ण करायचं आहे. आपल्याबरोबर अजूनही येथील, पण तूर्तास तरी आपल्यालाच पुढची पावले टाकायला हवीत. तेही अगदी जपून.

" पण शैला मला एक सांग तुला माझ्या आणि गणेश च्या संदर्भात सारं कसं कळालं...?

तो रामचंद्र इंगळे म्हणजेच पोलिस विचारत होता.

" तुम्हाला एखादं काम दिलं तर ते काम कसं करायचं हे सुद्धा सांगितलं जातं. आपल्याला फक्त सांगितलेलं करायचं असतं. एक मात्र खरं आहे आपल्याला ओळखायला यायला हवं की आपल्याला नक्की काय काम सांगितलेलं आहे....?

आणि सांगण्याच्याही बऱ्याच पद्धती असतात. ज्या त्या व्यक्तीच्या जाणिवा, मानसिक शक्ती, खंबीरता व कुवतीवर त्याला ते संदेश पोहोचवले जातात. मला म्हणाल तर अंतरात जाणीव होते, काही चित्रे व रेखाटने साकारली जातात, त्याबरोबर काही शब्द लिहिले, जातात बऱ्याच वेळा सारं काही माहित असल्या सारखं मला आपोआप उमगंतं की आता आपल्याला काय करायला पाहिजे.....? "

" तेच म्हणतो मी काय करायचं.....?

पुन्हा इंगळे साहेब म्हणाले

गण्याच्या प्रश्नाची थोडीबहुत उत्तरे त्याला मिळाली होती. पण अजूनही त्याच्यापुढे कृतीचा रस्ता अस्पष्टच होता. त्याला मार्गच दिसत नव्हता. अचानक त्याच्या ध्यानात बप्पां व त्यांचा मठ आला.

" आपण बप्पाच्या मठात जाऊया ; बप्पांनी आपल्यासाठी काहीतरी चिट्ठी वगैरे सोडली असेलच. ते स्वत:ही असतील तिथे.

" कोण बप्पा..?

दोघेही एकदमच म्हणाले

" चला गाडी काढा, . जाता - जाता सांगतो....

पुन्हा एकदा ते मठाकडे निघाले

गाडी मठापाशी पोहोचली. गण्या उतरून पळतच निघाला. उत्सुकतेपोटी त्याला दोघांचेही भान राहिलं नाही. त्याने दार उघडलं आणि आत पाऊल टाकले. त्याच्या डोळयावर

विश्वास बसेना तो मठ नव्हताच. अगोदर जे पाहिले ते वेगळेच आणि आता पाहतो तर त्या जागेचे रुपच बदलले होते. सर्वत्र जाळया लागल्या होत्या. जणु काही तो बंगला कैक वर्षे बंद होता. सर्वत्र धूळ नि पालापाचोळा साचला होता. कोणीही ती जागा पाहून जराही विचार न करता सांगितलं असतं की ती जागा कैक वर्षे मानवी वापरात नव्हती . मानवी वास्तव्याची पुसटशीही खून त्याठिकाणी दिसत नव्हती. गण्याला कळालच नाही की तो फक्त एकटाच त्या खोलीत आला होता. ती खोली बाप्पांच्या माठातील नव्हतीच. त्याला अंजलीने येथे आणले होते. फक्त त्यालाच.....

" गणेश.....

कातळ काळोखातील घनगंभीर शांततेला चिरत आलेल्या आवाजाने गण्या दचकला. जेव्हा अंजलीचा आवाज त्याने ओळखला तेव्हा निर्धास्त होऊन त्या आवाजाला त्याने प्रतिसाद दिला

" मला इथे का आणले...?

" तुला काहीतरी सांगायचं, काही तरी दाखवायचंय.....

" काय...?

ती सांगू लागली -

" तू मला नेहमी विचारतोस ना... लहानपणा नंतर मी कुठे गेले...? माझ्यासोबत नंतर काय झालं...? मी ही अशी का झाले..? आणि माझी मुक्ती कशी होणार...? मला तुला सारे काही सांगायचं. सांगायचं आहे म्हणण्यापेक्षा, दाखवायचं आहे. तुला मी सारं काही दाखवते ; त्यानंतरच तू ठरव तुला व तुझ्या साथीदारांना काय करायला पाहिजे.

तो मध्यभागी एका सिंहासन सारख्या दिसणाऱ्या सोनेरी, मखमली खुर्चीवर बसला. त्याच्या चारी बाजूंना अंधार होता. कुठेतरी एक सोनेरी प्रकाश शलाका चमकली ; व छोटासा विस्फोट झाला. त्यानंतर त्याच्या चारी बाजूला तेच सोनेरी रंगाचे विस्फोट होत गेले. त्यातून विविध रंग बाहेर पडू लागले व पसरू लागले . जणू काही कोणतातरी चित्रकार त्याच्या कुंचल्याच्या फटक्याने त्रिमितीय चित्र काढत होता....

किती रमणीय देखावा होता. ते मोठे वडाचे झाड होते. त्याच्या पारंब्या जमिनीपर्यंत पसरल्या होत्या. त्या वडाच्या झाडाला कितीतरी पक्षांनी आपलं घर बनवलं होतं. त्यांच्या त्या किलबिल आवाजाला दोन मुलांच्या खेळण्या चा आवाज साथ देत होता. त्यात एक मुलगा व एक मुलगी होती. त्यांचा शिवाशिवीचा खेळ चालू होता. मुलगा पुढे पळत होता व मुलगी मागे. मुलगा भरभर पारंब्यावरून चढत जात होता. तोच गणेश, त्याने स्वतःला ओळखलं. त्याच्यामागे तीच होती, अंजली. तीपण पारंब्या वर चढत होती. तो वरपर्यंत पोहोचला. तिला सापडू नये म्हणून तो जोरात पळू लागला. पण त्याचा पाय घसरला. तो पडणारच होता, पण किती चपळतेने उडी मारून त्याचा हात धरून तिने त्याला वर घेतले.....

पुन्हा एकदा डोळे दिपवणारा प्रकाश चकाकला. त्याची तीव्रता इतकी होती, की काही सेकंद त्याने डोळे उघडले नाहीत. त्याच्या झाकलेल्या डोळयापुढे काळया, निळया जांभळया, लाल नि गुलाबी ज्वाला झळकत होत्या. त्याने डोळे उघडले तेव्हा त्याच्यापुढे एक खोली होती. त्याला आठवलं की ती अंजलीच्या घरातील खोली होती . एक दारुडा रंग झडून गेलेल्या सतरंजीवर आणि पापुद्रे निघालेल्या भिंतीला टेकून ; त्याच्या घाणेरड्या हाताला न शोभणाऱ्या चकाकणाऱ्या काचेच्या ग्लासात उंची दारू पीत होता. त्याच्यापुढे रंग उडालेल्या खुर्चीत एक माणूस सिगारेट फुकत बसला होता. त्या खोलीत डोकावून दुसरे एका माणसाने सांगितले.... ' चल बे काम झाले '. दूर कुठेतरी लहान मुलीच्या रडण्याचा आवाज येत होता. त्याला कळालं अंजलीच्या दारुड्या बापाने काही पैशासाठी स्वतःच्या मुलीला म्हणजे अंजली विकलं होतं.....!

पुन्हा एकदा समोरचा देखावा पालटला. आता ते एखाद्या संस्थेच्या कार्यालयात होते. एका खुर्चीवर पन्नाशी ओलांडलेला म्हातारा बसला होता. त्याच्या पुढे दोन इसम होते. तेच ते दोघे ज्यांनी अंजलीला विकत घेतलं होतं.

" थोड्या दिवस राहू दे तुझ्या अनाथाश्रमात, कळीचं फूल होईपर्यंत....

" आता रेट वाढवलेला आहे आपण, जास्त पैसे द्यावे लागतील....

तो पन्नाशी उलटलेल्या माणूस बोलला

" ठीक आहे...... कळतात सारे तुझे पण नखरे...... असू दे तरीपण.....

पुन्हा एकदा देखावा बदलला जिथे तो बसला होता त्या खोलीत आला......

" मी इतकी ही लहान नव्हते की काय चाललंय ते कळू नये.... मला सारं कळत होतं. पण मी काय करू शकत होते..? कुठे जाऊ शकत होते..? माझा एकुलता एक आधार तो माझा बाप. त्यांनेच मला विकलं, मी त्यावेळी खरच अबला होते. मला कोणाचाच आधार नव्हता. बाहेरच्या जगात जगण्यासाठी ना माझ्याकडे कोणती कला होती, ना काम होतं, ना मला काही करता येत होतं..... बाहेरच्या जगात माझ्या शरीरांवरती बोचणाऱ्या नजरा मला पदोपदी जाणवत होत्या. त्यामुळे तिथून पळून जायचं मी मुळीच प्रयत्न केला नाही. उलट तिथेच जमवून घेतलं अनाथाश्रमाच्या शाळेत शिकू लागले. चांगले गुण मिळवू लागले. मी मॅट्रिकला पहिला नंबर काढला. अनाथाश्रम चालवत होते त्यांच्या नजरेत मी आले. त्यांनी मला तिथून काढून दुसऱ्या वस्तीगृहात टाकले. मी त्या दलदलीतून इतक्या सहज सुटले कि मला आकाशही ठेंगणे वाटू लागले. मला घेऊन जाताना त्या म्हाताऱ्याने विरोध करायचा प्रयत्न केला. पण शेवटी त्याला झुकावं लागलं. नंतर मला कळाले की त्याने गळफास घेऊन आत्महत्या केली ; पण मला माहित होतं ज्या दोघांनी मला विकत घेतलं होतं त्या दोघांच्या हातून मी नसल्यामुळे त्या म्हाताऱ्याचा त्यांनीच खून केला होता....

कॉलेज झालं. तिथेही मी चमकलेच. नंतर ग्रॅज्युएशनसाठी माझा नंबर एमबीबीएसला मेरीट मध्ये बसला. तिथेच असताना माझ्या आयुष्यात तो आला. माझ्या निराधार मनाला त्याने आधार दिला. तो माझा, माझ्या आयुष्याचा साथीदार बनला. आमच्या लपून-छपून गाठीभेटी होऊ लागल्या....

आणि आवाज थांबला. पुन्हा एकदा आजूबाजूचा देखावा पालटला

ती एक बेडरूम होती. मधुचंद्रासाठी सजवतात तशी सजवली होती. तीच ती रूपवती अंजली बसली होती. गण्याच्या काळजात नकळत एक घाव पडलाच पण पुढची दृश्य पाहून त्याचं हृदयच पिळवटून निघाले . त्या खोलीत तिचा तथाकथित साथीदार आलाच नाही. आलं होतं ते दुसरीच कुणीतरी, कोणीतरी म्हणण्यापेक्षा काहीतरी ....

काळा आकार, पोत्यामध्ये माती भरावी तसा, अवाढव्य अस्ता- व्यस्त, संपूर्ण शरीरावर ती लांब लांब काळे केस ते मानवी शरीर नव्हतंच.... काही दृश्य त्याच्या अंतर्मनावर उमटताच त्याने डोळे मिटून घेतले. नंतर खोली तिच्या किंचाळण्याने, भयानक दुर्गंधीने, रक्ताचे शिंतोडे आणि ग्लब-ग्लब करून काहीतरी खाण्याच्या आवाजाने भरून गेली.....

मी ज्याच्यावर ती सर्वस्व अर्पण केलं होतं ; त्यानं मला एका बळीसाठी अर्पण केलं. तो एका नीच, अधम पंथाचा उपासक होता. त्याने बळीसाठी ठराविक अटींमुळे माझी निवड केली होती. हेतुपूर्वक माझ्याभोवती जाळे गुंफले होते. त्या पिशाच्याने माझा उपभोग घेऊन मलाच भक्ष्य बनवलं. माझा मृत्यू झाला खरा पण मी मुक्त झालेच नाही . मला कळालं नाही की मी भूत बनून का वावरत होते....? मला राग आला. भयानक राग आला. माझा बळी दिला होता आणि ज्याने घेतला होता त्यांचा.... मी रागाने दोघांवरही चाल करून जाणार होते. माझं काहीही हो, मला त्यांना सोडायचं नव्हंतं. पण मला तेव्हाच इतकी तीव्र अंतर-प्रेरणा झाली की ~' योग्य वेळेसाठी थांब. प्रत्येकाला त्याने केलेल्या कर्माचे फळ मिळतं. कुणीही कितीही वाईट असू दे, पापाचा घडा भरला की तो संपतोच. म्हणून तू प्रतीक्षा कर. योग्य वेळेची वाट पहा. ' मग वेळोवेळी अशा गोष्टी जाणवतच गेल्या. अशा गोष्टी मुळेच मी तुला वाचवायला त्या टेकडीवर पोहोचलो जिथे तू स्वतःहून बळी जायला निघाला होता. नंतर मी वेळोवेळी तुझ्या स्वप्नात आले, घडणाऱ्या गोष्टी सांगितल्या, या सर्व गोष्टी त्यांनी घडवून आणल्या आहेत. या सर्व गोष्टी मागे त्यांचा हात आहे. त्याच शक्ती, ज्या दुष्ट अमानवी पाशवी अमंगलमय शक्ती विरुद्ध लढत आहेत.

आत्ताच ती वेळ आली आहे. त्यांच्या नाशाचा काळ जवळ आला आहे. त्यांचे विनाशक आपणच आहोत. आपल्यामागे त्या शक्तींचा बळ आहे. फक्त तु तुझ्या साथीदारांना घेऊन योग्य जागी पोहोचायचयं....

" कोणती जागा....?

" तीच ती, मी पहिल्यांदा तुला घेऊन गेले होते ती...

" _ _ व फार्महाउस....?

" हो तेच तेच ते फार्महाउस आहे जिथे माझा व माझ्यासारख्या कित्येकांच्या बळी दिला गेला आहे.....!

तो शुद्धीवर आला तो बप्पांच्या मठाच्या हॉलमध्येच होता.

" म्हणजे मला हे सारं सांगण्यासाठी अंजलीने केलं होतं....

" काय बोलतोय गणेश...? काय केलं होतं...? कोण अंजली....? "

आपल्या मधुर आवाजात शैला विचारत होती. गण्याने तिला जत्रेपासूनची कहाणी व आता कळलेला सारा वृत्तांत सांगितला.

" मग आपल्याला लवकरात लवकर त्या फार्महाउस ला पोहोचलं पाहिजे...

रामचंद्र इंगळे साहेब म्हणत होते.

" हो जायलाच पाहिजे..... " शैला ही म्हणाली

" थांबा जरा... बप्पांनी माझ्या नावाची डायरी लिहिली होती. त्यामध्ये आपल्याला काहीतरी सापडेल.....

तीच ती डायरी जेव्हा गण्या पहिल्यांदा आला होता आणि इकडे तिकडे शोधाशोध करताना त्याचं नाव लिहिलेलं ती डायरी त्याला सापडली होती. त्या डायरीत त्याच्याबरोबर घडलेल्या घटना लिहिल्या होत्या. त्यांनी शोधाशोध केली पण डायरी काही सापडली नाही.

शेवटी गण्या, शैला व तो पोलीस रामचंद्र इंगळे तिघेही फार्महाऊसकडे निघाले. तेथेच साऱ्या गोष्टींचा उलगडा होणार होता

ते फार्महाउस गावाच्या बाहेरच्या बाजूला होते. पूर्णपणे मोकळ्या ओसाड माळरानावर. छोटी-मोठी खुरटी झुडपे सोडली तर एकही मोठे झाड त्याठिकाणी नव्हते. ओसाड माळरानावर असलेले ते फार्महाउस भयाने ओतप्रोत भरलेले होते. गण्याला वाटेत वेळोवेळी दिशेचं ज्ञान होत होतं. तो त्या पोलिसाला सांगत होता आणि असे करत करत तिघांचाही ताफा त्या फार्महाउस कडे चालला होता. शेवटी ते फार्महाउस पाशी पोहोचले. त्याठिकाणी पोहोचेपर्यंत सूर्य मावळून संध्याकाळचा गार वारा सुटला होता. पश्चिमेकडे पसरलेल्या लालिम्याच्या पार्श्वभूमीवर ते फार्महाउस शिकारीसाठी टपून बसलेल्या आहे हिंस्त्र श्वापदाप्रमाणे दिसत होते. गार वाऱ्यामुळे की अनामिक भीती मुळे तिघांच्याही अंगावरतीं शहारे येत होते. काळोख पसरत चालला होता. त्यांनी रस्त्याच्या बाजूलाच गाडी उभा केली. फार्महाउस पर्यंत गाडी जात नव्हती.

मुरमाड व काट्याकुट्यांची एक पायवाट जात होती. दूर असलेले ते फार्महाउस अंधाराची चादर ओढून कोणत्यातरी अघोर कार्यात व्यस्त असल्यासारखे भासत होते

शैलाने पाऊलवाटेवर पाय ठेवला व ती त्या दोघांचीही वाट न बघता सरळ चालू लागली.

" शैला थांब जरा मिळून जाऊ....

गणेश तिच्या मागोमाग पाउलवाटेकडे जात म्हणाला पण जेव्हा त्याची पावले वाटेवरती पडली तो मंतरल्याल्याप्रमाणे तिकडे चालू लागला । त्या फार्महाऊसमध्ये जे काही होते, त्याची शक्ती अपार होती. ते तिघेही संमोहित अवस्थेत त्या फार्महाउस कडे खेचले जाऊ लागले. आता पूर्ण अंधार पडला होता. कातळ काळोखात बुडून गेलेल्या त्या फार्महाउस समोरच एक लोखंडी प्लेट होती. तिला वरती हुक होता. शैलाने ती प्लेट उचलून एका बाजूला केली. आत एक भुयार होतं. तिघही त्या पायऱ्या उतरून खाली गेले.

जेव्हा गण्या शुद्धीवर आला तेव्हा त्याने पाहिले तिघेही त्यांच्याच उंचीच्या खांबाला बांधले गेले होते. त्यांचे हात मागच्या बाजूला व संपूर्ण शरीराभोवती दाव्याने गुंडाळा केला होता. त्यांच्यापुढे सहा-सात फूट व्यासाची व दीड-दोन फूट उंच वर्तुळाकार वेदी होती. त्याच्या वरती काळे पडलेले रक्ताचे डाग होते. ती वेदी बळी देण्यासाठीच वापरली जात असावी. त्यांच्या उजव्या बाजूला एक यज्ञकुंड होतं. त्याचा वापर नक्कीच चांगल्या कामासाठी केला जात नसणार. यज्ञकुंडाच्या आजूबाजूला चित्र विचित्र साहित्य होत. हळद, कुंकू, गुलाल, तांदूळ, लिंबू, मिरच्या, बीबे, कातडी चपला, मांसाचे तुकडे, हाडे, कसले तरी केस आणि दोन-तीन मडक्यात काही तरी भरून ठेवलेले होत. अशा चित्रविचित्र वस्तू त्या ठिकाणी पसरलेल्या होत्या. त्यांच्या डाव्या बाजूला उंच, विशाल, अजस्त्र आणि तितकीच विचित्र मुर्ती दिसत होती. ती अंधारात गडप झाली होती. त्या वर्तुळाकार वेदीवर बरोबर मध्यभागी लावलेल्या मशालीच्या उजेडात याचा अर्धवट दिसत असलेल्या भागाण कुणालाही घाबरवायला पुरेसा होता. समोरच सिंहासनासारखं काहीतरी दिसत होतं. अंधार असल्याने त्याच्यावर कोणी बसलेय का नाही याचा अंदाज लागत नव्हता.....

" झालं का पाहून...? निरीक्षण करून..... "

उजव्या बाजूच्या यज्ञकुंडात जवळ कोणीतरी उभं असलेलं अंधुक उजेडात दिसत होतं.

" बप्पा तुम्ही इथे.... " गण्या

" हो मीच.... "

" मला माहित होतं की तुम्ही येणार आमच्या मदतीला..... "

" मग मी येणारच होतो..... पण तुमच्या नाही त्यांच्या, आमच्या हुकुमच्या मदतीला..... "

" काय..... कोण हुकुम.....? बाप्पा काय बोलताय.....?"

बप्पा जरा पुढे सरल्यामुळे त्या मशालीच्या उजेडात त्यांच्या चेहऱ्यावर खुनशी हास्य दिसत होतं......

" तुला काय वाटलं मी तुमच्या बाजूने आहे.......? "

आणि आसमंत एक कुत्सित हास्याने भरून गेला. बाप्पा त्यांच्या मूर्खपणावर हसत होते.

" अरे मीच तुमचा बळी देणार, आणि पुन्हा आमच्या हुकुमना जिवंत करणार, पूर्ण शक्तीनिशी...... "

पुन्हा एकदा बाप्पांनी हास्याची कारंजी उडवली. इतके दिवस ज्या बप्पावर गण्याने आंधळेपणाने डोळे झाकून विश्वास ठेवला होता. तेच शत्रू होते. त्याला एकदाही जाणीव का झाली नाही......? त्याला पश्चाताप वाटत होता . त्याने बाप्पा वर विश्वास ठेवला त्याचा त्याला राग येत होता. स्वतःच्या मूर्खपणाने इतरांनाही त्यांने संकटात टाकलं होतं.

" म्हणजे ते सत्याचा शिलेदार वगैरे वगैरे सगळया गोष्टी खोट्या होत्या..... आमचा बळी द्यायचा होता म्हणून गुंफलेलं जाळं होतं तर.....

गण्या निराश होऊन म्हणाला

" नाही रे ते सगळं खरं होतं. फक्त मी त्यात कुठेच नव्हतो. तू सत्याचा शिलेदार होतास आणि आहेस. पण मी नव्हतो. मी तुला मदत करायला नव्हतो मी तुझा बळी देण्यासाठी तुझ्याशी मैत्री जोडली होती...... "

" मग इतक्या दिवस मी तुझ्यासोबतच होतो.... मग तू आमचा बळी का नाही दिलास....?

" अरे बळी देण्यासाठी योग्य वेळ, योग्य ठिकाण आणि योग्य तयारी करावी लागते. सगळया गोष्टी व्यवस्थित जुळून आल्या तरच त्याचा उपयोग होतो..... आणि तुम्हा मूर्ख लोकांना कळलं सुद्धा नाही मी त्या बळीचीच तयारी इतक्या दिवस करत होतो आणि मूर्खासारखं तुम्ही मला साथ देत होता ...... म्हणून मी तुमचा मनापासून आभार मानतो

आणि पुन्हा एकदा बप्पा त्यांच्या गडगडाटी हास्यात हरवून गेले....

" बहोत खुब... बहोत खुब... सेवक, ये जो भी खेल तुम ने खेला है उस खेल के पीछे मेरा दिमाग है ये मत भुलना.....

त्यांच्यासमोर असलेल्या सिंहासनावरती एक गडद काळी छाया अवतरल्यासारखे वाटत होते. तिथुनच त्या भसाड्या आवाजाचा उगम होता... बप्पांनी सिंहासनाकडे वळून कुर्निसात करतात तसं केलं.

" तु जगणार नाहीस.... तुझा जगण्याचा हव्यासच तुझ्या मृत्यूचं कारण झाला होता, आणि आता ही होईल..... " इतका वेळ शांत असलेली शैला गंभीर आवाजात म्हणाली.

" हो तुझा आता शेवट होणार आहे... " गण्याही त्याच गंभीर आवजात म्हणाला....

" गणेश, ये गणेश, तू आलास, माझ्यासाठी आलास... " तो अंजलीचा आवाज होता " आता आपण या साऱ्यांना संपवू, तू खरंच किती शूर आहेस तू माझ्यासाठी या संकटात पडतोयस, खरंच मी किती भाग्यवान आहे मला तुझ्या सारखा मित्र मिळाला..... मला आज खरंच खूप आनंद झाला...... "

आणि ती हसू लागली . एकाएकी कोमल मधुर असणारा तिचा आवाज बसका व चिरका होऊ लागला.... हळूहळू तो आवाज भसाडा होऊ लागला.....

" हाssss हाssss हाsssss किती सहजपणे फसतात काही मूर्ख लोक... " तोच तो त्या हुकुमच आवाज होता...

" अंजली, अंजली कुठे गेली...? काय केलस तू तिला.....? "

पुन्हा एकदा तो हसला

" अंजली कधी नव्हतीच..... तिची प्रतिकृती मीच निर्माण केली होती. तुझी फक्त एक आठवण आठवण मी उलटी फिरवली होती..... आठव, आठव तो पकडापकडीचा खेळ. तुम्ही झाडावर चढला होता. तू घसरतो, मग ती तुला पकडते . पण हे कधी घडलं नव्हतं हे सारं खोटं आहे. ही आठवण मी तुझ्या मनात कोरली आहेत. खऱ्या आयुष्यात पकडापकडी खेळताना तू घसरलाच नव्हता. घसरली होती ती अंजली, आणि अंजलीला तू वाचवू शकला नव्हता. अंजली घसरली तेव्हा खाली पडून तिचा मृत्यू झाला व ती तेव्हाच मुक्त झाली. मात्र तिच्या आठवणीचा उपयोग करून मी तुला फसवलं.... हा हा ssssss

तो आवाज गण्याला त्रास देत होता. त्याने गण्याचं सर्वस्व हिरावून घेतलं होतं. बप्पा ही त्याच्या विरोधात होते. आता अंजली कधी अस्तित्वातच नव्हती हे जेव्हा गण्याला कळालं तेव्हा तो पूर्णपणे ढासळून गेला. ते फक्त आता दोघेच उरले होते. तो आणि शैला. त्या दोघांना या बलाढ्य शक्ती विरुद्ध लढा द्यायचा होता. त्यांची मदत कोण करणार होतं....? मदत केव्हा होणार होती.....? त्याच्या मृत्युनंतर....!

गण्याला राग आला, खूप राग आला. तो वैतागला त्याच्या आयुष्यावर, त्याच्या दैवावर. त्याला जगण्याची मुळीच इच्छा नव्हती. तो ढासळून गेला . त्याचा आत्मविश्वास, त्याचे आधार कोसळले. उन्मळून पडलेल्या वृक्षाप्रमाणे त्याची अवस्था झाली. एक वादळ त्याच्या आयुष्यात आलं होतं. त्या वादळाने त्याच्या आयुष्याला कलाटणी दिली होती. त्या वादळाने त्याच्या आयुष्यात परिवर्तन आणलं होतं. पण तेच परिवर्तन, तीच कलाटणी त्याच्या आयुष्याला घातक ठरली होती. तू लढायला सक्षम होता. लढा द्यायची ताकद त्याच्यामध्ये होती. पण त्याच्यापुढे प्रश्न होता लढायचं कशासाठी....? लढायचं कोणासाठी....?

" पण मग गण्याला तू त्या अघोरी बेटावरून का वाचवलं........? " शैला विचारत होती गण्या आता काही ऐकून घेण्याच्या परिस्थितीत नव्हता. तो हरवला होता. त्याचे जगण्याचे आधार हरवून गेले होते. त्याची जगण्याची इच्छा या क्षणाला नष्ट झाली होती.

" मीच वाचवलं होतं त्यावेळी त्याला. कारण मला गण्याचा माझ्यासाठी बळी द्यायचा होता. तो खरंच उत्तम बळीचा बकरा आहे. बळी जाण्यासाठी ज्या काही अटी गुणधर्म लागतात ते त्याच्यामध्ये पुरेपूर भरलेले आहेत. तुमच्यासारख्या स्पेशल माणसांचा बळी दिल्यानंतर तो खूप खुश होतो. त्यावेळी जो कोणी बळी देत होता त्याच्या कचाट्यातून त्याला कसं सोडवले मी हे माझं मलाच माहित आहे. आणि आता ती वेळ आलेली आहे. आता मी गण्याचा बळी देणार.... नंतर मला शरीर मिळणार, तेही नेहमीसाठी... अमरत्व, चिरंजीव अमर्याद काळासाठी अनंत जीवन. म्हणूनच मी आत्ता या जगावर राज्य करण्यासाठी तयार आहे......

" तुला जर आमचाच बळी हवा होता तर इतर लोकांना तू का मारलं......? ती डायरी, गोगलगाय हे सारं कशासाठी होतं......? "

" तुला काय वाटलं, मी फक्त चार-पाच, दहा-पंधरा माणसे मारली असतील.... मी तब्बल 1109 माणसे मारली आहेत आतापर्यंत...... तेही स्वतः अमर होण्यासाठी.... मागची पाचशे ते सहाशे वर्षे याच उपद्व्यापात मी गुंतलेलो आहे..... आणि हा सेवक पिढ्यानपिढ्या तेच करत आहे.... आता तुमच्या असामान्य सत्यतेचा बळी दिला कि 1111 बळी पूर्ण होणार आणि मी अमर होणार..... हा हा हाssssss...

" सेवक भरपूर झालं बोलंणं, त्या पैलवानाला आता वेदीवर टाक, आपल्या शिकारी गोगलगाय खुप भुकेल्या आहेत....

" जी हूकूम.....

तो पोलीस अजूनही बेशुद्ध होता. बापाने त्या पोलिसाला सोडवले व वेदीवरती टाकले. वेदीच्या बरोबर मध्यभागी जे होल होते त्यातून गोगलगाय निघू लागल्या व पोलिसाच्या शरीराभोवती गराडा करू लागल्या....

बप्पा त्याच शक्तीच्या बाजूने होते ज्याविरुद्ध त्यांना लढायचे होते. पोलीस आता शिकार झाला होता, आणि गण्या हतबल झाला होता. तो काही ऐकायच्या करायच्या मनस्थितीत

राहिला नव्हता. आता उरली होती शैला. तीलाच दुष्ट शक्तीविरुद्ध काही ना काही करायला पाहिजे होते......

शैलाचे हात बांधलेले होते. ती ते सोडवायचा प्रयत्न करू लागली. तिचे मन पूर्णपणे ते हात सोडवण्यावर गुंतले. मनाची पूर्ण शक्ती, शरीराची पूर्ण शक्ती तिने हात सोडवण्यासाठी वापरली आणि तिचा हात सुटला.....

तिने हालचाल केली नाही. ती तशीच थांबली. तिने विचार केला ' आपल्याला जर यांना पराभूत करायचं असेल तर ते एकट्याला शक्य नाही. आपल्या गण्याचेही हात सोडवावे लागतील..... पण कसे?

तिने गण्याकडे पाहिले. गण्या निश्चिल, डोळे झाकून उभारला होता, जणू काही तो बेशुद्ध पडला होता.

शैला पटपट विचार करणे भाग होते. अजून घाई केली नाही तर त्या पोलिसाचा मृत्यू होणार होता, आणि काही क्षणानंतर त्या दोघांचाही बळी दिला जाणार होता. ती विचार करत होती. तिला एक कल्पना सुचली आणि तिने जलद हालचाल केली. ज्या यज्ञकुंडपाशी बाप्पा बसले होते त्या यज्ञकुंडात पाशी असलेल्या सर्व वस्तू तिने विखरून टाकल्या. दोन-तीन मडक्यात जे काही द्रव भरून ठेवले होते ते तिने सांडून दिले. यज्ञकुंडात पेटलेला अग्नी तिने विझवून टाकला........

आणि पुढे काही करणार तोवरच ती हवेत उचलली गेली...

तिच्या गळ्याभोवती दाब वाढू लागला जसं कोणी तिचा गळा दाबत होतं. तिला श्वासोच्छ्वास घेणं कठीण जाऊ लागलं. डोळ्याभोवती काळा निळयाजांभळया पिवळया तांबड्या चित्रविचित्र रंगाच्या रेषा दिसू लागल्या. दृश्य धूसर होऊ लागलं. काहीही ऐकू येईनासा झालं. सर्व ज्ञानेंद्रियांच्या संवेदना बधिर झाल्या. तिला वाटल आपला मृत्यू झाला.......

गण्याने जलद हालचाल केली. त्याने खिशात हात घातला. त्याच्या खिशात ते सूत होतं. त्याला कोणी दिलं, कोणी ठेवलं हे काही आठवत नव्हतं. फक्त होतं. त्याने एक टोक शैलाकडे फेकलं, दुसरं स्वतःच्या हातात धरलं. त्याला तीन टोके होती. जेव्हा शैला व गणेश दोघांनीही एकेक टोक धरले तेव्हा आपोआपच तिसरा टोक बप्पा कडे जाऊ लागले व त्यानी ते पकडलं....

तेव्हाच तिला स्पर्शाची संवेदना जाणवली. तिच्या हातात काही तरी होतं. तिने ते घट्ट पकडून ठेवलं. हळूहळू सर्व ज्ञानेंद्रियांच्या संवेदना परतू लागल्या. तिने डोळे उघडले. तिच्या हातात सप्तरंगी सूत होतं. त्या घनदाट अंधारात चमकणारं......

त्या सुताला तीन टोके होती व मध्यभागी वर्तुळाकार भाग होता. एक टोक शैला हातात होतं, दुसऱ्या गण्याच्या आणि तिसरे टोक बप्पाच्या हातात होतं......

" शांत व्हा, मी सांगतोय शांत व्हा, मनातील सर्व विचार काढून टाका. तेच विचार करा जे गरजेचे आहेत, या वेळेला गरजेचे आहेत...... "

बप्पा धीर गंभीर आवाजात बोलत होते

एरवी त्या दोघांनाही विचारांना आवरणं शक्य नव्हतं . पण ते सुत आणि बप्पाचा आवाज यामध्ये नक्कीच काहीतरी जादू असली पाहिजे. कारण त्यांनी कधी विचारही न केलेल्या गोष्टी त्यांच्या विचारात येत होत्या त्यांनी कधी पाहिली नसतील अशी दृश्ये त्यांना दिसत होती. समोरचं दृश्य हळूहळू पालटत गेलं. ते एका नव्या जागी पोहोचले......

स्वच्छ सूर्यप्रकाश प्रकाश, आजूबाजूला हिरवळ, सर्वत्र एक मंद सुगंध आणि हळूहळू वाहणारा मंद गार वारा. हा परिसर किती अल्हाददायक होता असं वाटत होतं की कायमसाठी इथेच राहावे पण काही क्षणासाठीच.....

त्या तिघांनी एका वेगळया मितीत प्रवेश केला होता व त्या प्रवासाचे चालक होते स्वतः बाप्पा. बप्पानी त्यांना या ठिकाणी आणला होतं.....

" बाप्पा तुम्ही...? "शैला म्हणाली

" सांगतो सारे काही सांगतो. पण आत्ताची वेळ बरोबर नाही. आता संघर्षाची वेळ आहे. आपल्याला त्याच्या विरुद्ध तिघांना मिळून लढायचा आहे. दोघही सावध व्हा. आता आपला संघर्ष होणार आहे......

त्यांनी बाप्पाला वाईट व दुष्ट समजलं होतं बाबा खरं तर त्यांच्याच बाजूने लढत होते....

आजूबाजूचा परिसर दुरून बदलात येत होता. दुरून कोणीतरी येत होतं दुर्गंध काळोख घेऊन त्यांच्या विरुद्ध लढण्यासाठी.....

तोच तो हुकूम होता. ना त्याला आकार होता न कसलं शरीर होतं. काळोखाची काळी छाया, त्याचबरोबर , निराशा, क्रोध, भय वासना, साऱ्या नकारात्मक भावनांचा मिलाफ घेऊन तो आला होता....

ते तिघेही वर्तुळ करून बसले होते. बाप्पा पुन्हा एकदा म्हणाले " काहीही दिसो, काहीही होऊ, मी जरी येऊन म्हणालो तरीही हे सूत सोडू नका......

आजूबाजूचा परिसर पूर्ण पालटला. बाग बगीचा फुलझाडे नि आल्हाददायक गारवा सारं काही नष्ट झालं. सर्वत्र दुर्गंधी पसरली. झाडे वाळून कुजून गेली. वाळला पालापाचोळा सर्वत्र पसरला. हाडे गोठवून ठेवणारी थंडी वाजू लागली.....

" तुला काय वाटलं, तू मला हरवलं, मला फसवलंस.....?

मी तुला पहिल्यांदाच ओळखलं होतं, जेव्हा तू माझ्याकडे आला होता माझा दास बनून माझा सेवक बनवून पण मी तुझा वापर करून घेतला. तुला काय वाटलं मी तुला ओळखलं नव्हतं....? तू काय करणार आहे मला माहीत नव्हतं.....? मला सारं माहीत होतं आणि आता तुझा शेवट होणार आहे......

आसमंतात एक भयानक किंकाळी घुमली. ती बप्पाची होती . बाप्पाचे दोन्ही हात मनगटापासून तुटून बाजूला पडले. त्याठिकाणी रक्ताचे पाट वाहू लागले. बप्पा च्या हातून ते सुत सुटलं होतं. त्यामुळे आता त्याला रोखणारी, थांबवणारी कोणतीच शक्ती त्याठिकाणी अस्तित्वात नव्हती . बप्पा वेदनेने विव्हळत होते, ओरडत होते . दोघांचेही मनोधैर्य खचत चालले होते तरीही दोघांनीही ते सूत सोडले नव्हते. सुताची दोन टोके ते दोघेही धरून बसले होते । त्यांच्यापासून काही फुटांच्या अंतरावर बाप्पा व त्यांचे दोन मनगटापासून तुटून पडलेले हात अस्ताव्यस्त पडले होते. समोरचे दृश्य अधिकाधिक किळसवाणे होत चालले होते त्यांच्या हातातून रक्ताचा स्राव थांबत नव्हता. तो रक्ताचा स्राव कसेही करून थांबवायला हवा होता. अन्यथा पप्पांचा मृत्यू फार दूर नव्हता.

गण्या तिथून उठला. तो विसरला बप्पांनी स्वतः सांगितले होते की काहीही झाले तरी तिथून उठू नको पण शेवटी गण्या तिथून उठलाच. त्याने आपल्या शर्टाची बाही फाडत बापाच्या हाताला बांधली. तेव्हाच विकृत हास्याचा गडगडाट त्याठिकाणी ऐकू येऊ लागला.

" आता मला अमरत्वाच्या मार्गापासून कोणीच रोखू शकत नाही..... " पुन्हा तेच विकृत हास्य.....

" सेवक तू तयार राहा भयंकर वेदनेसाठी. तू मला धोका दिला आहे तुझा मृत्यु इतका भयानक होणार आहे की साक्षात अघोर सुद्धा घाबरेल..... दयेची भीक मागितली तरी मृत्यू देणार नाही..... अगणित काळासाठी वेदना व तडफडीच्या सागरात तुला जगावं लागेल.......

आवाज हवेत विरतो न विरतो, तोच पुन्हा बाप्पाची किंकाळी ऐकू आली. यावेळी बाप्पाचा हात कोपरापासून तुटला होता. दोन्हीही पायाची दहाच्या दहा बोटे इतस्ततः विखरून पडली होती.....

ते दृश्य किळसवाणे होते. शैला ओरडून बेशुद्ध झाली...... एवढ्या भयानक वेदना होत असूनही बप्पा बेशुद्ध होत नव्हते. ते अजून जागे होते आणि एवढं रक्त जाऊनही त्यांचा मृत्यू होत नव्हता जणू तो हुकूम स्वतः बापाला बेशुद्ध होऊ देत नव्हता आणि मरूही देत नव्हता. साऱ्याच्या साऱ्या वेदना बप्पाला सोसाव्या लागत होत्या. त्या वेदनेमुळे बप्पाचा मेंदू बधीर झाला होता. त्यांना काही सुचत नव्हते न काही कळत होते. ते फक्त ओरडत होते. किंचाळत होते....

ते तिघे पूर्णपणे त्याच्या तावडीत सापडले होते. त्यांचा मृत्यू होणार होता आणि साधासुधा मृत्यू नाही ; तर वेदनेने परिपूर्ण असलेला नरकातही अशा वेदना नसतील इतक्या भयानक वेदना त्यांना या ठिकाणी भोगाव्या लागणार होत्या....

शैला बेशुद्ध झाली होती. बाप्पा वेदनेने विव्हळत होते. गण्याला कळना त्याला काय करावे.....?

बाप्पा विव्हळत -विव्हळत बारीक आवाजात अडखळत-अडखळत बोलत होते

" अरे गणेश माझ्या पिशवीमध्ये एक काचेची छोटीशी कुपी आहे. त्या कुपी मधील ते पवित्र जल तू या ठिकाणी शिंपड म्हणजे आपल्यासाठी नेहमीच्या जगात जाण्याचा मार्ग खुला

होईल. या जगात मी त्याला आणले होते मला वाटले मी आपण त्याचा पराभव करु शकू, पण ते आता आपल्याला अशक्य आहे. आपण लवकरच जर नेहमीच्या जगात नाही गेलो तर आपल्या अंत निश्चित आहे....

गण्याने पिशवीकडे उडी घेतली तशा पिशवीतील सर्व वस्तू हवेत उडाल्या.... हवेतच उंचावरती ती काचेची कुपी होती. कितीही उड्या मारल्या तरी गणाच्या हाताला की कुपी येणं कधीही शक्य नव्हतं..... त्याचवेळी बाप्पांनी कसल्या तरी विचित्र भाषेत विचित्र शब्द एकदम मोठ्या आवाजात उच्चारले आणि क्षणभरासाठी त्या हवेत उडालेल्या वस्तू जमिनीवरती स्थिर झाल्या. गण्याने ती काचेची कुपी पकडली पण त्यामागोमाग बाप्पाचा तीव्र स्वरात किंचाळण्याचा आवाज त्यांच्या कानी आला व पुन्हा त्या सर्व वस्तू हवेत उडाल्या.

गण्या त्या कुपीचं बुच काढून त्यातील ते पवित्र जल शिंपडण्याचा बेतात होता. पुन्हा एकदा त्याच्या हातातून ती उडाली व काही अंतरावर जाऊन खळकन फुटली. पण त्यातील पवित्र जल खाली पडल्यामुळे त्या ठिकाणी नेहमीच्या जगात जाण्यासाठी वाट खुली झाली होती...

पण त्या ठिकाणी गण्याला एकट्याला जायचे नव्हते दोघांनाही घेऊन जायचे होते. तो बाप्पाकडे वळला, पण बप्पाच म्हणाले आधी शैलाला नेउन सोड.... गण्या शैला कडे वळला त्याने शैलाला उचलले व तो चालू लागला...

हवेत रंगीत पाण्याचा फवारा उडावा त्याप्रमाणे नेहमीच्या जगातील म्हणजे ते काही वेळापूर्वी ज्या भुयारात होते त्याठिकाणचं एक दृश्य दिसत होतं... समोरची अजस्त्र विशाल मूर्ती होती. त्या मूर्तीच्या समोर बरोबर ती वाट खुली होत होती.... गण्या चालत निघाला पण या वेळी कोणताच प्रतिकार झाला नाही मागे बाप्पा तीव्र स्वरात मोठ्या आवाजात काहीतरी बडबडत होते.....

गण्या त्या भुयारात पोहोचला व मागे वळणार पण वाट बंद होऊ लागली होती पण आवाज येत होता त्या मूर्तीच्या हातामध्ये असलेल्या घाडग्यातील रक्त सांडून दे आणि दुसऱ्या घाडग्तील हाडे पाण्यात बुडवून टाक.......

ती वाट बंद झाली होती आणि बप्पांचा आवाजही म्हणजे बप्पा त्या ठिकाणीच राहिले होते. याचा अर्थ बप्पाचा मृत्यू निश्चित होता. जे काही करायचे होते ते फक्त आता त्याला एकट्यालाच करावे लागणार होते. शैला तर बेशुद्ध होती. तो पटकन मूर्तीकडे वळाला...

मूर्तीचे हात जमिनीपासून आठ ते दहा फूट उंचीवर होते. त्या हातात जे गाडगं होतं ते त्याला खाली पाडायचं होतं. तो पोलीस अगोदरच त्या हातापर्यंत पोहोचला होता. पोलिसांबद्दल गण्या तर विसरलाच होता. त्या पोलिसाने ते गाडगे सांडून दिले. ते गाडगे खळखळ आवाज करत फुटले. त्यातील रक्त जमिनीवर सांडले. त्या मागोमाग भयंकर ओरडल्याचा, किंचाळण्याचा आवाज आला. ते जे काही होतं ते नक्कीच चवताळलं होतं.....

तो पोलिस आठ दहा फुटांच्या उंचीवरून बेदमपणे जमिनीवर आदळला गेला. त्याच्या डोक्याला मार लागला आणि तोही बेशुद्ध झाला. कसेही करून आता गण्याला त्याच्या दुसऱ्या हातातील गाड्यांमध्येही जी हाडे होती. ती पाण्यात टाकणे आवश्यक होते.....

पण सरळ सरळ त्या मूर्तीकडे तो आता पळत जाऊ शकत नव्हता कारण ते जे काही होते ते जागृत झालं होतं व त्यावर हल्ला करायचा प्रयत्न करणारच होतं. त्याही अवस्थेत गण्याने जरा डोकं चालवलं व भुयारातून बाहेर जाण्याचा जो मार्ग होता त्या बाजूला तो पळत सुटला...... तो हुकुम चवताळला होता त्याला गण्याला मारायच होतं. तो घरातून बाहेर जाण्याच्या मार्गाकडे पळाला पण त्याने गण्याला बाहेर निसटू दिले नाही. गण्या हवेत उडाला आणि जोरात विरुद्ध बाजूला येऊ लागला. त्याचा फायदा घेऊन गण्याने आपले शरीर त्या मूर्तीच्या बाजूला झोकून दिले व तो मूर्ती वर जाऊन आदळला... तो पटकन मूर्तीच्या हाता पर्यंत पोहोचला व ते हातातील घाडगे घेऊन खाली आदळणार तेव्हा त्याच्या लक्षात आले त्याला तर ती हाडे पाण्यात टाकायची होती पण येथे पाणी कुठेच नव्हते....

आणि काय आश्चर्य भुयारात सर्वत्र पाण्याचे झरे लागावेत तसं पाणी भरलं गेलं. गण्याने ती हाडे त्या पाण्यात टाकून दिली. हाडे पाण्यात पडतात न पडताच जोरात किंचाळल्या ओरडल्याचा आवाज येऊ लागला हळूहळू शांत झाला......

ते जे काही होतं ते नष्ट झालं होतं पण ते पाणी आलं कुठून गण्या मनात विचार करत होता तेव्हाच आवाज आला

" जेव्हा कोणताही मनुष्य आपले अवजड शरीर त्यागून जातो तेव्हा त्याच्याकडे निश्चितच अधिक चेतना शक्ती जागृत होते कारण अवजड शहरांमध्ये तेच आत्मतत्व असते तरीही त्या चेतना जागृत होत नाहीत कारण त्याला जडाचे बंधन असते....

" बप्पा तुम्ही.....?

" जाता जाता तुम्हा दोघांना एकच सांगतो तुम्हाला अजून खूप शिकायचं आहे. तुम्हाला लवकरच कोणीतरी भेटेल जो तुम्हाला सारं काही सांगेल........

" पण बप्पा....... " गण्याला एक हुंदका दाटून आला शैलाच्याही डोळयातह आसवे गोळा झाली होती...

" रडू नका....... बाप्पा चा आवाज आला. गण्याच्या हुंदका कुठल्याकुठे हरवला. शैलाच्या डोळयातली आसवेही विरून गेली.... काय आश्चर्य ते दोघेही रडायचे थांबले. बप्पा पुढे बोलू लागले....

" मी तुम्हा दोघांचीही माफी मागतो. मी तुम्हाला या माझ्या नियोजनाची पूर्वकल्पना द्यायला हवी होती. मी याच परंपरेचा पाईक असल्याचं त्याला दाखवत त्याच्या परंपरेत घुसलो होतो. त्याला कसेही करून मारायलाच हवा होते. पण ते मला एकट्याला शक्य नव्हतं म्हणून मी तुम्हा दोघांची वाट पाहत होतो. त्याची परंपरा फार वर्षांपासून चालत आलेली आहे. आता तुम्हा लोकांचा बळी गेला असता तर तो निश्चितच शक्तिशाली झाला असता. पण आपण तिघांनीही त्याला रोखले, ते तुम्हा दोघा शिवाय कधीही शक्य नव्हते.

माझ्या उघड्या डोळयांनी मी गण्याची विटंबना पाहत होतो. जी विटंबना तो अंजली च्या रूपात करत होता. माझ्या उघड्या डोळयांनी मी ती डायरी त्या गोगलगाय व ते सिरीयल किलींगचं प्रकरण पाहत होतो. पण मी एकटा काहीच करू शकत नव्हतो. या सर्व गोष्टींच्या मागे तोच होता. त्याने त्या सर्व गोष्टी घडवल्या होत्या.

फार पूर्वीपासून त्याची परंपरा चालत आलेली आहे. त्याने सुरुवातीला अमर व्हायचा प्रयत्न केला होता पण तेव्हा तो यशस्वी झाला नव्हता. मग त्याच्या साधकांकडे पिढ्यानपिढ्या त्याने हे प्रकार चालू ठेवले होते . पण मला जेव्हा याविरोधात लढायची वेळ आली तेव्हा मी ती परंपराच बंद करून टाकली. मी एकाचा मृत्यू घडवून आणला व त्याच परंपरेचा पाईक असल्याचे दाखवत त्याच्या या खेळात सामील झालो. त्याच्यावाचून माझ्याकडे दुसरा पर्यायच नव्हता......

नंतर मी तुम्हा दोघांची वाट पाहत होतो तुम्हा दोघांबाबत मला पूर्वकल्पना जाणिवा येत होत्या. जेव्हा मला तुझी जाणीव झाली तेव्हा मी मुद्दाहून तुझ्याबद्दल त्याला सांगितले. तेव्हाच त्याने तुला त्या अघोरी बेटावर येऊन वाचवले.....

पुन्हा एकदा सांगतो. तुम्हाला खूप शिकायचं आहे. तुमचं आयुष्य आता पूर्वीसारखे राहिलेले नाही. तुमचं आयुष्य पूर्णपणे बदलून गेलेलं आहे. त्याला कलाटणी मिळालेली आहे. त्याला परिसाचा स्पर्श झाला आहे. ते आता सोनं झालं आहे.

तुम्हाला संपूर्ण आयुष्यभर असेच लढे द्यावे लागतील. तुमची निवड झालेली आहे.....

आणि एकाकी तो आवाज बंद झाला. त्या दोघांनाही या जगात दृष्टांविरुद्ध लढण्याची जबाबदारी देऊन . इतक्यावेळ वेळ ते शांत राहिलेले दोघेही हुंदके देऊन रडू लागले.........

समाप्त

**ई साहित्य प्रतिष्ठान** दहा वर्षांपुर्वी सुरू झालं. जगभरात ई पुस्तकांची संकल्पना रुजू लागत असतानाच मराठीतही ई पुस्तकं सुरू झाली. मराठीत अमॅझॉन सारखे प्रचंड इन्व्हेस्ट्मेंट करणारे खिलाडी उतरले. त्यांच्यासमोर ई साहित्य म्हणजे अगदीच लिंबुटिंबू. पण गेली दहा वर्षं आणि आजही गुगलवर "मराठी पुस्तक" किंवा "Marathi ebook" टाकले की ४ कोटी ९३ लाख नांवांमध्ये पहिले दुसरे नाव येते ते ई साहित्यचेच. ही करामत आहे आमच्या लेखकांची. वाचकांना सातत्याने दर्जेदार मनोरंजक उच्च प्रतीची पुस्तके "विनामूल्य" देणारे आमचे लेखक हेच या स्पर्धेचे विजेते आहेत.

मराठीत "साहित्यरत्नांच्या खाणी" निपजोत या ज्ञानोबांनी मागितलेल्या पसायदानाला ईश्वराने तेवढ्याच उदारतेने खाणींचा वर्षाव केला. मराठीचे दुर्दैव हे की या खाणींतली रत्ने बाहेर आणणे आणि त्यांचे पैलू पडल्यावर त्यांना शोकेस करणे आणि जागतिक वाचकांसमोर ते पेश करणे यात आपण कमी पडलो. इथे उत्तम साहित्यासाठी भुकेलेले वाचक आणि उत्तम वाचकांच्या प्रतिक्षेतले साहित्यिक यांच्यात ब्रिज बनणे आवश्यक आहे. विशेषतः डॉ. नितीन मोरे यांसारखे साहित्यिक ज्यांना लिहिण्यात आनंद आहे पण त्यापुढील जटील प्रक्रियेत पडण्यात रस नाही अशांसाठी. विदेशांत मोठे लेखक एजंट नेमतात आणि ते बाकी सर्व व्यवहार पहातात. मराठीत ही सोय नाही.

ई साहित्य प्रतिष्ठान ही काही अनुभवी प्रोफ़ेशनल प्रकाशन संस्था नव्हे. पण गेल्या दहा वर्षांत आमच्या हे लक्षात आले की मराठीत रत्नांच्या खाणी आहेत आणि त्यांत उतरून हात काळे करून माती गाळ उपसत राहून जर चिवटपणे काम करत राहिले तर एकाहून एक भारी रत्ने गवसणार आहेत. एखाद्या मोठ्या धनिकाने, पंडितांच्या सहाय्याने, दरबारी आश्रयासह जर हे काम हाती घेतले तर मराठी भाषेतले साहित्य जागतिक पटलावर आपला ठसा नक्की उमटवेल.

डॉ. नितीन मोरे यांची तेरा अप्रकाशित पुस्तके प्रकाशात आणण्याचा मान ई साहित्यला मिळाला. शंभू गणपुले यांची नऊ, डॉ. वसंत बागुल यांची बारा, शुभांगी पासेबंद यांची सात, अविनाश नगरकर यांची,डॉ. स्मिता दामले यांची पाच, डॉ. वृषाली जोशी यांची तीन अशा

अनेकांच्या पुस्तकांना वाचकांपर्यंत नेण्याचे भाग्य ई साहित्यला लाभले. असे अनेक “स्वांतःसुखाय” लिहीणारे उत्तमोत्तम लेखक कवी या मराठीच्या “साहित्यरत्नांचिया खाणीं” मध्ये आहेत. अशोक कोठारे यांनी महाभारताच्या मूळ संहितेचे मराठी भाषांतर सुरू केले आहे. सौरभ वागळे, सूरज गाताडे, ओंकार झाजे, पंकज घारे, विनायक पोतदार, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा असे अनेक नवीन लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्यकडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. पण आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे लेखक आता येत आहेत. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद. आणि या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

आमेन

सुनील सामंत

अध्यक्ष, ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com
esahity@gmail.com